UNIVERSAL
LIBRARY
OU_192158
UNIVERSAL
LIBRARY

श्री सयाजी बालज्ञानमाला पुष्प १६८ वें

# काशी

## प्राचीन व आर्वाचीन इतिहास आणि स्थल-क्षेत्रवर्णन


लेखक :

डॉ. अनंत सदाशिव अळतेकर

एम्. ए, एल्एल् बी, डी लिट्.

बनारस हिंदु विश्वविद्यालयातील प्राचीन हिंदु इतिहास व संस्कृति

या विषयाचें प्रधानाध्यापक.

आवृत्ति १ ली

सन १९४१

प्रती १०००

किंमत ०-१०-०

प्रकाशक :

पुरुषोत्तम आत्माराम चित्रे, बी. ए.,

खारीबाव, बडोदे

Checked 196[illegible]

मुद्रक :

पुरुषोत्तम आत्माराम चित्रे, बी. ए,

आत्माराम प्रेस, खारीबाव, बडोदें

श्री

# विज्ञापना

आपल्या देशी भाषेंतील साहित्याची अभिवृद्धि करण्याच्या सद्धेतूने विद्याभिलाषी कै. श्रीमंत सरकार महाराजसाहेब सर सयाजीराव गायकवाड, सेनाखासखेल, समशेरबहादूर, जी. सी. एस्. आय्., जी. सी. आय्. ई., एल्‌एल्. डी., यांनीं कृपावंत होऊन दोन लक्ष रुपयाची जी रक्कम निराळी ठेविली आहे, तिच्या व्याजातून "श्रीसयाजी बालज्ञानमालें"त विविध विषयांवर पुस्तकें तयार करण्यात येत असतात.

तदनुसार काशी या नावाचा ग्रंथ डॉ. **अनंत सदाशिव अळतेकर**, एम्. ए., एल्. एल् बी, डी. लिट्. याजकडून तयार करविला, तो उक्त मालेंतून १६८ वें पुष्प म्हणून प्रसिद्ध करण्यात येत आहे.

भाषान्तरशाखा,
प्राच्यविद्यामंदिर,
बडोदें.
१–८–४१.

भा. प्र. कोठारी.
भा. मदतनीस.

ज्यो. मा. महेता.
विद्याधिकारी,
राज्य बडोदें.

# अनुक्रमणिका


प्रकरण पहिले—प्राचीन इतिहास, सुमारें इ. स. १००० पर्यंत १

प्रकरण दुसरें—मध्ययुगीन व अर्वाचीन इतिहास १८

प्रकरण तिसरे—तीर्थ व शहरवर्णन .. ४८

प्रकरण चवथे—सारनाथ .. ८१

प्रकरण पाचवे—काशी विश्वविद्यालय .. ९७

# प्रस्तावना

काशी ऊर्फ बनारस याचे नाव माहीत नाहीं असा हिंदु सापडणे कठीण होईल. काशी हे तीर्थ हिंदु सस्कृति, धर्म व विद्या याचे केन्द्र किंवा माहेरघर आहे अशी त्याची अनेक वर्षे कीर्ति आहे ही कीर्ति भरतखंडाबाहेर प्राचीनकाळीं पसरलेली होती व हल्लींहि पसरलेली आहे प्राचीन धार्मिक-विधींवरील विश्वास जरी दिवसेदिवस उडत चालला असला, तरीहि अजून काशीस दरवर्षी हजारो श्रीमत व गरीब यात्रेकरू येतात व भक्तिभावाने गगेमध्ये स्नान करून, विश्वेश्वराचें दर्शन घेऊन व पितराना पिंड देऊन आपणास कृतार्थ करून घेतात अशा तऱ्हेची जाज्वल्य धार्मिक श्रद्धा नसलेले हिंदुलोकहि हे हिंदुधर्मकेन्द्र पाहण्यास कुतूहल म्हणून येतात. इग्लड, यूरोप व अमेरिका येथून जे हौसी प्रवासी हिंदुस्थान पाहण्यास दरवर्षी हिवाळ्यात येतात, ते काशीस आल्याशिवाय रहात नाहींत. हिंदुस्थानात आलेले इग्लडचे बादशहा अगर राजपुत्र, त्याचप्रमाणें गव्हर्नर व व्हाइसरॉय हेहि काशी पाहिल्याशिवाय स्वदेशीं परत जात नाहींत १९१६ सालीं काशीस हिंदु विश्वविद्यालय स्थापन झाले, ते अनेक दृष्टीनें अनन्यसाधारण

असून त्याची गेल्या पचवीस वर्षांत अद्भुत प्रगति झालेली आहे. तेव्हा केवळ तेच पाहण्याकरिताहि पुष्कळ लोक बनारसला येतात.

हिंदूप्रमाणे बौद्ध व जैन यानाहि बनारस हे महत्त्वाचे तीर्थ वाटते बौद्ध लोकाच्या चतु स्थली यात्रेमध्ये सारनाथ हें महत्वाचे तीर्थ आहे; भगवान् बुद्धाने धर्मोपदेशास प्रथम काशीच्या उत्तरेस असणाऱ्या सारनाथच्या धर्मारण्यामध्ये सुरुवात केली म्हणून गेलीं दीड-दोन हजार वर्षें चीन, कोरिया, जपान, तिबेट, सयाम, ब्रह्मदेश, सिलोन वगैरे दूरदूरच्या देशातून शेकडो बौद्ध यात्रेकरू भक्तिभावाने सारनाथला येऊन तेथील मुसलमानानीं उध्वस्त केलेल्या स्तूपाचे, देवळाचे व विहाराचे दर्शन घेऊन जात आहेत आता तर सारनाथला नवीन बौद्धमंदिर उभारले असून त्यामध्ये साक्षात् भगवान् बुद्धाच्या तक्षशिलेस सापडलेल्या अस्थी ठेवण्यात आल्या आहेत, त्यामुळे बौद्ध यात्रेकरूंची सख्या वाढतच चाललेली आहे जैन लोकाचा अकरावा तीर्थंकर श्रेयासनाथ याचा जन्म बनारसला झाला होता म्हणून जैन लोकानाहि बनारस हे क्षेत्र वाटते व तेथे त्यानी सारनाथला एक श्रेयासनाथाचे देवालय बाधले आहे.

अशा प्रकारे अनेक दृष्ट्या महत्वाच्या बनारस शहराबद्दल सोपपत्तिक व सविस्तर माहिती देणारे हे पुस्तक सामान्य मराठी

वाचकाकरितां बडोदा सरकारच्या आदेशानुरूप लिहिण्यात आले आहे. पहिल्या दोन प्रकरणांमध्ये बनारसचा प्राचीन, मध्ययुगीन व आर्वाचीन इतिहास देण्यांत आला आहे; त्यावरून वाचकांस बनारसचे महत्व कसे वाढत गेले आहे, तेथे अनेक संस्कृतींचा व धर्मांचा कसा सुंदर मिलाफ झाला आहे व तेथील लोकाची धर्मनिष्ठा व ज्ञाननिष्ठा अनेक प्रकारच्या प्रतिकूल परिस्थितींत देखील कशी तावून सुलाखून निघालेली आहे हे दिसून येईल तिसऱ्या प्रकरणामध्ये तीर्थ व स्थलवर्णन आहे. ते प्रवाशाना व यात्रेकरूंना फार उपयोगी होईल चवथ्या प्रकरणामध्ये बनारसच्या नजीक असलेल्या सारनाथ या बौद्धतीर्थाचे वर्णन आहे. पाचव्या प्रकरणामध्ये बनारसमध्ये गेल्या पचवीस वर्षामध्ये पडित मदनमोहन मालवीय याच्या तपस्येने, स्वार्थत्यागाने, व पुण्याईने ज्या विश्वविद्यालयाची स्थापना होऊन अद्भुत विस्तार झाला आहे त्याचा इतिहास देण्यात आला आहे. हे पुस्तक सामान्य वाचकाकरिता लिहिले असल्यामुळे त्यामध्ये मूळ आधारभूत ग्रंथाचे संदर्भ फारसे देण्यात आलेले नाहीत.

काशी विश्वविद्यालय,
१-८-१९४१

अनत सदाशिव अळतेकर

# काशी

## प्रकरण १ लें.

### प्राचीन इतिहास–सुमारे इ. स १००० पर्यंत

हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास अद्याप बराच अज्ञात आहे. प्राचीन कालपैकीं अलीकडच्या भागावर, म्हणजे इ स पू ६०० पासूनच्या पुढील कालावर, संस्कृत व बौद्ध वाङ्मय, पुराणे, ग्रीक इतिहास, प्राचीन नाणीं व कोरीव लेख वगैरेच्या सहाय्याने बराचसा प्रकाश पडू लागला आहे, पण इ. स पूर्व ६०० पूर्वींचा इतिहास आपणास बहुतेक अज्ञातच आहे. आपले वेद, उपनिषदे व पुराणे यावरून इ. स पू ६०० वर्षांपूर्वींचाहि इतिहास थोडा थोडा कळतो, पण त्यामध्ये उल्लेखिलेले राजे किंवा सांगितलेले प्रसंग निश्चितपणे केव्हा घडले या प्रश्नास इतिहासकारास समर्पक उत्तर देता येत नाहीं.

पुष्कळदा या वाङ्मयामध्ये वर्णन केलेले प्रसग खरोखरच ऐतिहासिक होते कीं काय याचीहि शका येऊ लागते

काशीच्या अत्यत प्राचीन कालाच्या, म्हणजे इ स पू ६०० पूर्वीच्या, इतिहासाबद्दल आपणास फारच थोडी विश्वसनीय माहिती आहे आर्य लोक हे पजाबमध्ये बरींच शतके प्रथम राहिले होते, पुढे क्रमाक्रमाने दिल्ली प्रात, सयुक्त प्रात, बिहार, बगाल वगैरे प्रातामध्ये त्याचा प्रवेश व फैलाव झाला ऋग्वेदकालीं आर्य लोकाना म्हणजे हिंदूना काशीसबधीं काहीं माहिती नव्हती, कारण त्याना पजाबापलीकडच्या हिंदुस्थानच्या पूर्वेकडील प्राताचा भूगोल फारसा माहीत नव्हता त्या वेळीं संयुक्त प्रात, बिहार, बगाल वगैरे प्रदेशात अनार्य सस्कृतीचे लोक रहात असत त्याची भाषा, धर्म, वश व सस्कृति ही आर्याहून भिन्न असल्यामुळे त्याचे व आर्याचे पटत नसे त्यामुळे त्याच्यामध्ये पुष्कळदा लढाया होत व आर्यांना अनार्याबद्दल व त्याच्या देशाबद्दल तिटकारा वाटे अथर्ववेदकालीं आर्यांना मगध (म्हणजे हल्लींचा बिहार) देशापर्यंतच्या पूर्वेकडील प्रदेशाची माहिती झालेली होती, पण पूर्वेकडील देशाचे लोक म्हणजे हीन सस्कृतीचे असे आर्यना वाटे व त्यामध्ये ते फारसे जात नसत कदाचित् पूर्वेकडील जरासधासारखे

राजे प्रबळ असल्यामुळे आर्यांना तेथे आपला शिरकाव करून घेणे दुरापास्तहि झाले असेल. जादुटोण्याने ताप नाहींसा करणारा एक देवऋषि ' मीं या रोग्यापासून घालवून दिलेला ताप काशी, अंग (म्हणजे भागलपूरनजीकचा प्रदेश) व मगध उर्फ बिहार या प्रांताकडे जावो ' असे पिप्पलादशाखीय अथर्ववेदामध्ये एके ठिकाणीं म्हणताना आढळतो. (७ २२. १४) त्यावरून त्यावेळीं काशी म्हणजे एक पुण्यकारक क्षेत्र आहे अशी आर्यांची कल्पना नव्हती असे दिसून येईल मनुस्मृतीच्या दुसऱ्या अध्यायामध्ये हिंदुस्थानात परमपावन प्रांत कोणते याचे दिग्दर्शन केले आहे. तेथे ब्रह्मावर्त व ब्रह्मर्षि देश याचे पवित्र देश म्हणून वर्णन केलेले आहे. या प्रांतामध्ये पूर्व पंजाबाचा काहीं भाग व दिल्ली, आग्रा व मथुरा हा टापू याचाच समावेश होतो. काशीक्षेत्रातील सज्जनापासून सदाचार शिकावा असे न सांगता वरील टापूंतील सुशील लोकापासूनच तो शिकावा असे मनूने सांगितले आहे. यावरूनहि पुष्कळ काळपर्यंत आर्य-संस्कृतीचे केंद्र काशीमध्ये नसून ब्रह्मावर्त व ब्रह्मर्षि देश यामध्ये होते असेच दिसून येईल. त्या वेळचीं आर्यांचीं पवित्र क्षेत्रे पंजाबकडे होती; त्याच्यामध्ये काशीचा अंतर्भाव होत नसे.

कदाचित् त्यावेळीं काशी हे आर्यपूर्वकालीन संस्कृतीचे

व धर्माचे महत्त्वाचे केंद्र असावे काशीचे मुख्य दैवत जो महादेव त्याची पूजा प्रथम द्रविडलोकात रूढ असावी व त्याच्यापासून आर्यांनीं ती घेतली असावी असे बऱ्याच विचारवंत संशोधकाचे मत आहे. खुद्द काशीखंडामध्ये सुद्धा दक्षेश्वराच्या कथेमध्ये दक्षाने जो यज्ञ केला होता त्यामध्ये त्याने इतर सर्व देवाना बोलावले, पण महादेवाला तो जावई असूनहि बोलावले नाहीं असे वर्णन आढळते महादेव हा वेद न जाणणारा, विचित्र वेषाचा, व मनुष्याच्या मुडक्याच्या माळा घालणारा चमत्कारिक देव असल्यामुळे त्याचा सासरा जो दक्ष त्याने सुद्धा त्याला आपल्या घरीं यज्ञाला बोलावले नाहीं असे स्कंद-पुराणहि (अध्याय ८७) म्हणते यावरून वैदिक यज्ञ करणाऱ्या आर्य लोकाना महादेवाबद्दल फारसे प्रेम वाटत नसे असे दिसून येईल तो त्याचा देवच नव्हता, अर्थात् ज्या काशीमध्ये महादेवपूजा प्रामुख्याने रूढ होती, ती काशीसुद्धा त्यावेळीं आर्यांना तीर्थ म्हणून फारशी पवित्र वाटत असणे शक्य दिसत नाहीं.

काशीखंडामध्ये काशीच्या दिवोदास राजाची जी गोष्ट सांगितली आहे तीवरूनहि असेच अनुमान निघते. काशीमध्ये फार प्राचीन काळीं दिवोदास नांवाचा अत्यंत सच्छील राजा

धर्माने राज्य करीत होता त्याचे वर्तन आदर्शभूत होते, पण त्याने सर्व देवाना काशींतून बाहेर हाकलून टाकले होते काशी-मध्ये प्रवेश मिळण्याबद्दल देवानीं फार खटपट केली, पण दिवोदासाच्या हातून चुकूनहि पाप होत नसल्यामुळे त्याला काशींतून कोणासच काढून टाकता येईना अखेर गणेशाने ज्योतिष्याचे सोग घेऊन, आजपासून अठरा दिवसानीं उत्तर दिशेकडून आलेला ब्राह्मण जे सागेल तसे वागणे इष्ट आहे अशी दिवो-दास राजाची समजूत करून दिली, पुढे १८ दिवसानीं विष्णूने ब्राह्मणरूप घेऊन दिवोदासास आता काशी सोडून स्वर्गास जाणे चागले असे सागितले व त्याप्रमाणे तो स्वर्गास गेला, मग देवाना काशी मिळाली काशींतून दिवोदासाने हद्दपार केलेल्या देवामध्ये महादेवाचाहि अतर्भाव स्कदपुराणातील काशीखडात केला आहे, पण ती कल्पना मागाहूनची असावी दिवोदास नावाचा पवित्र आचरणाचा पण आर्याच्या देवाना न मानणारा राजा काशींत राज्य करीत होता, व त्यास युक्तीने काढून टाकल्यावर मग तेथे आर्य देवाचा प्रवेश झाला असेच या गोष्टीवरून दिसते यावरूनहि काशी प्रथम आर्येतराचे क्षेत्र असावे असे दिसते आर्याच्या ताब्यात ती आल्यावर गगेच्या पलीकडे काहीं काळ आर्येतराच्या वसाहती असाव्यात असे दिसते. त्यावरून काशींत मृत्यु आला तर मोक्ष मिळतो,

काशीच्या नदीच्या पलीकडे मरण आले तर कुत्र्याच्या जन्मास मनुष्य जातो, ही कल्पना आली असावी.

भारतीय महायुद्ध सुमारे इ स. पू. १४०० पूर्वी झाले असावे असे दिसते. ते युद्ध होण्यापूर्वी जीं अनेक राजघराणीं उत्तर हिंदुस्थानात राज्य करीत होतीं त्याच्या ९०–९५ पिढ्याचा त्रोटक इतिहास काही पुराणामध्यें आढळतो. ज्या पुराणामध्ये हा इतिहास आढळतो, तीं पुराणे बरींच अलीकडचीं, म्हणजे इसवी सनाच्या चवथ्या शतकात लिहिलेलीं आहेत, तेव्हा त्यामध्ये दिलेला इ. स. पू २००० ते ३००० वर्षाचा हा इतिहास कितपत विश्वसनीय असेल हा एक विचाराचा प्रश्न आहे पुराणातील या इतिहासाप्रमाणे काशीस भारतीय युद्धा-पूर्वी ७०–८० पिढ्यापर्यंत मनुवंशातील एक राजघराणे राज्य करीत होते. या घराण्यात पुरूरवस्, आयु, नहुष वगैरे प्रख्यात राजे होऊन गेले, या घराण्यातील आठवा राजा काश हा होता, व त्याच्या नावावरून काशीचे काशी हे नाव पडले असे एका ठिकाणीं लिहिले आहे काश राजापुढे सहा पिढ्यानीं दिवोदास राजा राज्यावर आला हा दिवोदास व काशीखडातील दिवोदास एकच कीं काय हे सागणे कठीण आहे. काशी-खडात दिवोदासाने देवाना हाकलून लावल्याचा जो वृत्तांत आहे,

त्याचा मागमूसहि या दिवोदासाबद्दल माहिती देताना इतर पुराणात आढळत नाहीं एका शापामुळे दिवोदासास आपली राजधानी काशी सोडावी लागली त्याने आपल्या राज्याच्या पूर्व टोकास गगा व गोमती याच्या संगमावर नवी काशी वसविली तो तिकडे गेल्यावर त्याची राजधानी काशी ही जबलपुरकडील हैहय वशातील भद्रश्येन नावाच्या राजाने जिंकून घेतली पण पुढे दिवोदासाचा मुलगा प्रतर्दन याने हैहय राजवंशाची काशींतून हकालपट्टी करून तेथे पुन्हा आपला जम बसविला

वर वर्णन केलेला वृत्तात भारतीय युद्धापूर्वी ५०—६० पिढ्यापूर्वींचा आहे तेव्हा तो कितपत खरा असेल याबद्दल काहींच सागता येत नाहीं पुराणामध्ये दिलेले हे राजे आर्यवशीय आहेत का द्रविडवशीय आहेत, याबद्दलहि मतभेद आहे तेव्हा पुराणामध्ये आढळून येणाऱ्या या वृत्ताताच्या खरेपणाबद्दल अद्याप काहींच नक्की सागता येत नाहीं.

काशीमध्ये आर्यधर्माचा प्रवेश बऱ्याच उशीरा झाला व तेथे पूर्वी अनेक शतके आर्येतर सस्कृतीचे राजे राज्य करीत होते हे आपण वर पाहिलेच आहे. शतपथब्राह्मण नावाच्या (इ स. पू तेराव्या शतकात लिहिल्या गेलेल्या) ग्रथावरून काशीमध्ये

आर्यधर्म प्रविष्ट झाल्यावर प्रथम बरींच वर्षे त्याच्या यज्ञयागादिकावर काशीकराचा दृढ विश्वास नव्हता असे दिसते वैदिक धर्माचा स्वीकार केल्यावर काशीच्या राजघराण्यातील धृतराष्ट्र नावाच्या राजाने अश्वमेध यज्ञास सुरुवात केली पण भरत घराण्यातील शतानीक सत्राजित् नावाच्या राजाने त्याच्या सैन्याचा पराभव करून अश्वमेधाचा घोडा पळवून नेला, त्यामुळे तो यज्ञ तसाच अपुरा राहिला. या दुर्दैवी घटनेमुळे धृतराष्ट्र राजाचा वैदिक धर्मावरील विश्वास उडाला, व त्याने व त्याच्या प्रजेने अग्निहोत्र पाळणे बद करून टाकले

विष्णुपुराण भाग ५, अध्याय ३४ मध्ये ज्या पौंड्रक नावाच्या राजाचा उल्लेख केला आहे, तोहि याच सक्रमण-कालाच्या सुमाराचा असावा त्याने श्रीकृष्णाचीं कौस्तुभ, सुदर्शन, वगैरे चिह्ने स्वत वापरण्यास सुरुवात केली व श्रीकृष्णास लढा-ईस आह्वान दिले या लढाईत पौण्ड्रकाचा पराभव होऊन तो मारला गेला. पुढे त्याच्या मुलाने आर्येतराचा मुख्य देव जो महादेव त्याची आराधना करून त्यापासून एक कृत्या मिळविली व तिला श्रीकृष्णाच्या द्वारकेचा नाश करण्यास पाठविले श्रीकृष्णाने आपले सुदर्शन चक्र त्या कृत्येवर सोडले व ती त्यापुढे भिऊन जाऊन परत पळत काशीस गेली. तेथे सुदर्शन चक्राने प्रथम

त्या कृत्येचा नाश केला व मग काशीनगराचा, त्यातील धन, धान्य, वाडे व लोक या सर्वासह, जाळून फन्ना उडविला या दतकथेवरूनहि काशींतील आर्यपूर्वकालीन लोकाचा व आर्याचा बराच घनघोर रणसग्राम पुष्कळ वेळ चालला असावा असे दिसून येते

असो. शतपथ ब्राह्मणाच्या कालानतर म्हणजे, इ स पू १३०० च्या पुढे लवकरच काशीचे राजघराणे व लोक यानीं वैदिक धर्माचा व त्यातील यज्ञयागादिकाचा स्वीकार केला आर्यलोकानींहि काशीकराच्या महादेवाचा आपल्या धर्मात प्रवेश करून घेऊन दोन्ही धर्माचा व सस्कृतींचा मिलाफ होणे सुकर केले उपनिषत्कालामध्ये काशीचे राजघराणे आर्यधर्मप्रेमी असलेले आढळून येते तेथे अजातशत्रु नावाचा जो राजा राज्य करीत होता तो स्वत विद्वान् व धार्मिक असून आपल्या दरबारीं विद्वान् लोकाना पोसण्यास उत्सुक असे असे बृहदारण्यक उपनिषदावरून दिसते. जनकाच्या दरबारी जसा तत्त्वज्ञानाचा खल होई, तसा आपल्या दरबारीहि तो व्हावा अशी त्याची फार इच्छा होती याच करिता त्याने आपल्या दरबारीं अनेक विद्वान् ठेवले होते

काशी, कोशल म्हणजे हल्लींचा औध प्रात, मगध

म्हणजे बिहार प्रात व विदेह म्हणजे दरभंग्याच्या आसपासचा प्रदेश, या प्रातातील लोकानीं वैदिक धर्माचा स्वीकार एकाच शतकामध्ये केला असावा असे दिसते. काशी. अग, विदेह व मगध या राजाचा जलजातूकर्ण्य हा पुरोहित होता असे विधान शाख्यायन श्रौतसूत्रात आढळते ऐतिहासिक दृष्ट्या या विधानाचा अर्थ जलजातूकर्ण्य याने प्रथम वैदिक धर्माचा प्रचार या प्रदेशात केला व त्याला व त्याच्या वशजाना या प्रातातील लोक फार मान देत होते असा होतो ही घटना इ स पू सुमारे १२००-१००० वर्षाचे सुमारास झाली असावी असे दिसते

भारतीय युद्धानतरहि १५ पिढ्यापर्यत मगधमध्ये बृहद्रथ राजघराणे राज्य करीत होते पण या कालीं या घराण्याच्या ताब्यात बनारस नव्हते इ स पू आठव्या सातव्या शतकाच्या सुमारास बनारसमध्ये ब्रह्मदत्त राजघराणे राज्य करीत होते त्यावेळीं बनारसची चागली भरभराट होत होती. ब्रह्मदत्त घराण्याचे उत्तरेकडील कोशल घराण्याशीं पुष्कळदा युद्ध होत असे, त्यामध्ये कधीं काशीचा तर कधीं कोशलचा विजय होई पण अखेर कोशलच्या सत्तेपुढे बनारसचा पूर्ण पाडाव झाला. बुद्धजन्मसमयीं ( सुमारे इ स पू ५६० ) बनारस प्रात कोशलच्या

राज्यास जोडला गेला होता काशी राष्ट्र हे त्यावेळीं जरी स्वतंत्र राज्य नसले तरी बनारस शहर हे त्यावेळीं उत्तर हिंदुस्थानातील पाचसहा प्रख्यात शहरांत मोडत असे.

हल्ली आपण काशी व वाराणसी ऊर्फ बनारस हे शब्द समानार्थाने वापरतो पण इ स पू सातव्या शतकात व त्यानंतरहि बरींच शतके काशी हा शब्द ज्या राज्यात किंवा प्रदेशात हल्लींचे वाराणसी क्षेत्र वसले होते त्या राज्यास व वाराणसी ऊर्फ बनारस हा त्या राज्याच्या राजधानीचे शहर—ज्यास आपण हल्ली श्रीक्षेत्र काशी म्हणतो—त्यास, लावीत असत या पुस्तकामध्ये हे दोन्ही शब्द समानार्थाने वापरले आहेत.

कोशलचे राज्य इ स पू ५७५ च्या सुमारास, कमजोर बनत चालले होते व त्यावेळीं मगधच्या राज्याचा उदय होत होता इ स पू ५५० च्या सुमारास काशी मगधच्या अमलाखालीं गेली पुढे १५० वर्षांनीं काशीच्या सरदार घराण्यातील शिशुनाग नावाच्या वीराने मगधची राजधानी जे राजगृह शहर ते जिंकून तेथे आपली सत्ता स्थापली शिशुनाग घराण्याच्या अमलाखाली मगधची सत्ता हल्लींच्या संयुक्त प्रांतभर पसरली होती. हे घराणे मूळचे काशीचे असल्यामुळे काशी ही बहुतेक मगधसाम्राज्याची दुय्यम राजधानी असावी

उपनिषत्काळामध्ये अजातशत्रूच्या कारकिर्दींत काशी शहर हे विद्वानाचे आगर बनत चालले होते हे आपण वर पाहिलेच आहे बुद्धाने आपल्या धर्मप्रसारास काशीजवळील सारनाथ मठातच सुरवात केली; त्याचे कारणहि त्या वेळीं काशी हे महत्त्वाचे विद्याकेंद्र होते हेच असावे पण इ. स. पू. सातव्या शतकात वायव्य सरहद्द प्रातांतील तक्षशिला शहर हे काशीपेक्षाहि महत्त्वाचे व ख्यातीचे विद्याकेंद्र होते. तेथे अभ्यास करण्यास पुष्कळदा काशीचे राजपुत्र जात असत. तक्षशिलेहून पढून आलेले विद्यार्थी काशीमध्ये नवीं विद्यालये उघडत असत व त्यामुळे काशीची विद्याकेंद्राबद्दलची कीर्ति वाढत चालली होती

इ स पू चवथ्या शतकात काशीचा अंतर्भाव मौर्यांच्या साम्राज्यात झाला अशोकाच्या कारकिर्दींत (इ स पू सुमारे २६९—२३२) काशीकडे साम्राज्यसरकारचे विशेष लक्ष वेधले, कारण काशीस लागून असलेल्या सारनाथच्या वनात बुद्धाने धर्मप्रसारास प्रथम सुरवात केली होती अशोकाने तेथे बौद्ध भिक्षूस राहण्याकरिता मठ बाधले व बुद्धाच्या स्मरणार्थ एक स्तूप उभारला. या बद्दलची अधिक माहिती पुढें तिसऱ्या प्रकरणात मिळेल.

इ. स पू २०० च्या सुमारास मौर्य साम्राज्य मोडकळीस

आले व शुंग साम्राज्य स्थापन झाले. त्यावेळीं काशी ही शुंगाच्या अंमलाखालीं गेली इ स पू १०० च्या सुमारास प्रयागपासून ४० मैलावर असणाऱ्या कोशाम्बीच्या राजघराण्याच्या ताब्यात काशी गेली या घराण्यातील अश्वघोष नावाच्या राजाचा लेख सारनाथ येथील अशोकाच्या शिलास्तंभावर सापडला आहे इ स. च्या पहिल्या शतकाच्या अखेरीस जवळ जवळ सर्व उत्तर हिंदुस्थानावर मध्य एशियामधील कुशाण नावाच्या जातीच्या लोकाचे राज्य स्थापले गेले प्रख्यात कनिष्क राजा हा याच वशांतील होता त्यानें सुमारे इ स ७८ चे पुढे ४० वर्षे राज्य केले त्याचा अमल बिहारपर्यंत पसरला असल्यामुळे काशीचाहि अतर्भाव त्याच्या राज्यातच होत असे. इ. स. ८१ मध्ये काशी प्रातवर वनष्पर व खरपल्लाण नावाचे अधिकारी त्याच्यातर्फे राज्य करीत असल्याचा उल्लेख सारनाथमधील एका कोरीव लेखात आढळतो कुशाणाचे परकी राज्य गुप्त साम्राज्याचा सस्थापक चद्रगुप्त याने चवथ्या शतकात पूर्व हिंदुस्थानांत नामशेष केले. गुप्त साम्राज्यात काशीचा अतर्भाव इ. स. ३२५ ते ५२५ पर्यंत झाला होता.

मौर्य साम्राज्यापासून ते गुप्त साम्राज्यापर्यंतचा काल काशीस भरभराटीचा गेला. या कालात बौद्धधर्माचा प्रसार

झपाट्याने होत होता व काशीजवळचें सारनाथ हे बौद्ध लोकाचे महाक्षेत्र होते तेथे भगवान् बुद्धाने स्वधर्म प्रचारास पहिल्या प्रथम सुरवात केली होती, म्हणून बौद्धधर्मीयास ते फार पवित्र वाटे, व तेथे सर्व ठिकाणचे बौद्ध लोक यात्रेस येत असत त्यामुळे खुद्द काशी शहरात व त्यास लागून असलेल्या सारनाथमध्ये अनेक बौद्धमंदिरे व मठ बाधण्यात येऊ लागले इ स च्या प्रारभापासून बोद्धधर्मात मूर्तिपूजेचा प्रसार झाला व सारनाथच्या मठाकरिता अनेक मूर्तींची गरज पडू लागली प्रथम प्रथम या मूर्ती मथुरेहून आणण्यात येत, पण लवकरच काशीस शिल्पकलेची प्रगति होऊ लागली व काशी हे एक त्या कलेचे आगर बनले गुप्तकालामध्ये (इ स ३२०–५२५) जरी सामान्यत बौद्धधर्माची पिछेहाट होत होती, तरी काशीमध्ये बौद्ध शिल्पकला झपाट्याने प्रगति पावत होती शिल्पकलेप्रमाणे वाङ्मय, तत्त्वज्ञान इत्यादि विषयाच्या अध्ययनाचे केद्रहि यावेळीं काशीस असे तक्षशिलेस विद्यार्थ्याच्या शिक्षणाची कशी सोय असे याची जशी माहिती मिळते, तशी काशीसबंधी मात्र मिळत नाहीं या कालामध्ये व पुढेहि, काशीस हल्लींच्या धर्तीचीं विद्यालये नव्हतीं हल्लीं शिक्षणसस्था मोठ्या असतात एका संस्थेमध्ये अनेक शिक्षक शिकवीत असतात, व ते सर्व ठराविक अभ्यासक्रम शिकविण्याचे

काम सामुदायिक जबाबदारीने पार पाडतात काशीस अशा तऱ्हेची व्यवस्था कधींच नव्हती तेथे मोठे विद्वान् पंडित रहात असत व ते आपापल्या वैयक्तिक जबाबदारीवर १०-१२ विद्यार्थी आपल्याकडे शिक्षणास ठेऊन घेत ज्या विद्यार्थ्यास जितके शिकावयाचे असे, तितके शिकून तो आपल्या घरीं निघून जाई वाङ्मय व ताम्रपट यावरून काशीच्या शिक्षण-विषयक परिस्थितीसंबधीं काहींच माहिती मिळू नये ही दुःखाची गोष्ट होय, पण काशी हे गुप्तकालापासून महत्त्वाचे विद्याकेंद्र होते यात संशय नाहीं आठव्या शतकामध्ये शंकराचार्या-सारख्या विद्वानाना देखील आपल्या ग्रंथाबद्दल मान्यता मिळ-वण्यास काशीस यावे लागले महंमद गझनीच्या स्वारीनंतर पंजाब, काश्मीर इकडील विद्वान् काशीस येऊन राहू लागले त्यामुळे विद्याकेंद्र म्हणून काशीची कीर्ति अधिकच वाढली.

गुप्ताचे साम्राज्य मोडल्यावर सुमारे इ स ५४० ते ६०६ पर्यंत काशीवर कनोजच्या मौखरी राजाचा अमल होता त्यानंतर हर्षवर्धनाचे राज्य काशीवर चाळीस वर्षे होते इ स ६५० ते ७८० पर्यंतचा काशीचा इतिहास विशेषसा माहीत नाहीं. इ. स ७६० च्या सुमारास बंगालच्या धर्मपाल राजाच्या ताब्यात बनारस गेले, पण पुढे नवव्या शतकात कनोजच्या

प्रतिहार राजानीं काशी जिंकून आपल्या राज्यास जोडली. त्याचा अंमल काशीवर सुमारे १५० वर्षे होता. या राजवटींत बनारस हें जिल्ह्याचे ठिकाण असून प्रयाग हे भुक्तीचे, म्हणजे हल्लींच्या कमिशनरच्या हुद्याच्या अंमलदाराच्या कचेरीचे, ठिकाण होते राजकीय दृष्ट्या जरी बनारसचे महत्त्व कमी झाले असलें तरी शैक्षणिक दृष्ट्या ते महत्त्वाचे केन्द्र होते. हिंदु लोकापासून ज्योतिष शिकण्याकरिता आलेला अबू मशार नावाचा आरब विद्वान् येथेच दहा वर्षे अध्ययनाकरिता इ स ८५० च्या सुमारास राहिला होता

अत्तरे, तेले, तलम रेशमी कापड व शिल्पकाम याबद्दल बनारस हल्लीं प्रसिद्ध आहे, शिल्पकलेची प्रगति बनारसमध्ये इ. स. च्या चवथ्या शतकापासून झाली हे आपण वर पाहिलेच आहे. अत्तरे, तेले व तलम कापड याचे कारखाने बनारसमध्ये बुद्धजन्मपूर्वकालापासून चालू होते हिंदुस्थानातील सर्व प्रातातील हौशी लोक बनारसचेच तलम कापड वापरीत असत असे आपणास प्राचीन बौद्ध ग्रथावरून दिसून येते बनारसचीं तेले व अत्तरेंहि हल्लींप्रमाणे बाहेर पाठविलीं जात. हस्तिदती काम हल्लीं बनारसला होत नाहीं. पण जातककालीं त्याबद्दलहि बनारसची प्रसिद्धि होती. राजधानीचे किंवा प्राताधिकाऱ्याचे ठाणे,

विद्याकेंद्र, प्रख्यात व्यापारपेठ, महत्त्वाचे तीर्थ अशा अनेक कारणामुळे इ स. १००० पर्यंत बनारसची भरभराट होत होती.

# प्रकरण २ रें.

## मध्ययुगीन व आर्वाचीन इतिहास सुमारे १००० ते १९४०

गझनीच्या महंमदाच्या स्वाऱ्या ज्यावेळीं हिंदुस्थानावर होऊं लागल्या, त्यावेळीं कनोजच्या साम्राज्यावर प्रथम राज्यपाल व मग त्रिलोचनपाल हे राजे राज्य करीत होते कनोजच्या साम्राज्यास या पूर्वी बरींच वर्षे उतरती कळा लागली होती, व त्याच्याकडून मुसलमानी स्वाऱ्यास यशस्वीरीतीने तोंड देण्याचे काम होऊ शकले नाहीं इ. स १०१९ मध्ये महमदाच्या स्वारीपुढे साम्राज्याची राजधानी जे कनोज ते पडले. इ. स. १०२२ च्या स्वारींत महमदाने काशीच्या पूर्वेस १५० मैलावर असलेला कालंजर किल्ला सर करून त्या प्रदेशाकडील चंदेल्ल राजाचा चागला पराजय केला.

महमदाची एखादी स्वारी खुद्द काशीपर्यंत पोचली होती का नाहीं याबद्दल संशय आहे. महमदासारखा कडवा हिंदुधर्म-

द्वेषी मुसलमान काशी लुटून तेथील प्रसिद्ध देवालये व मूर्ती फोडण्यास फार उत्सुक असला पाहिजे यात सशय नाहीं

इ स. १०२६ सालचा एक शिलालेख सारनाथ येथे मिळाला आहे त्यामध्ये बगालच्या महीपालराजाने त्यासाली काशींतील ईशानाच्या देवळाचा व सारनाथ येथील बौद्ध मठाचा जीर्णोद्धार केल्याचा उल्लेख सांपडतो. महमदाच्या कनोज-कालंजरकडील स्वाऱ्यानतर ७-८ वर्षात या जीर्णोद्धाराची जरूर भासली, यावरून महमदाच्या स्वारीची झळ बनारसला लागली असावी अशी शका वाटू लागते ऐनी अकबरीमध्ये कनोज व कालजर याच्या पाडावानतर महमद काशीपर्यत चाल करून गेल्याचा उल्लेख आढळतो पण ऐनी अकबरी हा सोळाव्या शतकातील ग्रथ आहे, व समकालीन मुसलमान इतिहासकार इ स १०३३ मध्ये प्रथम काशी हे मुसलमाना-कडून लुटले गेले असे म्हणतात महमद गझनीसारखा कडवा जेता कालंजरपर्यत आल्यावर बनारस लुटल्याशिवाय राहिला नसेल असे वाटून ऐनी अकबरीमधील विधान केले असावे. सृष्टिनियमानुसार पडलेल्या देवळाचा महीपाळ राजाने १०२६ साली जीर्णोद्धार केला असावा.

महमदाच्या मृत्युनंतर तीन वर्षानी म्हणजे इ. स १०३३

मध्ये, अहमद नियाल्तगीन याने बनारसवर हल्ला केला. यावेळीं बनारसवर चेदीच्या गागेय राजाचा अमल होता. मुसलमानी इतिहासकारच कबूल करितात कीं अहमद नियाल्तगीन यास सकाळपासून दुपारपर्यंतच बनारस लुटता आले, पण तेवढ्या अवधींत त्यास बाजारपेठेत मोठी लूट मिळाली. अहमद नियाल्तगीन याने काशीवर अचानक छापा घातला असावा, व त्याची बातमी कळताच त्यावर हल्ला करून गागेयदेवाच्या सैनिकानीं त्यास हाकलून लावले असे दिसते. पण यावरून हिंदु लोक यावेळेस किती गाफील तऱ्हेने राज्य करीत हे चागले दिसून येते

इ. स १०८० च्या सुमारास कनोजला गहडवालाचे राज्य स्थापन झाले. या राज्याची काशी हीच प्रथम राजधानी होती गहडवालानीं पुढे कनोजहि जिंकले, व ते शहर अनेक शतके हिंदु साम्राज्याची राजधानी असल्यामुळे आपली राजधानीहि तेथे नेली तथापि ते काशीस वर्षातून बरेच दिवस रहात असत. मुसलमानी इतिहासकार तर त्याचा काशीचे राजे म्हणूनच उल्लेख करतात त्यामुळे बाराव्या शतकामध्ये काशीची बरीच भरभराट झाली. काशीस गगेमध्ये स्नान करून तेथील निरनिराळ्या घाटावर या घराण्यातील राजानीं व राण्यानीं

ब्राह्मणादिकास दिलेल्या दानाचे बरेच ताम्रपट मिळाले आहेत. एका ताम्रपटामध्ये इ. स. ११७५ मध्ये काशींतील हृषीकेश पंडितास दान दिलेले आढळते. तो काशीतील नामांकित अध्यापकापैकीं असावा. काशीची विद्याक्षेत्र म्हणून या वेळीं मोठी प्रसिद्धि होती.

शहाबुद्दीन घोर या पठाण राजाच्या स्वारीच्या वेळीं गहडवाल वंशाचा जयचंद्र राजा कनोजला राज्य करीत होता. त्याचा मुसलमानाच्या स्वारीपुढे टिकाव लागला नाहीं ११९३ मध्ये मुसलमानानीं कनोज जिंकले व पुढे लगेच त्यानीं बनारसकडे मोर्चा फिरविला. बनारस काबीज करण्याचे काम शहाबुद्दीनने कुतुबुद्दीन ऐबक या सेनापतीकडे सोपविले होते त्याने ११९४ मध्ये बनारस जिंकले, तेथील १००० देवालये पाडून त्याच्या चबुथऱ्यावर मशिदी बांधल्या व शहर लुटून उध्वस्त केले. जीं हीं १००० देवालये पाडलीं त्यामध्ये श्रीविश्वेश्वराचेहि असावे बनारस हे त्यावेळीं किती संपन्न शहर होते याची कल्पना, बनारसची लूट वाहून नेण्यास १४०० उंट लागले, यावरून येईल.

पठाण अमलामध्ये बनारसचे वैभव बरेच नष्टप्राय झाले. काशी हे मूर्तिपूजकाचे क्षेत्र असल्यामुळे स्वाभाविकच त्याची

लूट व जाळपोळ मधून मधून पुष्कळ वेळ झाली. अल्लाउद्दीन खिलजीनेहि काशीचीं देवळे पाडली असावींत, कारण तो पक्का हिंदुद्वेष्टा व कडवा मुसलमान होता. जौनपुर येथील लाल दरवाजा मशिदींत काशीविश्वेश्वराजवळ इ स. १२९६ सालीं बांधलेल्या पद्मेश्वराच्या देवालयातील एक कोरीव शिलालेख सापडलेला आहे. ही मशीद १४५० च्या सुमारास बांधण्यात आली होती, त्यावरून जौनपुरच्या शर्की घराण्याच्या अमदानींत बनारसचीं देवळे पाडण्यात येऊन त्याचे दगड जौनपुरच्या नव्या राजधानींतील मशिदी बांधण्यास गाड्या भरून नेण्यात आले हे उघड आहे.

सुमारे इ. स १३०० सालपासून काशी हे मुसलमानी अमलामध्ये प्रांतिक सरकारचे ठाणे राहिलें नाही. गाझीपुर किंवा जौनपुर येथे मुसलमानी प्रांताधिकारी रहात. त्यामुळेहि बनारसचे राजकीय महत्त्व कमी झाले. इ. स. १३९४ ते १४७४ पर्यंत जौनपुरला शर्की घराणे राज्य करीत होते. त्याच्या ताब्यामध्ये काशी होती. ते घराणे नष्ट झाल्यावर १४७४ सालीं बहलोल लोदीने काशीवर आपला अंमल बसविला. लोदी घराण्याचा जेव्हा बाबरने पाडाव केला, तेव्हा थोडे दिवस बाबरचा अमल बनारसवर बसला. पण पुढे

लवकरच शेरशहाने काशी प्रांत जिंकून आपल्या बहारच्या राज्यास तो जोडला.

पुढे हुमायून व शेरशहा यामध्ये जेव्हा युद्ध सुरू झाले, तेव्हा शेरशहास प्रथम काशी सोडून बिहारकडे परत जावे लागले. या युद्धामध्ये काहीं काळ हुमायूनने आपले मुख्य ठाणे काशीस ठेवले होते शेरशहाने बिहार प्रांत हुमायूनास द्यावा, व त्याच्या ऐवजीं हुमायूनने शेरशहास बंगालवर राज्य करूं द्यावे असा जो त्या दोघामध्ये तह झाला होता, तो काशीसच झाला पण लवकरच हुमायूनचे मन फिरले, व बंगालप्रांताची राजधानी जे गौड शहर त्यास त्याने वेढा दिला. शेरशहाने त्याच्या पिछाडीवर हल्ला करून काशी काबीज केली, तेथील मोगल अमलदारास मारून टाकले, व कनोजपर्यंतच्या मुलुखावर आपला ताबा बसविला शेरशहाच्या या विजयामुळे हुमायूनचे धाबे दणाणले व त्याने आग्र्याकडे परतण्यास सुरवात केली. वाटेत शेरशहाने शहाबाद जिल्ह्यातील चौन्सा गावाजवळ हुमायूनचा पराभव केला व पुढे लवकरच बनारसहि कायमचे त्याच्या ताब्यात गेले

शेरशहाच्या मुलापासून १५५९ सालीं बनारस अकबरने जिंकून घेतले, पण ज्या खान झमान नांवाच्या सेनापतीने

अकबराकरिता बनारस जिंकले, त्यानेच पुढे अकबराविरुद्ध बंड केले त्यामुळे अकबरास स्वत बनारसवर चाल करावी लागली त्याने खान झमानचा पराभव करून त्याचा वध केला, व बनारसच्या लोकांनीं त्यास मदत केली म्हणून ते शहर लुटून टाकले.

बनारसवरील हा अकबराचा रोष फार वेळ टिकला नाहीं, खान झमान बरोबर तो नाहींसा झाला अकबराचे धार्मिक धोरण सर्व धर्मांना आपल्या राज्यात सुखाने राहू देण्याचे होते, त्यामुळे त्याच्या अमलात बनारसमधील देवळावर पुन्हा नागर फिरले नाहींत उलट त्याने हिंदुलोकाना तेथे नवीन देवळे बांधण्यास परवानगी दिली त्याचा मुलगा जहांगिर हाहि फारसा कडवा हिंदुद्वेष्टा नव्हता त्यामुळे या दोन कारकिर्दीमध्ये बनारस येथे नवीन देवळे बांधण्यात येऊ लागलीं अकबराचा प्रसिद्ध राजपुत सेनापति मानसिंग याने अकबराच्या कारकिर्दींत काशीस मानमंदिर व मानसरोवर हीं दोन बांधून काढिलीं विश्वेश्वराच्या देवळाचा जीर्णोद्धार राजा तोडरमल्ल याने १५८० च्या सुमारास केला त्याची अधिक माहिती पुढील प्रकरणात देण्यात येईल

शहाजहानच्या कारकिर्दींत हे परधर्मसहिष्णु धोरण बदलले. अकबरी धोरणाचा फायदा घेऊन मूर्तिपूजक मुसलमानी

साम्राज्यात अनेक देवळे बांधीत आहेत, अशी जेव्हा मौलवींनीं शहाजहानकडे तक्रार केली, तेव्हा त्याने देवळाचीं चालू असलेलीं बांधकामे ताबडतोब बंद करण्याबद्दल फर्मान काढले त्यामुळे काशी जिल्ह्यात ७६ देवळाचीं चालू बांधकामे थाबवावीं लागलीं या देवळापैकी बरीचशीं देवळे बहुतेक काशी शहरातीलच असावींत.

अशा तऱ्हेने सम्राटाची वक्रदृष्टि जरी काशीवर वळली, तरी त्याच्या एका मुलाकडून काशीकरावर थोडेसे उपकार झाले हा मुलगा म्हणजे युवराज दारा शिकोह हा होय काशीमधील १५० संस्कृत पंडिताच्या सहाय्याने त्याने उपनिषदाचे पर्शियन भाषेमध्ये भाषांतर करविले या भाषांतराचे काम दाराच्या मृत्यूच्या थोडेसे पूर्वी म्हणजे जून १६५७ मध्येच संपले होते. दाराच्या संस्कृत विद्येवरील प्रेमाचा काशीकर विद्वानास बराच फायदा झाला त्याने करविलेले हे उपनिषदाचे संस्कृत भाषांतर ऐतिहासिक दृष्ट्या फार महत्त्वाचे आहे. या पर्शियन भाषांतरावरूनच पुढे उपनिषदाचे लॅटिन भाषेत भाषांतर झाले, व या लॅटिन भाषांतरावरूनच शोपेनहॉर वगैरे अनेक युरोपियन तत्त्वज्ञान्यास उपनिषदातील तत्त्वज्ञानाची प्रथम माहिती मिळाली प्रथम संस्कृतमधून पर्शियनमध्ये व मग पर्शियनमधून लॅटिन-

मध्ये झालेले हे भाषांतर बरेच सदोष होते, तरी देखील त्यातील तत्त्वज्ञानाच्या विवेचनाने शोपेनहॉर इतका थक्क होऊन गेला कीं उपनिषदे म्हणजे मानवी तत्त्वज्ञानाची पराकाष्ठा होय असे त्याने उद्गार काढले असो राजपुत्र दारा हा काशीमध्ये काही दिवस राहिला होता, व त्याच्या नावावरून बनारसमधील एका मोहल्याचे नाव दारानगर असे पडले आहे

शहाजहान पदच्युत झाल्यावर जेव्हा त्याच्या चार राजपुत्रांत राज्य मिळविण्याबद्दल लढाया सुरू झाल्या, तेव्हाहि दारा काशीसच होता १६५७ सालीं त्याचा भाऊ बंगालचा सुभेदार सुजा याने त्याजवर हल्ला केला, पण दाराचा सेनापति जयसिंग याने त्याचा भद्रापुर येथे पराभव केला १६५८ सालीं दारा आग्र्याकडे कूच करून गेला, पण तेथे त्याचा पराभव होऊन पुढे लवकरच त्याचा वधहि झाला. दाराचा पराभव झाल्यावर सुजाने बनारस काबीज केले, व तेथील व्यापाऱ्याकडून तीन लाख रुपयाचे 'कर्ज' सक्तीने वसूल केले. पण पुढे लवकरच सुजाचाही अवरंगजेबाने पराभव केला व अखेर अवरंगजेबाच्या ताब्यात मोगल साम्राज्य गेलें, व काशीवरहि त्याचा अंमल सुरू झाला आपल्या कारकिर्दीच्या पहिल्या दहा वर्षांत त्याने आपले हिंदुद्वेषी धोरण फारसे

अंमलात आणले नाहीं पण जेव्हा त्याचा बाप वारला, व आपले आसन आता स्थिर झाले अशी त्याची खात्री झाली, तेव्हां त्याने हिंदूंचा छळ करण्यास प्रारंभ केला. हिंदु धर्म व विद्या याचे आगर काशी असल्यामुळे काशीवर त्याचा विशेष रोष होता. १६६९ सालीं त्याने विश्वेश्वराचे भव्य मंदिर पाडून टाकून त्याच जागेवर त्याच देवळाचे दगड वापरून मशीद बांधली बिंदुमाधव देऊळहि पाडून तेथे मोठे उंच मनोरे बांधले. या दोन प्रसिद्ध देवळाची जेव्हा अशी स्थिती झाली, तेव्हा इतर शेकडो हिंदु देवळेहि पाडलीं गेलीं असावींत यात शंका नाहीं. आजची वस्तुस्थिति अशी आहे कीं अवरंगजेबाच्या पूर्वींच्या कालचीं देवालये काशींत बहुधा नाहींतच म्हटले तरी चालेल राजघाट, बकरिया कुंड, लाटभैरव वगैरे भागामध्ये ज्या प्राचीन देवळाच्या जागा आहेत, त्या सर्व जागावर जुन्या देवळाच्या दगडानीं बांधलेल्या मशि-दीच आढळतात.

अवरंगजेब काशीचीं देवळेच पाडून थांबला नाहीं त्याने तिचे नावहि बदलून महमदाबाद असे नवे मुसलमानी नाव तिला ठेवले. काशीमध्ये एक मोगल टांकसाळ होती, तींत पाडलेल्या नाण्यावर व सरकारी कागदपत्रांमध्ये या नावानेच काशीचा

उल्लेख होऊं लागला पण हे नवीन इस्लामी नाव रूढ झालें नाहीं, व अवरंगजेबाबरोबर तेंहि मरून गेलें

शेडवळकराच्या भोसले बखरीमध्ये काशीसंबंधी एक मजेदार उल्लेख आढळतो या बखरीमध्ये शिवाजी महाराज हे आग्र्याकडे अवरंगजेबाचे भेटीस ज्यावेळीं निघाले, त्यावेळीं जाताना वाटेत प्रथम प्रयागास एक दिवस, व मग काशीस बरेंच आठवडे राहिले असें विधान आढळतें. महाराजाच्या काशीवासाची बरीच सविस्तर माहिती या बखरींत दिलेली आहे. महाराजानीं काशीच्याजवळच आपला डेरा केला होता तेथे सोनोपत नावाच्या विद्वान् पंडिताने त्याची भेट घेतली, व त्याची सरभराई ठीक व्हावी म्हणून काशीच्या व्यापाऱ्याना तेथे नवी दुकानें बसविण्यास त्यानें सांगितलें व त्यानींहि त्याप्रमाणें केलें जे व्यापारी, कामकरी वगैरे तेथें राहण्यास आले, त्यानीं तेथेच कायमचीं घरें बांधलीं, व त्या वसाहतीस शिवाजी महाराजाच्या नावावरून शिवपुर असें नाव पडलें शिवपुराहून महाराज नदीच्या ज्या घाटावर स्नानास जात, त्यासच पुढे राजघाट असें नाव पडलें. महाराजानीं शिवपुरास एका देवीची व पंचमुखी लिंगाची स्थापना करून त्या देवाजवळ एक विहीर बांधली, व तिच्या बांध-

कामातील एका दगडावर आपण ती बाधली असल्याबद्दल लेखहि लिहून ठेवला

बखरींतील ही हकीकत वरवर पाहिल्यास खरी वाटते पण पूर्ण चौकशीअती ती खोटी असल्याचे सिद्ध झाले आहे शिवपुर हे गाव शिवाजीपेक्षा फार प्राचीन आहे पचमुखी लिंगाजवळ जी विहीर शिवाजी महाराजानीं बाधविली असे बखरकार म्हणतो, त्या विहिरीवर कोरलेल्या लेखावरून ती विहीर कानपुरमधील एका हिंदु सस्थानिकाने इ स १५८० मध्ये,—म्हणजे शिवाजीच्या जन्मापूर्वी पन्नास वर्षे—बाधविली होती असे दिसून येते शेडवळकराची बखर इ स १८५० च्या सुमारास लिहिली गेली तीमध्ये प्रतापसिह महाराजास इग्रजानीं पदच्युत करून काशीजवळील शिवपुरमधील एका बगल्यात नजरकैदेत ठेवले होते असा मजकूर आढळतो प्रतापसिहाबरोबर असणाऱ्या त्याच्या परिवारातील एकाद्या माणसाच्या डोक्यामध्ये शिवपुर व राजघाट या नावावरून शिवाजी महाराजाच्या काशीवासाची कल्पना आली असावी, व ती त्याने पुढे बखरकारास कळविली असावी शिवाजी महाराज आग्र्यास जाताना बऱ्हाणपुर, भोपाळ, ग्वाल्हेर, धोलपुर या मार्गाने गेले होते, ते वाटेत प्रयाग काशीकडे वळलेच नव्हते

परत येताना ते प्रयाग व काशी येथे थाबले होते, पण त्यावेळीं ते गोसाव्याच्या वेषात होते, व त्याच्या नावावरून शिवपूर व राजघाट हीं नावे, बखरकार म्हणतो त्याप्रमाणे, पडणे शक्य नव्हते

इ स १२०० ते १७०० पर्यतचा काल काशीच्या इतिहासात फार हलाखीचा गेला या कालात अनेकदा काशीची देवळे पाडण्यात आली मुसलमानी सत्ता जेव्हा प्रथम काशीस स्थापन झाली, तेव्हा बरेच पडित दक्षिणेत निघून गेले पण लवकरच चोहोकडे हिदुस्थानात मुसलमानी राज्य सुरू झाले, व त्यामुळे दक्षिणेकडील हा प्रवाह थाबला. तथापि राजाश्रय नसल्यामुळे सस्कृत विद्येस उतरती कळा लागली सतराव्या शतकामध्ये बर्नियर नामक फ्रेंच प्रवाशाने काशीचे वर्णन केले आहे तो म्हणतो, “ काशी हे एक विद्याकेंद्र आहे, पण तेथे युरोपासारखीं कॉलेजे नाहींत प्राचीन ग्रीस-मध्ये शहरातील निरनिराळ्या भागात शिक्षक विखुरले असून त्यापैकीं प्रत्येकजण जसे थोड्या थोड्या विद्यार्थ्यास शिकवी, तशीच काशींत स्थिति आहे काशींतील अध्यापक हे प्राय प्रत्येकीं ४ ते ६ व जास्तींत जास्त म्हणजे १५ विद्यार्थ्यांना शिकवितात विद्यार्थ्यांचे शिक्षण आस्ते आस्ते चालते, व

त्याच्यामध्ये विशेष हुरूप दिसत नाहीं अध्ययनात उत्कृष्ट यश मिळाले, तरी पुढे राजाश्रय व राजमान्यता मिळण्याचा बिलकुल सभव नसणे हे याचे मुख्य कारण होय "

सस्कृत विद्येस जरी उतरती कळा लागली होती, तरी तिची ज्योत काशीमध्ये या मध्ययुगात मदपणे तेवत होती पैठणहून काशीस येऊन राहिलेले भट्ट घराणे सोळाव्या शतकात सस्कृत विद्येबद्दल फार प्रसिद्ध होते या घराण्यातील नारायण-भट्टाने 'प्रयोगरत्नाकर,' त्याचा मुलगा शकरभट्ट याने 'द्वैत-निर्णय,' व नातू नीलकठभट्ट याने 'भगवद्भास्कर' हे ग्रथ सतराव्या शतकात लिहिले सतराव्या शतकात काशीमध्ये शुद्धाद्वैत मताचे प्रख्यात पुरस्कर्ते वल्लभाचार्य हे रहात असत त्याचे वास्तव्य हनुमान् घाटावर असे व त्याचे घर अद्याप दाखविण्यात येते याचवेळी प्रसिद्ध सिद्धांतकौमुदीचे कर्ते नागोजीभट्ट हे महाराष्ट्रीय ब्राह्मण काशीमध्ये आपली ग्रथरचना करीत होते अठराव्या शतकात नागोजीभट्टानीं काशीमध्ये 'शब्देन्दुशेखर,' 'परिभाषेन्दुशेखर' व रघुवीर पडितानीं 'मुहूर्तसर्वस्व' हे ग्रथ लिहिले काशीमधील पायगुडे नामक दुसऱ्या एका प्रसिद्ध महाराष्ट्रीय घराण्यातील वैद्यनाथ पायगुडे शास्त्री यानीं याज्ञवल्क्यस्मृतीवर फार विद्वत्तापूर्ण व

प्रख्यात टिका लिहिली शेष व धर्माधिकारी या आडनावाच्या महाराष्ट्रीय घराण्याचाहि पांडित्याबद्दल १६ व्या व १७ व्या शतकामध्ये काशींत मोठा लौकिक असे, व त्यातील निरनिराळ्या विद्वानानीं अनेक ग्रथ लिहिले आहेत मध्ययुगीन कालामध्ये अनेक पिढ्या काशीमधील पडितमडळींत अग्रपूजेचा मान महाराष्ट्रीय पडितानाच देत असत.

सस्कृत भाषेप्रमाणे या कालखडात लोकभाषेमध्येहि चागली ग्रथरचना काशीस झाली चवदाव्या शतकात रामानद व पधराव्या शतकात कबीर हे दोन मोठे साधुपुरुष बनारसमध्ये होऊन गेले त्याच्या भक्तियुक्त काव्याने हिंदी वाङ्मयात चागली भर पडली आहे कबीराची जन्मभूमि काशीच्या पचक्रोशीत आहे व त्याची समाधि खुद्द काशींत कबीरचौरा या मोहल्यात आहे कबीरानतर तुलसीदास हे प्रख्यात साधुपुरुष काशीमध्ये होऊन गेले इ स १६२३ मध्ये त्याचे काशीमध्ये देहावसान झाले. त्याचे वास्तव्य तुलसीघाटापाशीं असे, तेथे त्याच्या घरात अद्याप त्याच्या पादुका व नाव हीं दाखविण्यात येतात तुलसीदासाचे तुलसीरामायण हा एक अनुपम ग्रथ आहे तुलसीरामायण दररोज जितक्या लोकाकडून वाचले जाते, तितक्या लोकाकडून दुसरे कोणतेहि पुस्तक हिंदुस्थानात वाचले जात नाहीं

आतां आपण काशीच्या राजकीय इतिहासाकडे वळूं. अवरंगजेबाच्या मृत्यूनतर कांहीं वेळ मोगल राज्यात बजबजपुरीच माजली होती. अखेर १७२२ सालीं काशी प्रांत औंधचा नबाब सादतखान याच्या ताब्यात देण्यात आला. त्याबद्दल त्याने साम्राज्य सरकारास सालिना सात लाख रुपये खडणी देण्याचे कबूल केले होतें. सादतखानानें काशी प्रात मीर रुस्तुम या सरदारास लावून दिला, व त्याने त्याची व्यवस्था आपला विश्वासू हस्तक मानसाराम याकडे सोपविली जौनपुर, गाझीपुर, चुनार व मिर्झापुर या चार जिल्ह्याबद्दल मानसाराम याने १३ लाख रुपये खडणी देण्याचे कबूल केले. पुढे इ स. १७३० च्या सुमारास जेव्हा रुस्तुम अल्लीवर सादतखानाची वक्रदृष्टि झाली, तेव्हा मानसारामाने नबाबाकडून आपला मुलगा जो बलवंतसिंग त्याच्या नावाने जौनपुर, बनारस, व चुनार हे जिल्हे लावून घेतले, व तो या जिल्ह्याचा राजा बनला. महाराज मानसाराम हाच हल्लीच्या बनारसच्या राज्याचा सस्थापक होय तो १७३८ सालीं वारला.

मानसारामानतर त्याचा मुलगा महाराजा बलवंतसिंग हा गादीवर आला. बलवतसिंग हा फार कर्तबगार पुरुष होता. त्याने १७३८ ते १७७० पर्यंत राज्य केलें त्याच्या मनात

औधचे अधिराज्य झुगारून स्वत. स्वतंत्र राजा व्हावयाचे होते. अडचणीच्या प्रसंगीं उपयोगी पडावा म्हणून त्याने गंगापुरला एक मजबूत किल्ला बांधला. पुढे १७५२ सालीं काशीच्या पूर्वेस रामनगरचा प्रसिद्ध किल्लाहि त्यानेच बांधला. १७४८ साली राजा बलवंतसिंगाने आपले स्वातंत्र्य पुकारले पण बलवंतसिंगास नबाबाचा किंवा नबाबास बलवंतसिंगाचा पराभव करता आला नाही किल्ल्याचा आश्रय घेऊन बलवंतसिंगास नबाबाचे बेत हाणून पाडता येत १७६४ सालीं बक्सारच्या लढाईनंतर औधचा नबाब व इंग्रज यांच्या मध्ये जेव्हा तह झाला, तेव्हा बनारस प्रांत नबाबास देण्यात आला, पण त्याने राजा बलवंतसिंगास पूर्वीप्रमाणे बनारसवर सुभेदार ठेवावे अशी अट घालण्यात आली नबाबाने १७६७ व १७६८ सालीं बलवंतसिंगास पकडण्याचा प्रयत्न केला, पण त्यास यश आलें नाहीं.

इ स १७५१ च्या सुमारास जेव्हां मराठ्यांनीं औधच्या नबाबास मदत करून त्याचे शत्रू जे रोहिले त्यांचा पाडाव केला, तेव्हा त्यांचा बेत नबाबाकडून प्रयाग, काशी, अयोध्या व गया हीं चार प्रसिद्ध हिंदूचीं क्षेत्रे आपल्या ताब्यात घेण्याचा होता शिंदे होळकराच्या मनात बनारसची औरंग-

जेबानें बाधलेली मशीद पाडून विश्वेश्वराचे देवालय पुन्हा पूर्वीच्या जागीं बाधावयाचे होते पण मराठ्याना लगेच दिल्ली राजपुतान्याकडे जावे लागल्यामुळे त्याचा काशी आपल्या ताब्यात घेण्याचा बेत तसाच राहिला. मराठ्याचा मशीद पाडण्याचा बेत जेव्हा काशीच्या ब्राह्मणास कळला, तेव्हा त्याचे धाबे दणाणले. बादशहाच्या हुकुमाशिवाय हे कृत्य केले तर आपली पुढे कत्तल केली जाईल असे त्याना साहजिकच भय वाटले पण मराठ्याचा प्रत्यक्ष अमल काशीवर बसलाच नाहीं, व मशीद पाडण्याचा बेत मनोराज्यातच राहिला इंग्रजाच्या ताब्यात काशी गेल्यावरहि नाना फडणिसाने महादजी शिंद्याच्या मध्यस्थीने, मुसलमानास जरूर तर नुकसान भरपाई देऊन, मूळ जाग्यावर पुन्हा विश्वेश्वराचे देऊळ बाधण्याचा प्रयत्न केला, पण तो यशस्वी झाला नाहीं

राजा बलवंतसिंग १७७० सालीं वारला. त्याचा कायदेशीर वारसा त्याच्या मुलीचा मुलगा महीप नारायणसिंग याकडे जात होता. पण तो मुलगा फार लहान होता. बलवंतसिंगास चेतसिंग नावाचा एका रखेलीपासून झालेला मुलगा होता. त्याने नबाबास १७ लाख रुपये नजराणा देऊन दरसाला २॥ लाख रुपये अधिक खंडणी कबूल केली, व त्यालाच

अखेर गादी मिळाली. औंधचा नबाब सुजाउद्दौला व वॉरन् हेस्टिंग्ज या दोघांनीं १७७२ सालीं चेतसिंगाचा हक्क मान्य केला, व त्याने दरसाल २२॥ लक्ष रुपये खंडणी द्यावी असे ठरविले. १७७५ सालीं सुजाउद्दौला मरण पावला व असपुद्दौला हा नबाब झाला त्याने सक्तीच्या खुषीने बनारसवरील आपला हक्क इंग्रजांना देऊन टाकला इंग्रजांनीं चेतसिंगास बनारसच्या गादीची सनद दिली, व बनारसला आपला एक वकील ठेवला. बनारसचा इंग्रजाचा पहिला वकील फ्रॅन्सिस फौक हा वॉरन हेस्टिंग्जच्या उलट पक्षाचा होता, व चेतसिंग हा त्याच्या तत्राने वागू लागला.

पण लवकरच कलकत्याच्या कौन्सिलात वॉरन् हेस्टिंग्जचे मताधिक्य झालें त्याने लगेच काशीस फौकच्या ऐवजीं आपल्या पक्षाचा ग्रॅहॅम् हा वकील नेमला. हेस्टिंग्जच्या उलट पक्षाच्या तंत्राने चेतसिंग हा वागत होता, म्हणून ग्रॅहॅम्ने त्यास अनेक तऱ्हेने छळण्यास सुरुवात केली चेतसिंग हा आता भिऊन गेला, व त्याने ग्रॅहॅम् व त्याचे हस्तक सागतील त्याप्रमाणे निमुटपणे वागण्यास सुरुवात केली ग्रॅहॅमच्या हाताखालील लोकहि चेतसिंग याचेकडून अनेक तऱ्हेनें पैसे उकळूं लागले. मौलवी अलिउद्दीन या हस्तकावर ग्रॅहॅम्चा फार विश्वास होता,

म्हणून त्यास चेतसिंग हा महिन्यास ५०० रुपये देत असे मौलवी अलिउद्दीन हा किती कावेबाज होता हे खालील गोष्टीवरून दिसून येईल. एक दिवस तो चेतसिंगास म्हणाला, "ग्रॅहॅम्साहेबाची प्रकृति बिघडली आहे, व त्यास हकीमाने ४ शेर ताबड्या मुंग्याचीं टोकी ठेचून त्याच्या तेलातून औषध घेण्यास सांगितले आहे. तेव्हा इतक्या ताबड्या मुंग्या चार दिवसात पाठवून द्याव्या." इतक्या ताबड्या मुंग्या मिळवणे अशक्य होते, तेव्हा कसेहि करून हकीमाने हे औषध बदलावे अशी खटपट करण्याबद्दल अलिउद्दीनास चेतसिंगाने ३५०० रुपये दिले! हकीमाने हे औषध मुळीं सांगितलेच नव्हते, पण चेतसिंगाकडून पैसे उकळण्याबद्दल अलिउद्दीन याने ही शक्कल काढली होती

असो, अशा तऱ्हेने चेतसिंग विवंचनेत असताना फ्रान्स व इंग्लंड यामध्ये लढाई जुंपली, व फ्रेंचापासून ब्रिटीश मुलुखाचे संरक्षण करण्याकरिता इंग्रजाना सैन्यावर अधिक खर्च करणे भाग पडले. हे पैसे हेस्टिंग्जने आपल्या मांडलिकाकडून वसूल करण्याचे ठरविले, व चेतसिंगाकडून त्याने १७७८ सालीं ५ लक्ष रुपये अधिक खंडणी मागितली. ती त्याने होय नाहीं म्हणत कष्टाने दिली. १७७९ व १७८० सालीं पुन्हा

ही जादा खडणी मागण्यात आली; ती वसूल करण्यास इंग्रजाचे सैन्य दारात येऊन पोचल्यावर चेतसिंगाने नाइलाजाने ती दिली एवढ्यावर संतुष्ट न होता १७८१ साली हेस्टिंग्जने शिंद्याच्या विरुद्ध लढण्याकरिता २००० घोडेस्वाराची पलटण पुरवण्याबद्दल चेतसिंगास हुकूम फर्मावला. अखेर १००० घोडेस्वार पुरवावे अशी निकराची मागणी करण्यात आली, पण ती चेतसिंगाने पुरी केली नाहीं तेव्हा चेतसिंगाची खोड मोडण्याकरिता जुलई १७८१ मध्ये हेस्टिंग्ज हा स्वत बनारसला आला. त्याचा मुक्काम कबीरचौऱ्यामधील माधोदासाच्या बागेत होता. या बागेमध्ये ह ्रीं राधास्वामी सांप्रदायाचे मंदिर आहे

बनारसला चेतसिंग हा सिवाला घाटावरील आपल्या किल्ल्यात रहात असे तेथे त्यास हेस्टिंग्जने शिपायांच्या दोन पलटणी पाठवून १६ ऑगस्टला कैद केले ही बातमी कळताच रामनगरहून चेतसिंगचे सैन्य सिवाला घाटावर बोटीने आलें, व त्याने इंग्लिशाच्या पल्टणीस वेढा दिला इंग्रजाना आपल्या सामर्थ्याची व दराऱ्याची इतकी घमेंड होती कीं त्यानी ज्या पलटणी पाठवल्या होत्या, त्यातील शिपायाजवळ दारूगोळाहि दिला नव्हता ! ही चूक कळून येताच मेजर पोफॅम-

बरोबर दारूगोळ्यासह कुमक पाठवली गेली, पण ती पोचण्यापूर्वींच चेतसिंगच्या सैन्याने पहिल्या दोन पलटणींतील लोक व त्याचे गोरे अधिकारी यास कापून टाकले होते. मेजर पोफमचा चेतसिंगपुढे इलाज चालेना, व तो हताश होऊन परतला पण चेतसिंगास स्वतबद्दल आत्मविश्वास नव्हता. सिवाला घाटावरील खिडकीतून पागोट्याच्या साहायाने तो खालीं बोटींत उतरून रामनगरला गेला, व तेथून पुढे आपलीं बायकामुले व जडजवाहिर घेऊन तो आपल्या लतिफपुरच्या किल्ल्याच्या आश्रयास गेला.

वॉरन हेस्टिंग्जने रामनगर किल्ला घेण्याचा प्रयत्न केला, पण चेतसिंगाच्या सैन्यापुढे त्याची डाळ शिजली नाहीं. या प्रयत्नात इंग्रजाचे बरेच सैन्य व अधिकारी गारद झाले. वॉरन् हेस्टिंग्ज जवळ ४५० च सैन्य होते, रामनगर घेण्याचा प्रयत्न फसल्यावर तोहि चेतसिंगाप्रमाणे घाबरला, व रातोरात चुनारला पळून गेला. पावसाळ्याचे दिवस, भरलेल्या नद्या, रात्रींची वेळ, व अनोळखी वाट, यामुळे इंग्रजाचे यावेळीं फार हाल झाले पण ते सूर्योदयाचे आत चुनारला पोचले.

वॉरन् हेस्टिंग्ज पळून गेल्यावर चेतसिंगच्या सैन्यानें बनारसमधील त्याची छावणी लुटली, व त्याच्या बऱ्याच मदत-

गारास कैदेत टाकले. पण अखेर इंग्रजाच्या सैन्यास नवी कुमक आली, व त्याच्याबरोबर सामना देण्याचे धैर्य चेतसिंगास होईना. तेव्हा अखेर महादजी शिंद्याची मदत घ्यावयाचे ठरवून तो त्याच्याकडे निघून गेला जाताना त्याने आपल्या बरोबर आपली सर्व संपत्ति नेली चेतसिंग पळून गेल्याचे समजल्यावर वॉरन् हेस्टिंग्जने त्याचे रामनगर व लतिफपुर हे किल्ले कब्ज्यात घेतले, व बलवंतसिंगाच्या मुलीचा मुलगा जो महीप नारायणसिंग यास काशीच्या गादीवर बसविले

महीप नारायणसिंग हा अज्ञान होता. त्याच्या अधिकाऱ्याकडून वसूलाचीं कामे नीट होत नाहींत, या सबबीवर कॉर्नवॉलिसने त्या कामाकरिता ब्रिटिश अधिकारी नेमावेत म्हणून त्याच्या पाठीमागे लकडा लावला महीप नारायणसिंगाने काहीं वेळ या मागणीकडे दुर्लक्ष केले, पण अखेर इ. स. १७९४ मध्ये वसूलीचीं व न्यायदानाचीं कामे इंग्रजाचे हवालीं त्यास करावीं लागलीं. याचा अर्थ म्हणजे महीप नारायणसिंग हा फक्त जमीनदार बनला, व त्याच्या ताब्यातील मुलूख इंग्रजाचे राज्यास जोडण्यात आला.

ब्रिटिश अमलाखालीं आल्यावर बनारसचा इतिहास फारसा घडामोडीचा झाला नाहीं. वझीरअली नावाच्या औंधच्या पदच्युत

नबाबास इंग्रजांनीं अटराव्या शतकाअखेर काशीस नजर-कैदेत ठेवले होते. त्यास जेव्हा कलकत्त्यास पाठविण्याचे १७९९ मध्ये इंग्रजांनीं ठरवले, तेव्हा त्याने बनारसचा रेसिडेंट चेरी याजकडे भेटण्याच्या मिषाने जाऊन त्याजवर अचानक हल्ला करून त्यास ठार मारले बनारसचा कलेक्टर डेव्हिस याने नदेस्वर राजवाड्यात आपल्या स्वतःचा बचाव शिताफीने केला पुढे लवकरच इंग्रजांनीं नबाबअलीचे बंड मोडून शांतता स्थापन केली

१८०९ च्या ऑक्टोबर महिन्यात बनारसला एक मोठा हिंदु-मुसलमानाचा दंगा झाला. विश्वेश्वराचें देऊळ व अवरंग-जेबाची मशीद याच्या मधील जागेवर हिंदु लोक एक मारुतीचे देऊळ बांधू लागले ते मुसलमानास न खपून त्यांनीं ते पाडून टाकले दुसरे दिवशीं मुसलमानांनीं विश्वेश्वराचे देऊळच पाडण्याचा प्रयत्न केला, त्यामुळे हिंदु फार खवळले. हिंदू व मुसलमान यामध्ये गायघाटाजवळ एक चकमक झाली त्यामध्ये सुमारे ८० मुसलमान मारले जाऊन त्याचा पराभव झाला. चिडलेल्या मुसलमानांनीं लाटभैरवावर हल्ला करून तेथील खांबाचे तुकडे करून तेथील देवळात गाय मारली. दुसरे दिवशीं हिंदूनी तेथे हल्ला करून लाटभैरवाजवळील अवरंग-

जेबाने बाधलेली मशीद पाडून टाकली. पुढे मोठ्या मुष्किलीने सरकारास हा दंगा मोडता आला. १९३१, १९३८ व १९३९ सालींहि बनारसला हिंदुमुसलमानाचे दगे झाले, व त्यामध्येहि बरीच प्राणहानि व वित्तहानि झाली.

इ स. १८५७ सालच्या वणव्याच्या वेळीं बनारसला तीनचार पलटणी होत्या त्यापैकीं काहींच्या मनातच बड करावयाचे होते पण लष्करी अधिकाऱ्याच्या बेअक्कली वर्तनामुळे अखेर सर्वच पलटणी बंडात सामील झाल्या पण त्याची शस्त्रास्त्रें काढून घेण्यात आल्यामुळे इंग्रजाच्या ताब्यातून बनारस गेलें नाही.

ब्रिटिश अमलातील महत्त्वाच्या ऐतिहासिक गोष्टी म्हणजे संस्थास्थापना होय १७९१ सालीं बनारसला प्रथम सरकारी सस्कृत कॉलेज स्थापण्यात आले. प्रथम प्रथम ते फारसे चागलें चालत नव्हते १८२९ सालीं त्याला जोडून एक इंग्रजी शाळा काढण्यात आली. पुढे तिचे क्वीन्स कॉलेजमध्ये रूपातर झालें. या कॉलेजची हल्लींची सुदर व भव्य इमारत १८४७–१८५२ मध्ये मेजर किट्टोनें बाधली तिला १३००० पौंड खर्च आला. क्वीन्स कॉलेजमध्यें पुढे बी. ए. पर्यंत शिकण्याचीहि सोय झाली. १९२१ सालपासून तेथे इटरमीजिएट पर्यंतचेच वर्ग ठेवण्यात आले आहेत.

बनारसमधील सर्वांत पहिली इंग्रजी शाळा म्हणजे जयनारायण हायस्कूल होय ते १८१४ सालीं राजा जयनारायण घोसळ यानीं स्थापले व पुढे चार वर्षांनीं चर्च मिशनरी सोसायटीच्या हवाली केले हे हायस्कूल अद्याप चालू आहे

इ स. १८९८ सालीं बनारसला मिसेस् ॲनी बेझट यानीं सेंट्रल हिंदु कॉलेज स्थापन केले. ते पुढे युनिव्हर्सिटीच्या हवालीं १९१६ सालीं करण्यात आले. या कॉलेजची इमारत कमच्छामध्ये होती ते हल्ली नगव्यास हिंदु युनिव्हर्सिटीच्या आवारात आहे; जुन्या इमारतीत हल्लीं सेन्ट्रल हिंदु हायस्कूल आहे.

१९१६ सालीं काशीस हिंदु विश्वविद्यालयाची स्थापना झाली त्याची हकीकत पाचव्या प्रकरणामध्ये स्वतंत्र दिलेली आहे. १९२१ सालीं असहकारितेच्या चळवळींत काशी विद्यापीठ नावाचे राष्ट्रीय महाविद्यालय काशीस सुरू करण्यात आले आहे हे विद्यालय कॅन्टोन्मेंट स्टेशनच्या बाजूस आहे. बाबू शिवप्रसाद गुप्त यानीं हे विद्यालय चालवण्याकरिता दहा लाख रुपयाची उदार देणगी दिलेली आहे तिच्या व्याजातून या महाविद्यालयाचा खर्च चालतो. या विद्यालयामार्फत हिंदीमध्ये

बरींच उपयुक्त पुस्तकें प्रसिद्ध करण्यात येतात. स्वराज्य मिळाल्यावरहि सरकारी मदत विद्यालयास घ्यावयाची नाहीं असे त्याच्या चालकाचे धोरण आहे. काशीमध्ये मुलींचीं तीन हायस्कुलें आहेत. राजघाट स्टेशनाजवळ मॉंटेसोरी पद्धतीची एक प्राथमिक शाळा थिऑसॉफिकल सोसायटीने चालवलेली आहे.

१८७२ सालीं रावबहादुर संकटाप्रसाद यांच्या परिश्रमाने नगरवाचनालय सुरू झाले. काशीविभागाचे त्यावेळचे कमिशनर कारमायकल याचे नाव या वाचनालयास देण्यात आले आहे. वाचनालयाची इमारत विजयानगरम्‌च्या राजकुमारांनीं बाधून दिली आहे. चागल्या प्रतीच्या वाचनाल्यात सदरहू संस्थेची गणना होईल.

१८९६ सालीं काशीमध्ये थिऑसॉफिकल सोसायटीची स्थापना झाली. लवकरच हिंदुस्थानातील थिऑसॉफिकल संस्थाचे काशी हे केंद्र झाले. सदरहु सोसायटीची रम्य जागा कमच्छामध्ये आहे. सोसायटी स्थापन झाल्यावर लवकरच म्हणजे १८९८ सालीं तिने सेंट्रल हिंदु कॉलेज सुरू केले. सदरहु कॉलेजमध्ये संस्थेचे बहुतेक सभासद निर्वेतन किंवा अल्प वेतनावर काम करीत असत. पुढे हिंदु युनिव्हर्सिटी स्थापन

झाल्यावर थिऑसॉफिकल सोसायटीने आपले कॉलेज व त्याची सर्व मालमत्ता युनिव्हर्सिटीस देणगी म्हणून देऊन टाकली. हल्ली सोसायटी एक नॅशनल मुलींचे कॉलेज, मुलांचे हायस्कूल, मुलींचे हायस्कूल व मॉन्टेसोरी शाळा इतक्या संस्था चालवीत असते. संस्थेतील कार्यकर्ते स्वार्थत्यागाच्या तत्वावर काम करितात. अनेक वर्षेपर्यंत बनारसला एक वर्षाआड थिऑसॉफिकल कन्व्हेन्शन भरत असे. डॉ बेझंट या येथे बरींच वर्षे राहात असत. अजूनहि उत्तर हिंदुस्थानात बनारस हे महत्वाचे थिऑसॉफीचे केंद्र आहे.

किंग एडवर्ड मेमोरियल हॉस्पिटल हा काशींतील सरकारी दवाखाना आहे. त्याचा पाया १८७८ सालीं राजकुमार एडवर्ड यांनी घातल्यामुळे त्यास त्याचे नांव देण्यात आले आहे. या दवाखान्याला लागून स्त्रीरोगचिकित्सेकरितां काशीचे मरहूम महाराज ईश्वरी नारायणसिंग याचे स्मारक म्हणून ईश्वरी मेमॉरियल दवाखाना उघडण्यात आला आहे.

१८६७ सालीं काशीस म्युनिसिपालिटी स्थापण्यात आली. १९२१ सालापासून म्युनिसिपालिटीस लोकनियुक्त अध्यक्ष निवडण्याचा अधिकार मिळाला आहे. घरपट्टी, पाणी-पट्टी, दस्तुरी, उतारूवरील कर हे म्युनिसिपालिटीच्या उत्पन्नाचे मुख्य मार्ग आहेत.

स्वच्छ गाळलेले पाणी घरोघरी पुरवण्याची योजना १८९२ सालीं अमलात आणली गेली तुलसी घाटापाशी पंपानें पाणी वर खेचून ते कमच्छामध्ये गाळण्यांत येते. या योजनेस सुमारे वीस लक्ष रुपये खर्च आला शहरामध्ये अद्याप ड्रेनेजची चागली व्यवस्था नाहीं. शहरातील गटारे ठिकठिकाणी शहरातच गगानदीमध्ये सोडलेलीं असल्यामुळे नदीचे पाणी अशुद्ध व घाण होत असते. सर्व गटारे डफरिन पुलाच्या खालीं गांवापासून दूर गगानदींत सोडून देण्याची योजना १८९९ सालीं करण्यात आली होती; पण ती अद्याप पुरी झालेली नाहीं. ती लवकर पुरी होणे फार जरूर आहे. १९२८ सालीं शहरामध्ये विजेचा पुरवठा करण्याची योजना पुरी झाली. या कामाचा मक्ता मार्टिन आणि कंपनीने घेतलेला आहे.

गंगानदीवरील आगगाडीचा डफरिन पूल हा १८८७ सालीं बाधण्यात आला. या पुलाची लाबी ३५८० फूट असून तो बांधण्यास सुमारे ४७ लक्ष रुपये खर्च आला. या पुलावरूनच पावसाळ्यामध्ये मोटारी, टागे वगैरे पलीकडे जाऊं शकतात. हिवाळ्यात व उन्हाळ्यात टागे मोटारींच्या रहदारीकरितां नदीवर नावाचा पूल करण्यात येतो.

१९०४ सालीं काशीस राष्ट्रीय सभेचें अधिवेशन भरले

होते. त्यावेळीं पुण्याचे प्रख्यात देशभक्त गोपाळ कृष्ण गोखले हे अध्यक्ष होते. १९३२ सालीं आशियाखंड शिक्षण परिषदेचे पहिले अधिवेशन काशीसच भरले होते.

१७९४ सालापासून काशीच्या राजघराण्याची राज्य करण्याची सत्ता नष्ट झाली होती हे आपण वर पाहिलेच आहे. १९१० सालीं लॉर्ड मिंटोच्या कारकीर्दीत काशीच्या महाराजास पुन्हा ब्रिटिश सरकारने वंशपरपरागत सस्थानिक बनवले, पण त्यास काशी शहरावर राज्य करण्याचा अधिकार देण्यात आला नाहीं. काशीनरेशाची राजधानी काशीच्या समोर नदीच्या पलीकडे वसलेले रामनगर शहर हे होय. प्रभुनारायण सिंह महाराज याना पुन्हा सस्थानिक होण्याचा मान मिळाला. २२ वर्षे राज्य करून ते १९३२ सालीं वारले. त्यानंतर त्याचे चिरंजीव महाराजा आदित्य नारायण सिंग हे गादीवर बसले, पण ते सात वर्षेच राज्य करून १९३९ सालीं वारले. निपुत्रिक असल्यामुळें त्यांनीं विभूति नारायण सिंग यास दत्तक घेतले होते, ते हल्ली गादीवर बसले आहेत. ते अज्ञान असल्यामुळे राज्यकारभार हल्लीं ब्रिटिश सरकारने नेमलेल्या अधिकाऱ्यामार्फत चालत असतो.

# प्रकरण ३ रें.

## तीर्थ व शहर वर्णन

### —नांवाची उपपत्ति—

काशी हे हिंदुमात्रास अत्यंत पवित्र तीर्थ आहे त्याच्या पावित्र्याचा उगम कसा झाला याची फारशी चागली कल्पना करिता येत नाहीं. प्रयागसारखीं तीर्थें नदीसंगमावर आहेत म्हणून, बदरिकेदारासारखीं तीर्थें उंच हिमशिखरावर आहेत म्हणून, तर द्वारकेसारखीं तीर्थें समुद्रकिनाऱ्यावर आहेत म्हणून तीर्थ म्हणून प्रसिद्ध झालीं आहेत. काशीस अशी स्वाभाविक परिस्थिति नाहीं येथें गगा उत्तरेकडे वाहते, नदीकिनारा अर्धवर्तुलाकार व रम्य आहे, व स्नान करितांना पूर्वाभिमुख सूर्य येतो या कारणामुळे प्रथम काशी हे तीर्थ मानले गेले असावे. बहुतकरून येथे आर्य लोक पोंचण्यापूर्वी शिवपूजेचे मोठे केंद्र असावे आर्य व द्रविड धर्मांचे मधुर मीलन झाल्यावर पुढें ते सर्व आर्यांचेहि तीर्थ झाले असावे.

काशीक्षेत्रास अनेक नावे आहेत, व त्याची उपपत्तिहि मनोरंजक आहे. परमेश्वर येथे साक्षात् **प्रकाशमान्** असतो म्हणून या क्षेत्रास काशी म्हणतात, असे काशीखंड अध्याय २६ श्लोक ६७ मध्ये सागितले आहे. काशीस फार फार प्राचीन काळीं काश नावाचा राजा झाला, त्याच्या नावावरून काशी नाव पडले असे दुसरे एक मत आहे. काशींत मनुष्यापुढे मुक्ति प्रकाशमान होते, म्हणून तिला काशी नाव पडले आहे असेहि एक कारण काशीखडात दिले आहे.

बनारस हे नाव काशीच्या वाराणसी या सस्कृत नावावरून अपभ्रश होऊन बनले आहे काशीखड (३०,६९–७०), वायुपुराण, वगैरे पुराणामध्ये वरुणा व असि या दोन नद्यामधील प्रदेशास वरुणासि ऊर्फ वाराणसि म्हणतात असे विधान आढळते. हल्लींही काशीची दक्षिणोत्तर मर्यादा या नद्यानींच होत असते. तेव्हा ही उपपत्ति सयुक्तिक दिसते वरुणेच्या उत्तरेकडे काहीं अंतरापर्यंत जुन्या इमारतीचे अवशेष दिसतात, पण ते काशीचे नसून काशीजवळील उपनगराचे असावेत. राजा बनारच्या नावावरून बनारस नाव पडले अशीही एक आख्यायिका आहे, पण तींत फारसें ऐतिहासिक तथ्य दिसत नाहीं.

भगवान् शकर काशीस कधींच सोडून जात नाहींत

म्हणून ‘अविमुक्त क्षेत्र’ (काशी खंड ३०, २०), तेथे रुद्र अखंड वास करतात म्हणून ‘रुद्रावास’ (काशीखड ३०, १००), काशीच्या श्मशानांत दहन झाले म्हणजे मुक्ति मिळत असल्यामुळे पुन्हा श्मशानात जावे लागत नाहीं म्हणून ‘महाश्मशान’, आपणास मुक्ति मिळणार या खात्रीमुळे तेथे सदा आनंद असतो म्हणून ‘आनदवन’ (काशी खड २६, ३४), अशीं दुसरीहि नांवे काशीस पुराणांत दिलीं आहेत; पण तीं हल्लीं रूढ नाहींत. अवरंगजेबाने काशीस महमदाबाद हे नाव दिले होते, पण ते त्याच्या बरोबरच नाहींसे झाले हें आपण मागे पाहिलेच आहे.

## शहरवर्णन

वरुणा, असि व गंगा या नद्या बनारसच्या अनुक्रमे उत्तर, पूर्व व दक्षिण दिशेच्या स्वाभाविक मर्यादा आहेत. पश्चिम बाजूस बनारसला अशी स्वाभाविक मर्यादा नाहीं. वरुणानदी ही जरी शहराची उत्तर मर्यादा असली, तरी वरुणागंगा-सगम ते राजघाटपर्यंत फारशी वस्ती नाहीं. १९३८ सालापर्यंत हा भाग जवळ जवळ ओसाडच होता, पण आता ऋषी व्हॅली ट्रस्टने तो विकत घेऊन तेथें आपल्या शाळा, कॉलेजे व वसतीगृहे बाधण्यास सुरवात केली आहे. हा भाग

पूर्वकाळी चागला गजबजलेला होता, हे तेथे असणाऱ्या इमारती व देवालये याच्या अवशेषावरून दिसून येते. काशीचा प्राचीन कालचा राजघाट किल्ला हाही याच भागामध्ये व राजघाट-स्टेशनच्या उत्तरेस होता हिंदु राजवटींत याच बाजूस राजकीय कचेऱ्या होत्या. वरुणासंगम, आदिकेशव, ब्रह्मेश्वर वगैरे यात्रेचीं स्थानेहि याच बाजूस आहेत. १९४० सालीं भर घालण्यास माती मिळावी म्हणून रेल्वेने या भागापैकीं नदीकाठचा सुमारे १२ एकर भाग २० फूट खोलपर्यंत उकरून काढला; त्यामुळे या भागातील जमिनीखालीं गाडल्या गेलेल्या प्राचीन इमारती, देवळे, विहिरी वगैरेचे बरेच अवशेष सापडले. अनेक राजे, मत्री, देवालये वगैरेच्या मुद्राचे मातीवर उठवलेले ठसेहि सापडले. यापैकीं काही राजे (धनदेवासारखे) इ स. पू. पहिल्या शतकातले, काहीं मत्री पांचव्या शतकातले तर काहीं दहाव्या—अकराव्या शतकातले आहेत. सापडलेल्या राजकीय मुद्रांची सख्या फारच मोठी आहे. त्यावरून या भागामध्ये हिंदु राजवटींत सरकारी कचेऱ्या होत्या हे उघड दिसून येते सरकारी टाकसाळहि याच भागात होती, कारण गुप्त राजाच्या नाण्यावरील अनेक ठसेहि येथे सापडले आहेत. मुसलमानी अमलाच्या प्रारभीं या भागाची बरीच वाताहात

झाली हे तेथे बाधण्यात आलेल्या मशिदीवरून दिसून येईल. त्यामुळे काशीची वसति दक्षिण भागाकडे जास्त वळली. शिवाला घाटाच्या दक्षिण बाजूचा भाग बराचसा अर्वाचीन आहे. काशीच्या दक्षिणेस नगवा गावाजवळ काशी विश्वविद्यालयाची स्थापना १९१६ साली झाल्यापासून काशीच्या दक्षिण भागाची वसति व महत्त्व बरेच वाढले आहे. हल्ली असी नदीच्या दक्षिणेस हिंदु युनिव्हर्सिटीच्या आसपास पुष्कळ नवीन घरे, दुकाने व वसतिगृहे दरसाल बाधण्यात येत आहेत काशीची दक्षिणोत्तर लाबी सुमारे चार मैल आहे. सातव्या शतकात युआन् चाग काशीस आला होता, त्यावेळींहि ती तितकीच होती. शहराची पूर्व पश्चिम रुंदी काहीं ठिकाणी अर्धा मैल तर काहीं ठिकाणीं २ मैल आहे हिंदु वसति बहुतेक सर्व नदीकाठाने आहे. नदीचा किनारा उंच असून तो चागला कणखर ककराचा बनलेला आहे नदीचे पात्र अर्धवर्तुळाकार असल्यामुळे पावसाळ्यात किनाऱ्यावर फार जोराने पाणी आदळते; तथापि त्यायोगाने काशीतील किनाऱ्यास धक्का पोचत नाहीं.

काशीमध्ये नदी किनाऱ्याने अत्यंत दाट वसति वसली आहे. येथे दर चौरस मैलास २२००० लोकवसति आहे.

प्रत्येकास आपले घर गंगामाई जवळ असावें असें वाटे, म्हणून रुंद रस्त्यास जागा न ठेवता घरामध्ये अत्यंत अरुंद गल्ल्यांचे रस्ते ठेवले आहेत. या रस्त्यावरून कोणत्याहि प्रकारचे वाहन,— सायकल सुद्धा, जाऊ शकत नाहीं गल्ल्यातील रस्ते दगड घालून केले असून त्याखालून गटारे आहेत, बहुतेक हे सर्व रस्ते म्हणजे गटारावरील पूलच होत वाहने जाण्याच्या रस्त्यापैकीं सर्वात महत्त्वाचा रस्ता काशी स्टेशनापासून निघालेला असून तो नदीस समांतर असा जवळ जवळ अर्धवर्तुलाकार आहे. या रस्त्यावर प्रथम विश्वेश्वरगज नावाची मोठी बाजारपेठ लागते. पुढे टौन हॉल, नागरी प्रचारणी सभा, भारतकलाभवन, सिटी पोस्ट ऑफिस् व शहरातील व्यापाराचें केंद्र असणारा चौक हीं लागतात. चौकापाशीं या रस्त्याच्या पूर्वेस ठठेरी बाजार नावाची पितळेच्या भाड्याची प्रसिद्ध पेठ आहे. चौकाच्या पुढें दक्षिणेस अर्ध्या फर्लांगावर पूर्वेस पायऱ्यानीं खालीं उतरलें म्हणजे अवरगजेबाची मशीद, ज्ञानवापी व विश्वेश्वराचे प्रसिद्ध देवालय हीं लागतात. कारमायकल लायब्ररी ही येथेच आहे. चौकाच्या पुढे दक्षिणेस अर्ध्या मैलावर गोधोलिया नावाचा चौक लागतो. या चौकाच्या थेट पूर्वेचा रस्ता प्रसिद्ध दशाश्वमेघ घाटावर जातो, पश्चिमेचा रस्ता कमच्छाकडे थिऑसॉफिल सोसायटी, सेंट्रल हिंदु हायस्कूल यांकडे जाऊन पुढे उत्तरेकडे वळून भारत-

माता मंदिर व काशी विद्यापीठ यावरून बनारस कँटोनमेट स्टेशनाकडे जातो. गोधोलियावरून मुख्य रस्ता पुढे दक्षिणेकडे लिंगायताचा प्रसिद्ध मठ जंगमवाडी यावरून हरिश्चंद्र घाटाजवळून पुढे असी घाटापर्यंत जातो. असीच्या उत्तरेस एक फर्लांगावर याच रस्त्याच्या पूर्वेस नदीकाठीं वॉटरवर्क्स आहे. असी घाटापासून काशी विश्वविद्यालयास जाण्याकरिता पूर्वी पश्चिमेकडे वळून भास्करानंद स्वामीच्या समाधीवरून दुर्गाकुंडावर जावे लागे; तेथून पुन्हा दक्षिणेकडे वळून संकटमोचन व लंका त्या मार्गाने विश्वविद्यालयास जाता येई. पण १९३७ सालीं असी नदीवर एक नवा पूल बांधला आहे, त्यामुळे आता असी घाटावरून थेट न वळतां लंकेस जाता येते. लंकेपाशीं या रस्त्याच्या डाव्या बाजूस एक फाटा फुटतो, तो शिवप्रसाद गुप्त याच्या 'सेवा उपवना'वरून पुढे रामनगर घाटावर जातो. दुर्गाकुंडाच्या उत्तरेस एक रस्ता मुख्य रस्त्यास समांतर असा आहे. या रस्त्यावर विजयानगर महाराजाचा राजवाडा आहे. या राजवाड्यामध्यें मोठे क्रिकेट पटांगण असून तेथेच १९३३ सालीं हिंदुस्थानात एम्. सी. सी. या इंग्लिश क्रिकेट संघाचा हिंदुस्थानांतील पहिला पराभव विजयनगरच्या संघाकडून झाला. या रस्त्याच्या भेलुपुर चौकावर जे चार रस्ते फुटतात, त्यापैकीं पश्चिमेचा रस्ता वॉटरवर्क्सचा पाण्याचा साठा, विजेचा

कारखाना, सेंट्रल हिंदु हायस्कूल, थिऑसॉफिकल सोसायटी, व काशी विद्यापीठ यावरून बनारस कँटोन्मेंट स्टेशनावर जातो. भेलुपूर चौकाच्या पूर्वेकडील रस्ता हरिश्चंद्र घाटाकडे जातो उत्तरेकडील रस्ता मुख्य रस्यास समांतर असा असून तो जयनारायण हायस्कूल वरून चर्च उर्फ गिरिजाघर याकडे जातो येथे रस्त्याचा चौक असून पूर्वेकडील रस्ता गोधोलिया-वरून दशाश्वमेध घाटाकडे जातो पश्चिमेचा रस्ता थिऑसॉ-फिकल सोसायटीवरून पुढे उत्तरेकडे वळून कँटोन्मेंट स्टेशनावर जातो वायव्येकडील रस्ता व्हिक्टोरिया पार्क, म्युनिसिपालिटी व भारतधर्म महामंडल यावरून क्वीन्स् कॉलेज-कडे जातो भारतधर्म महामंडलापाशीं या रस्यावर जो चौक आहे, त्याच्या पश्चिमेचा रस्ता कँटोनमेंट स्टेशनाकडे जातो पूर्वेकडील रस्यावर झनाना मिशन, कबिराची समाधी, ईश्वरी-मेमोरियल व किंग एडवर्ड् हॉस्पिटल, वॉरन् हेस्टिंग्ज् उतरलेली माधोदासाची बाग (हल्लीं येथे राधास्वामी संप्रदायाचे मंदिर आहे), आज छापखाना, टौन हॉल, विश्वेश्वर गंज हीं लागतात

बनारस कँटोन्मेंट स्टेशनाच्या उत्तरेस कँटोन्मेंट (लष्करी छावणी) व सिव्हिल लाइन्स् (मुलखी अधि-

काऱ्यांच्या बंगल्याचा भाग ) हीं आहेत. कलेक्टर, कमिशनर, व जज्ज यांचीं कोर्टें व बंगले, इंपीरियल बँकेचे ऑफिस, जिल्ह्याचा व प्रातिक तुरग, पूर्वीची टाकसाळ ( मिंट हाऊस ), बनारसच्या महाराजाचा नदेश्वर राजवाडा हीं सर्व या भागांत आहेत. युरोपियन पद्धतीचीं क्लार्क हॉटेल, पॅरिस् हॉटेल, सेसिल हॉटेल हींहि येथेच आहेत.

बनारसला जो मोठ्या प्रमाणावर रेशमी विणकाम व पितळेचीं नित्योपयोगाचीं व कलाकुसरीचीं भाडीं याचा व्यापार चालतो, त्याचे केंद्र कँटोन्मेटमध्ये नसून शहराच्या जुन्या भागात आहे. कद, पितांबर, पैठणी, पातळे, फेटे वगैरे विणण्याचे काम मुसलमान लोक करितात त्याचा व्यापार मात्र जवळ जवळ सर्व हिंदूंच्या हातात असून या व्यापाऱ्याचीं दुकाने हमरस्त्यावर नसून अरुद बोळात आहेत इतक्या लहान व गलिच्छ गल्ल्यामध्ये एवढीं मोठीं रेशमी कापडाचीं दुकानें असतील अशी कल्पनाहि येत नाहीं. पितळी भाड्याचीं दुकानेहि बोळातच आहेत

काशीचे भेलुपुरा, दशाश्वमेध, चौक, चेलगज, कोतवाली, जैतपुरा व आमदपुरा असे सात भाग ऊर्फ मोहल्ले आहेत, भेलुपुरा मोहल्ला सर्वांत दक्षिणेस आहे. या भागात,

चेतसिंग यास जेथें वॉरन् हेस्टिंग्जने कैद केले होते, तो सिवाला घाट व किल्ला आहे दिल्लीच्या बादशाहाच्या वंशजापैकी काहींना राहण्यास हा किल्ला ब्रिटिश सरकारने काहीं काल दिला होता, त्यामुळे या भागात बरीच मुसलमानी वसति झाली आहे. ज्या तीन इंग्लिश अधिकाऱ्याना चेतसिंगच्या सैन्याने १७८१ सालीं येथे लढाईत मारले होते, त्याचीं थडगीं येथेच आहेत जे हिंदी शिपाई या लढाईत इंग्रजाचे तर्फे लढताना मेले, त्याच्या स्मरणार्थ बनविलेली शिला चेतगंज ठाण्यापाशीं आहे.

दशाश्वमेध मोहल्यात नदीकाठीं मानमंदिरावर जयपुरच्या जयसिंहाने बांधलेली प्रसिद्ध वेधशाला आहे. राजा जयसिंह हा अठराव्या शतकाच्या पूर्वार्धात होऊन गेला. त्याला ग्रह-गणिताचा फार नाद होता. ग्रहाचे वेध सूक्ष्म रीतीनें घेता यावेत म्हणून पितळेच्या लहान यंत्राऐवजीं विटांनीं बांधलेलीं मोठीं यंत्रे करण्याची कल्पना त्याला सुचली, व त्याप्रमाणे त्याने दिल्ली, जयपुर, मथुरा, उज्जयिनी व काशी येथें तशीं यंत्रे बांधवलीं. काशींतील मानमंदिरावरील वेधशाला १७३७ सालीं बांधण्यात आली. या वेधशाळेत **सम्राट्यंत्र, नाडिवलय, दिगंशयंत्र** व **चक्रयंत्र** अशीं चार यंत्रे आहेत याचा ग्रहवेध

घेण्याकरिता हल्लीं पंडितलोक उपयोग करीत नाहींत १९१२ सालीं या यंत्राची जयपुरदरबारनें दुरुस्ती केली आहे

दशाश्वमेधाच्या उत्तरेस चौक मोहल्ला आहे येथे काशीच्या व्यापाराचे केंद्र आहे सेन्ट्रल बँक, अलाहाबाद बँक, इंपिरियल बँकेची शहर शाखा हीं याच भागात आहेत. कांचेच्या दुकानाची दालमंडी, मिठाईबद्दल प्रसिद्ध असलेली कचोडी गल्ली, भांड्याच्या व्यापाराचे आगर ठठेरी बाजार, वाणसामानाच्या घाऊक विक्रीचे केंद्र गोला दिनानाथ, अनेक विमा कंपन्याच्या कचेऱ्या, सराफाचीं व सुगंधी सामानाचीं दुकाने हीं सर्व चौक मोहल्यात आहेत. शहरातील बरींच सिनेमागृहेहि याच भागात बांधलेलीं आहेत कारमायकल वाचनालयहि याच भागात मुख्य रस्त्यावर आहे या वाचनालयाच्या पूर्वेस विश्वेश्वराचे देवालय आहे

चौक मोहल्याचे ईशान्येस कोतवाली मोहल्ला आहे. या मोहल्यातील चौखाबा गल्लींत श्रीमंत सराफाची दुकाने आहेत. कबिराची समाधि याच भागात आहे, व ती पाहण्याजोगी आहे. किंग एडवर्ड रुग्णालय ( हॉस्पिटल ), ईश्वरी मेमोरियल रुग्णालय, राधास्वामी सांप्रदायाचे मंदिर, आज छापखाना, विजयनगरमच्या राजाने बांधून दिलेले नगरसभामंदिर (टौन हॉल)

हीं सर्व या भागातच मोडतात. नगरसभामंदिराजवळ नागरी प्रचारणी सभेचे चित्रकलामंदिर व पुराणवस्तुभवन आहे, व तीं फार पाहण्याजोगीं आहे. शहरातील सर्वांत मोठी बाजारपेठ जी विश्वेश्वरगंज तीहि नगरसभामंदिराजवळ आहे. नगरसभामंदिरापाशींच पोस्टाकरिता नवीन इमारत १९३८ सालीं बांधण्यात आली आहे.

आदमपुरा मोहल्ला शहराचे ईशान्येस आहे या भागाचे मध्यभागी बरीच मुसलमान वसति आहे. येथे नदीकिनाऱ्यापर्यंत गाड्या नेणे सोपे आहे म्हणून ज्यावेळीं नदीवरून पूल बांधला नव्हता त्यावेळीं काशीचा बाहेरील व्यापार या बाजूने होत असे. त्यावेळीं हा भाग भरभराटींत असे, हल्लीं पूल झाल्यापासून त्यास उतरती कळा लागली आहे. कलकत्त्याहून आग्र्यास जाणारा ग्रँड ट्रंक रोडहि याच भागातून जातो.

आदमपुऱ्याचे पश्चिमेस जैतपुरा आहे. क्वीन्स् कॉलजची इमारत या भागात आहे. सारनाथमधील अशोकाच्या स्तूपातील सामानाने बांधलेली जगत्‌गंज याच भागात आहे. या भागामध्ये पूर्वीं हिंदूचीं देवालयें पुष्कळ होतीं; मुसलमानी अमलाच्या सुरवातीस तीं पाडून तेथे मशिदी बांधण्यात आल्या. अढाई कांगरा नावाची मशीद या तऱ्हेने या भागात बाराव्या शतकाच्या अखेरीस बांधण्यात आली. बकरियाकुंडाजवळील मशीदही

अशाच प्रकारची आहे; तिचा खालील भाग थेट देवालया-सारखा असून वर फक्त घुमट आहे राजघाट स्टेशनच्या उत्तरेस असणाऱ्या राजघाट किल्ल्यातहि अशाच प्रकारच्या मशिदीचे अवशेष आहेत.

चेतगंज मोहल्ला शहराच्या वायव्येस आहे. या भागामध्ये म्युनिसिपालिटीची कचरी, व्हिक्टोरिया पार्क, भारतधर्म मंडळाच्या देवळाची जागा हीं आहेत याच मोहल्यामध्ये कॅन्टोनमेन्ट स्टेशनपाशीं काशी विद्यापीठ हें राष्ट्रीय कॉलेज व त्याच्या जवळच भारतमातामंदिर हीं आहेत. काशी विद्यापीठाबद्दल मागे दुसऱ्या प्रकरणात माहिती दिलीच आहे भारतमातामंदिर म्हणजे एक हिंदुस्थानचा सगमरवरी दगडाचा बनविलेला पर्वत, नद्या, खोरीं वगैरे उचनीच प्रदेश दाखविणारा नकाशा असलेली इमारत आहे. नकाशा व मंदिर हे दोन्हीहि बाबू शिवप्रसाद गुप्त यानी आपल्या खर्चाने बनविलीं आहेत. नकाशा बनविण्याचे प्रत्यक्ष काम बाबू दुर्गाप्रसाद खत्री याच्या देखरेखीखालीं झालें आहे. मंदिरातील निरनिराळ्या राजवटींतील हिंदुस्थानचे भिंतीवर रंगविलेले नकाशे व प्राचीन काळच्या निरनिराळ्या लिप्याचे तक्ते हेहि बाबू दुर्गाप्रसाद यांनीच बनविले आहेत. मदिराचा उद्घाटन समारंभ १९३६ सालीं दसऱ्याच्या

मुहुर्तावर महात्मा गांधी यांच्या हस्तें करण्यात आला. मंदिर खरोखर पाहण्याजोगे आहे. ते सकाळीं ८ ते ११ व दोनप्रहरीं ३ ते ६ पर्यंत उघडें असते.

काशीमध्य तीन रेल्वे स्टेशनें आहेत ई. आय् रेल्वेचीं दोन, पहिले काशी किंवा राजघाट व दुसरें बनारस कॅन्टोनमेन्ट. पहिलें स्टेशन, गावाच्या उत्तर भागांत उतरावयाचे असल्यास सोयीचे आहे कमच्छा, हिंदु युनिव्हर्सिटी, थिऑसॉफिकल् सोसायटी इकडे जाणे असल्यास कॅन्टोनमेन्ट स्टेशन सोयीचे पडते काशीस बी. एन्. डब्ल्यू. रेल्वेचेहि स्टेशन आहे त्यास अलयपुर किंवा बनारस सिटी स्टेशन म्हणतात

## क्षेत्रवर्णन

काशींतील सर्व तीर्थांचें व देवालयाचें वर्णन करणें जवळजवळ अशक्य आहे काशीमध्यें १५००–१६०० तरी देवालयें असावींत असा अंदाज आहे यांपैकीं महत्वाच्या देवालयांचा व तीर्थांचाच येथे निर्देश करण्यात येईल. काशी हें हिंदुमात्राचें महातीर्थ असल्यामुळे येथें सव प्रातातील लोक यात्रेस येतात. निरनिराळ्या प्रांतातील यात्रेकरूंच्या सोयींकरिता त्या त्या प्रातांतील ब्राह्मण येथे कायमचे उपाध्याय होऊन राहिले आहेत. बहुतेक यात्रेकरू हे आपापल्या प्रांताच्या उपाध्यायाकडे

उतरतात. काशीस प्रवाशास व यात्रेकरूस उतरण्यास सोयीच्या धर्मशाळाहि अनेक आहेत. या धर्मशाळा महाराष्ट्रातील धर्मशाळांपेक्षां फार निराळ्या आहेत. त्याची देखरेख पाहण्याकरिता एक व्यवस्थापक असतो या धर्मशाळामध्ये अनेक लहान लहान खोल्या असतात, त्यापैकीं यात्रेकरूना एक एक पृथक् मिळूं शकते. पुष्कळ धर्मशाळामध्ये यात्रेकरूना स्वयपाकाचीं भाडींहि पुरवण्यात येतात

काशीस आल्यावर काशीयात्रा म्हणून खालीलप्रमाणें विधि करावा लागतो. प्रथम गंगाभेटीचा विधि झाल्यावर मग क्षौरविधि करण्यात येतो. त्यानतर प्रथम मणकर्णिका ऊर्फ विष्णुचक्रतीर्थावर स्नान करून मग गंगा नदींत स्नान करावयाचें असते. स्नानानंतर श्रीविश्वेश्वराचे दर्शन घेऊन मग मृतपितरास उद्देशून श्राद्ध करावयाचे असते विश्वेश्वरदर्शन व श्राद्ध हीं यात्राविधींतील मुख्य होत यानतर काशींतील निरनिराळ्या देवताचें दर्शन घेणे व तीर्थावर स्नान करणे हीं कामे यात्रेकरूंनी सवडीप्रमाणे करावयाचीं असतात. विश्वेश्वर, वेणिमाधव, धुडिराज, दण्डपाणि, काळभैरव, दुर्गादेवी व गंगानदी याचे दर्शन यात्रेकरूंनीं काशीवासात रोज घ्यावयाच असते. काशीयात्रतील धार्मिकविधींचा खर्च म्हणजे गगाभेटीच्या

वेळची पड्याना द्यावयाची दक्षणा, निरनिगळ्या प्रायश्चित्ताबद्दल उपाध्यायास द्यावयाची दक्षिणा, श्राद्धभोजन व दक्षिणा आणि उपाध्यायाची सभावना एवढा होय.

यानतर यात्रेकरूंना पचक्रोशीची यात्रा करावयाची असते. पचक्रोशीची यात्रा म्हणजे काशीभोवतीं असलेल्या ४० मैल लाबीच्या रस्त्याने काशीक्षेत्रास प्रदक्षिणा घालणे होय. पचक्रोशीच्या रस्त्याचा आतील सर्व भाग काशी इतकाच पवित्र मानला जातो. ही पचक्रोशीची यात्रा काशीवासीयानींहि वर्षांतून दोनदा करावी असे आहे. इतरत्र केलेले पाप काशीवासाने जाते, पण काशींत घडलेले पाप पचक्रोशीच्या यात्रेनेच जाते असा रूढ लोकसमज आहे पंचक्रोशीच्या यात्रेस मणिकर्णिका घाटावर प्रारंभ होतो पहिल्या दिवशीं असीसंगमाच्या मार्गाने जाऊन सहा मैलावर कर्दमेश्वराजवळील कनवा गावावर यात्रेकरू मुक्काम करितात कनव्यापासून दहा मैलावर भीमचडी उर्फ धूमचंडी गाव आहे, तेथे दुसऱ्या दिवसाचा मुक्काम होतो. तेथून १४ मैल असलेल्या रामेश्वर गावीं तिसरा मुक्काम पडतो. तेथून आठ मैलावर असलेल्या शिवपूर गावावर चौथ्या दिवशींचा मुक्काम थकलेले यात्रेकरू करितात; इतर लोक त्याच दिवशीं शिवपुराहून सहा मैल असलेल्या कपिलधारा गावीं थांबून

पाचव्या दिवशीं परत मणकर्णिका घाटावर पोचतात यात्रा झाल्यावर साक्षी विनायक व विश्वेश्वर याचे दर्शन घेऊन त्याच्या चरणीं यात्रा निवेदन करावयाची असते. पचक्रोशीच्या दर मुक्कामावर निरनिराळीं श्राद्धे करावयाचीं असतात. जुनी पद्धत पायींच यात्रा करण्याची आहे, पण हल्लीं पुष्कळ लोक लॉरीने एका दिवसात सर्व पचक्रोशीची यात्रा सपवतात पचक्रोशीच्या रस्त्यावर दुतर्फा झाडी आहे, पण रस्ता कच्चा व त्रासदायक आहे.

## काशींतील देवालये

आता आपण काशीमधील मुख्य मुख्य देवालये कोणतीं आहेत ते पाहू. सर्वांत महत्त्वाचे देवालय म्हणजे विश्वनाथाचे. पुराणामध्ये काशीमहात्म्यवर्णनात त्यावेळीं विश्वनाथाचें मदिर कोठें होते, ते कोणत्या प्रकारचे होते, त्याचे शिखर किती उंच होते, वगैरेबद्दल काहींच माहिती मिळत नाहीं. सातव्या शतकामध्ये या देवालयाचे शिखर सुमारे १०० फुट उच असावे असे चिनी प्रवासी युआन्चाग याच्या वर्णनावरून दिसतें देवालयाची जागा हल्लींच्या ज्ञान वापी मशिदीच्या जागेवरच होती. अवरगजेबाने १६६९ सालीं हे देवालय पाडून तेथे मशीद बाधण्यापूर्वींहि तें देवालय अनेकदा मुसलमाना-

कडून पाडले गेले होते; पण त्या जागेवर पूर्वी मशीद बांधण्यात आली नव्हती. कारण सोळाव्या शतकांतील त्रिस्थलीसेतु नामक ग्रंथामध्ये काशीयात्रेचे वर्णन करिताना असे सांगितलें आहे की जर यात्रेकरूस असें आढळून आले कीं विश्वनाथाच्या देवालयात शिवलिंगच नाहीं, तर त्याने त्या मूर्तिहीन देवालयासच प्रदक्षिणा, नमस्कार, इत्यादिक करावेत; व इतर ठिकाणीं दुसऱ्या एखाद्या शिवलिंगास अभिषेक करावा. देवालयाचे जागी मशीद असती तर तिला नमस्कारादिक करण्यास सांगितले गेले नसते.

अवरंगजेबाने पाडलेले विश्वनाथमंदिर हे हल्लींच्या देवालयाच्या उत्तरेस होते. इ. स. १५८० च्या सुमारास ते राजा तोडरमल्ल याने भव्य प्रमाणावर नारायणभट्ट नावाच्या नगरपंडिताच्या विनंतीवरून बांधलें होते. त्यावेळीं अकबर राज्य करीत होता, व त्यामुळे मंदिराच्या जीर्णोद्धारास सहजच परवानगी मिळाली. जीर्णोद्धार करिताना राजा तोडरमल्लाने मूळ देवालयाचा चबुतरा सात फुटानीं ऊंच केला, व त्याच्यावर जुन्या प्रमाणातच मंदिर उभारले. या देवाल्याचा नकाशा सोबत दिला आहे; चित्र न. १ पहा. त्यावरून असें दिसून येईल की ते चौरस होते, व त्याच्या मध्यावर विश्वनाथमंदिराचा ३२ फूट चौरस गाभारा


होता. या गाभाऱ्याच्या चारी दिशेस चार भव्य दरवाजे होते. त्यांच्या सौंदर्याची कल्पना सोबतच्या चित्रावरून दिसून येईल; चित्र नं. २ पहा. या चार दरवाजासमोर ज्ञानमंडप, मुक्तिमंडप, शृंगारमंडप व ऐश्वर्यमंडप या नावाचे चार मडप होते. त्याचा आकार सोळा फूट चौरस होता. मुख्य देवालयाच्या चार कोपऱ्यात गणेश, भैरव, तारकेश्वर व दंडपाणि याचीं चार लहान देवालये होतीं. हल्ली या देवापैकीं काळभैरव व दंडपाणि याचीं देवळे विश्वनाथाच्या देवळापासून लाब अतरावर आहेत. पूर्वी सर्व एकाच आवारात होतीं मुख्य देवालयाच्या भिंती १६ फूट रुंद होत्या; त्यावरून त्याच्यावरील शिखर बरेच उंच, सुमारे १२८ फूट, असावे असे दिसते. कोपऱ्यातील लहान देवालयाची शिखरे सुमारे ३२ फूट उच असावींत या देवालयाच्या पूर्व बाजूस १२५ फूट लाब व ३५ फूट रुद असा एक मोठा मडप होता. त्यात कथाकीर्तने होत. या मंडपाचा चबुथरा राजा तोडरमल्लानें उंच केला नव्हता. तो पूर्वीच्याच सपाटींत होता. मुख्य मदिर व त्याचा पूर्वेकडील हा मंडप या सर्वांच्या बाहेरून प्रदक्षिणामार्ग होता त्याच्या वाटेवर अविमुक्तेश्वर, मार्कंडेश्वर, गणेशगंगा, गौरीशंकर, महाकाळेश्वर, महेश्वर, मोक्षेश्वर, गौरीगणेश, वीरभद्रेश्वर इत्यादिकाचीं लहान देवालये होतीं.

१५८० च्या सुमारास बांधलेलें हे भव्य देवालय १६६९ सालीं अवरंगजेबाच्या कारकिर्दीत त्याच्या हुकुमानें पाडून टाकण्यांत आलें, व त्याच्या जागेवर नवी मशीद बांधण्यांत आली. अवरंगजेबाचे एंजिनीयरहि आपल्या धन्याप्रमाणें कंजूषच होते. नवीन मशीद बाधताना त्यानीं देवालयाच्या भिंतींचा शक्य तितका उपयोग केलेला आहे. मशिदीची उत्तरेकडील भिंत मागून पाहिली म्हणजे शिखर सुरू होईपर्यंतचा देवाल्याचा भाग तसाच ठेवला आहे हे दिसून येईल. वरील शिखर पाडून टाकून त्याच्या ऐवजीं घुमट बाधण्यांत आला आहे.

पूर्वीच्या देवालयाच्या मुख्य गाभाऱ्याच्या ठिकाणींच मशिदीचा मुख्य गाभारा असावा या हेतूनें अवरंगजेबाच्या एंजिनियरानीं विश्वनाथाच्या गर्भागाराच्या पश्चिमेस असणारा शृंगारमंडप आणि गणेश व दंडपाणि याचीं देवालयें पाडून टाकलीं. या जागेचा मशिदींत उपयोग करणें शक्य नसल्यामुळें ती पडीत जागा अद्यापही तशीच आहे व त्यामध्ये शृंगारमंडपाचे प्राचीन अवशेषहि थोडेसे अद्याप दृग्गोचर होतात. मुख्य मंदिर, ऐश्वर्यमंडप व मुक्तिमंडप हे तसेच ठेवले गेले, पण त्यांचे पश्चिमेकडील दरवाजे बंद करून मशिदीची मागील भिंत बनवण्यांत आली. बुजवलेले दरवाजे अद्यापिहि स्पष्टपणें

मशिदीच्या मागें दिसून येतात. पूर्वेकडील ज्ञानमंडप आणि भैरव व तारकेश्वर यांचीं देवालये पाडून टाकून मशिदीसमोर एक मोठे पटांगण बनवण्यात आले. पण मोठ्या जनसमूहास प्रार्थना करण्यास हें पटांगण अपुरे होते, म्हणून देवालयाच्या पूर्वेस जो सात फूट खोलीवर खालीं मोठा १२५×३५ फूट आकाराचा मंडप होता, त्याच्यावर दगडाचे आच्छादन घालून त्याची सपाटी मशिदीबरोबर करून घेतली. भुयाराप्रमाणें हल्लीं दिसणारा या मंडपाचा कांहीं भाग अद्यापहि अस्तित्वात आहे, व त्याचा दक्षिणेकडील अर्धा हिस्सा ज्ञानवापीच्या हिंदु पुजाऱ्याच्या ताब्यांत आहे! ज्ञानवापीच्या उत्तरेस जी मशिदीची भिंत आहे त्या भिंतीमधील द्वारातून या मंडपांत अजूनहि आत जाता येतें.

१६६९ सालानंतर बरींच वर्षें विश्वनाथाचे मंदिरच काशींत नव्हतें. या काळात विश्वनाथाचे लिंग कोठे ठेवण्यात येत असें याची आज कांहींच माहिती नाहीं. जुन्या जागेवर पुन्हा देऊळ बांधण्याचा पूर्वीचा रिवाज असे; पण आता तेथें मशीद बांधण्यात आल्यामुळें तसें करणे शक्य नव्हते. मराठ्यांच्या मनांत मशीद पाडूनहि पूर्वीच्या जागेवर पुन्हा देवालय बांधावें असें १७५२ च्या सुमारास आले होतें; पण तो बेत सिद्धीस गेला नाहीं हे आपण वर पाहिलेच आहे.



मशिदीच्या भितीत बद झालेले

**जुन्या विश्वनाथ मदिराचे पश्चिम द्वार**

अखेर ज्यावेळीं काशीवर बलवंतसिंगाचा अंमल नीट बसला, त्यावेळीं नवीन देवालय बांधणें शक्य झालें. त्यावेळीं पूर्वींच्या ज्ञानवापीच्या शेजारींच, पण तिच्या दक्षिणेस नवीन देवालय बांधावे असे ठरले, व त्याप्रमाणे तें इ. स. १७७७ च्या गोकुळाष्टमीस पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यानीं बांधले. त्याच्या प्रशस्तीचा शिलालेख देवालयाच्या मंडपात जुन्या बरहुकूम कोरून बसवलेला आहे.

हल्लींचें देवालय फार लहान व साधे आहे. शिखराची उंची अवघी ५१ फूट असून देवालयाच्या गाभाऱ्यात १५-२० माणसें मुष्किलीने माऊ शकतात. मंडपहि १०० माणसे मुष्किलीने मावतील इतका लहान आहे देवालयाच्या गाभाऱ्यात एका कोपऱ्यास शिवलिंग आहे त्यास कोणाहि स्पृश्य हिंदूस कपडे घालूनहि स्नान घालून स्पर्श करिता येतो. हल्लीं देवालयात विजेचे दिवे व पखे लावण्यात आले आहेत. देवालयाच्या आवारात अनेक मूर्ती आहेत. देवालयाचीं शिखरे मूळ पितळेचीं होतीं; रणजितसिंगाने त्यावर सोन्याचे पाणी देवविले. देवालयाचे पाठीमागे ज्ञानवापी म्हणून एक प्रसिद्ध विहीर आहे. रुद्राने स्वत त्रिशूलानें ही विहीर खणून काढली, व तिच्यामध्यें सर्व तीर्थें वास करितात असे तिचे वर्णन काशी-खंडात केलें आहे. या विहीरीवरील सुंदर मंडप दौलतराव शिंद्याचीं

पत्नी बायजाबाई हिने १८२८ सालीं बांधला आहे. अवरंगजेबाने पाडलेले विश्वेश्वराचे देवालय वर सांगितल्याप्रमाणे ज्ञानवापीच्या पश्चिमेस जी मशीद आहे तेथें होते. हल्लींची मशीद, तिजसमोरील उंच पटागण, तिच्या दक्षिणेस असणारी ज्ञानवापी व तिच्या आजूबाजूची सर्व जागा व मशीदीच्या पूर्वेस व पश्चिमेस असणारी मोठी मोकळी जागा हे सर्व मिळून पूर्वीच्या देवालयाचे पटांगण होते. या पटागणांतच नव्हे, तर मशीदीच्या भिंतीवर देखील गुप्त देवस्थाने म्हणून अविमुक्तेश्वर, मार्कंडेश्वर इत्यादि देवाची पूर्वीचीं स्थाने अजूनहि यात्रेकरूस दाखविण्यात येतात.

विश्वेश्वराच्या देवालयाचे दक्षिणेस अन्नपूर्णेचे देवालय आहे. ही देवताहि काशींत महत्वाची आहे. तिचे देवालय अठराव्या शतकामध्यें पेशव्यानीं बांधलें आहे. या देवालयाचे जवळच साक्षीविनायकाचें देऊळ आहे. ते अठराव्या शतकाच्या अखेरीस पुण्याच्या चंद्रचूडानीं बांधलेले आहे.

विश्वेश्वराच्या खालोखाल महत्त्वाचे देवालय म्हणजे काळभैरवाचे होय. तें नगरसभामंदिराच्या ( टौन हॉलच्या ) बाजूस असून त्याच्या बाधकामाचें श्रेय दुसऱ्या बाजीराव पेशव्यांचे सरदार विंचूरकर यांस आहे. काळभैरव

हा काशीक्षेत्राचा कोतवाल म्हणजे रक्षक आहे पातक्यास व अपराध्यास शिक्षा करण्याकरिता त्याच्या हातामध्ये नेहमीं दंड असतो, म्हणून त्यास दडपाणिहि म्हणतात. या दडाचा ओपचारिक प्रसाद यात्रेकरूस पुजाऱ्या मार्फत मिळतो. काळभैरवाचे वाहन कुत्रा आहे त्यामुळे त्याच्या देवालयात कुत्र्यास मज्जाव नसतो. याच देवालयात काशीचे प्रसिद्ध गंडे मिळत असतात. काळभैरवाच्या देवळापाशी दंडपाणि व नवग्रह याचीं देवळे आहेत. दडपाणीच्या देवळामध्ये कालकूप नावाची विहीर आहे. या विहीरीमध्ये जर दोन प्रहरीं बारा वाजता आपले प्रतिबिंब एकाद्या माणसास दिसलें नाहीं, तर तो सहा महिन्यात मरण पावतो असा समज आहे.

चेतगज मोहल्यात पिशाचमोचन नावाचे तीर्थ आहे. या तीर्थामध्ये स्नान केले म्हणजे पिशाचयोनीस गेलेल्या पितरास मुक्ति मिळते असा समज असल्यामुळे सर्व यात्रेकरूना या तीर्थास जावे लागते. आत्महत्या करून मेलेल्या मनुष्याच्या मुलास तेथे त्रिपिंडी श्राद्ध करावे लागतें. गयेस पिंडदान करण्याच्या वेळेस काशीस पिशाचमोचनात स्नान केले होतें कीं नाहीं असा तेथील पडे प्रश्न विचारतात. काशीच्या उत्तर

भागामध्ये कपालमोचनतीर्थ, यागेश्वर, महामृत्युंजय, वृद्धकालेश्वर, लाटभैरव व बटागणेश याचीं देवालये आहेत.

काशीच्या दक्षिण भागात दुर्गादेवीचे देवालय व कुंड आहे. या देवालयात दसऱ्याच्या वेळीं पुष्कळ पशू देवीपुढे मारले जातात. हल्लींचे देवालय नटोरच्या राणी भवानीबाईने अठराव्या शतकात बाधले आहे. या देवळापाशी माकडे पुष्कळ असतात म्हणून त्यास युरोपियन लोक 'मकी टेंपल' या नांवाने ओळखतात. या देवाल्याच्या दक्षिणेस अर्ध्या फर्लांगावर अस्सी नदी आहे. दुर्गादेवीने दुर्गासुराला मारल्यावर तरवार जेव्हा खालीं टाकली, तेव्हा जी जमिनीत भेग पडली त्या भेगेमुळे 'असि' नदी उत्पन्न झाली अशी या नदीबद्दल दंतकथा आहे. अस्सी नदीमध्ये पावसाळ्यात तेवढे थोडेसे पाणी असते. दुर्गाकुंडाच्या पूर्वेस कुरुक्षेत्रकुंड आहे. सूर्यग्रहणाच्या वेळीं त्यात स्नान केल्याने फार पुण्य लागतें. दुर्गाकुंडाच्या पश्चिमेस कवडादेवीचे देऊळ आहे. काशींत आल्याबरोबर जर पहिल्या दिवशीं या देवीचे दर्शन घेतले नाहीं, तर दर दिवशीं एक कवडी याप्रमाणे या देवीस दंड द्यावयाचा असतो. यावरून या देवीचे नाव कवडादेवी असे पडलें आहे.

## घाट व घाटांवरील तीर्थें

वरुणासगम, पंचगगातीर्थ, मणिकर्णिका, दशाश्वमेध व अस्सीसगम हीं पाच काशींतील महातीर्थें मानलीं जातात. वरुणा व गगा याच्या सगमावर वरुणासगमतीर्थ आहे. या भागात हल्लीं फारशी वसति नाहीं संगमापाशीं आदिकेशव, संगमेश्वर, ब्रह्मेश्वर वगैरेची देवालये आहेत. अठराव्या शतकाच्या शेवटीं हीं देवालये शिंद्याच्या एका दिवाणाने बाधलीं. आदिकेशव घाटाचा उल्लेख जुन्या ताम्रपटात पुष्कळदा येतो. बाराव्या शतकातील मदनपाल, गोविंदचंद्र, जयचंद्र वगैरे गहडवाल राजानीं वरुणासगमावरील आदिकेशव घाटावर स्नान करून ब्राह्मणास दान केलेले तीन चार ताम्रपट्ट सापडले आहेत. १८५७ ते १८६३ पर्यंत आदिकेशवाच्या देवालयात सरकारी सैन्य ठेवण्यात आले होते; त्यामुळे यात्रेकरूंना तेथे जाता येत नसे. पुढे सरकारने ते देऊळ हिंदूंच्या ताब्यात दिले देवळाच्या भिंतींतून बाहेर शत्रूवर गोळ्या मारण्यास पाडलेलीं छिद्रे अजून तशींच आहेत.

पंचगंगातीर्थ हे बिंदुमाधव घाटापाशीं आहे. किरणा, धूतपापा, सरस्वती, गगा व यमुना या पाच नद्याचा येथे संगम होतो अशी भाविक लोकाची समजूत आहे. किरणा व धूतपापा

याच्या उत्पत्तिविषयीं काशीखंडांत एक चमत्कारिक गोष्ट सागितली आहे.

मणिकर्णिका घाटावर चक्रपुष्करिणीतीर्थ ऊर्फ मणिकर्णिकातीर्थ आहे. हे तीर्थ म्हणजे नदीच्या पश्चिम बाजूस खणलेलें एक कुंड होय. हे कुंड भगवान् विष्णूने आपल्या चक्राने खोदिले म्हणून त्यास चक्रपुष्करिणी म्हणतात. येथे यात्रेकरूंना प्रथम स्नान करावे लागते. यात उतरण्याकरिता चोहोबाजूंनीं पायऱ्या बाधलेल्या आहेत. या तीर्थापाशींच जलशायी घाटावर काशीची प्रख्यात दहनभूमि आहे.

चवथे महातीर्थ म्हणजे दशाश्वमेध घाट हे होय. ब्रह्मदेवाने दिवोदासाच्या कारकिर्दींत येथेच दहा अश्वमेध यज्ञ केले होते. म्हणून या घाटास दशाश्वमेध घाट हे नाव आहे येथे स्नान केल्याने दहा अश्वमेध यज्ञाचे पुण्य मिळते.

अस्सी संगम हे पाचवे महातीर्थ होय येथे अस्सी नदी गंगेस मिळते. या नदीत पावसाळ्या शिवाय पाणी नसतेच. संगमापाशी जगन्नाथाचे देवालय व आहिल्याबाईने बाधवलेली लोलार्कतीर्थ नावाची विहीर ही आहेत.

काशी शहराचे सौन्दर्य ज्यायोगे फार वाढलेले आहे

त्या गंगानदीवरील घाटाचें सक्षेपाने आता वर्णन करूं. अस्सी संगमाच्या उत्तरेस पहिला महत्वाचा घाट म्हणजे तुलसी घाट हा होय. तुलसीदासाचें वास्तव्य या घाटावर असे, म्हणून यास तुलसीदास हे नाव पडलें आहे. हा घाट हल्लीं मोडकळीस आला आहे. या घाटावरील तुलसीदासाचें घर अद्याप दाखविण्यात येते तुलसी घाटानतर वॉटर वर्क्स आहेत, व त्याच्या उत्तरेस जानकी घाट व बचराज घाट हे दोन घाट सोडले म्हणजे शिवाला घाट लागतो. या घाटावरूनच चेतसिंग वॉरन् हॅस्टिंग्ज्च्या कैदेतून पळून गेला होता, म्हणून यास चेतसिंग घाट असेहि म्हणतात. या घाटापुढचे नेपाळीघाट व दडीघाट सोडले, म्हणजे हनुमान घाट लागतो. या घाटापाशी काशींतील मद्रासी ब्राह्मणाची वसति आहे. वल्लभाचार्य हे येथेच रहात असत. हनुमान घाटास लागून हरिश्चद्र घाट आहे. हरिश्चद राजाने डोबास आपणास्वतःस जे विकले होते तें याच जागेवर होय अशी लोकसमजूत आहे. या घाटापाशी एक डोबाचे घर आहे, हरिश्चद्रास ज्या डोबाने विकत घेतले होते, त्याचाच वशाज मी आहे असे त्याचा मालक म्हणत असतो. हा घाट नुकताच विटार्नीं बाधलेला आहे या घाटावरहि काशींतील एक दहनभूमि आहे.

हरिश्चंद्र घाटाच्या थोड्या पुढे केदार घाट आहे. आपल्या

एका निष्ठावंत भक्ताकरिता हिमालयातील केदारेश्वर येथे काशींत येऊन राहिले अशी कथा आहे, म्हणून या घाटावरील देवळास केदारेश्वराचें देऊळ म्हणतात. केदार घाटापासून दशाश्वमेध घाटापर्यंत नदीकाठीं बंगाली लोकाची वसति आहे.

केदारघाटापुढें सोमेश्वर घाट, मानसरोवर घाट, नारद घाट, व अमृतरावाचा घाट हे लागतात. मानसरोवर घाटापाशीं मानसिंगानें बाधलेलें मानसरोवर आहे. अमृतराव घाट हा अमृतराव पेशव्यानीं बांधला आहे. त्यावर एक मोठे सत्र आहे.

अमृतराव घाटापुढे धोब्याचा घाट असून मग पाडे घाट, दरभंगा घाट व अहल्याबाई घाट हे लागतात. अहल्याबाई घाट हा अहल्याबाई होळकर या साध्वीने बाधलेला असून त्यावर एक मोठें होळकर सरकारच्या खर्चाने चाललेलें सत्र आहे. पुढे सीतला देवीचें देवालय आहे म्हणून त्या घाटास सीतला घाट म्हणतात. त्यापुढे प्रसिद्ध दशाश्वमेध घाट लागतो. हा घाट शहरात सर्वांत गजबजलेला असतो. याच्या पुढे वेधशाळेबद्दल प्रसिद्ध असलेला मानमदिर घाट आहे या घाटापुढे एक-दोन घाट सोडले म्हणजे नेपालमदिर लागते. या मदिराची रचना नेपाळी पद्धतीची असून त्यावर बरींच शृंगारिक चित्रें कोरलेलीं

आहेत. नेपाळमदिरास लागून ललिता घाट असून त्याच्या पुढे ज्वलनभूमी म्हणून प्रसिद्ध असलेला जलशायी घाट आहे. या घाटावर विष्णूच्या पादुका आहेत, त्यावर प्रसिद्ध व श्रीमत मनुष्याचीं प्रेते जाळतात. या घाटावर सती गेलेल्या स्त्रियाचे सपतीक अनेक दगडी पुतळे आहेत जलशायी घाटास लागून प्रसिद्ध मणिकर्णिका घाट आहे. याचें वर्णन मागे दिलेच आहे. मग दत्तात्रय घाट लागतो, त्यावर एक दत्तात्रयाचे मदिर आहे. त्यास लागून शिंदे घाट आहे. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारभीं बायजाबाई शिंदे यानीं हा घाट बाधण्यास सुरुवात केली होती. त्याच्या मनात हा घाट काशींतील घाटात सर्वात सुदर व मजबूत व्हावा असे होते, पण बुरुज बाधल्यावर घाटाचा पाया खचला व घाट मागे कढून नदीकडे उंच व शहराकडे खोल असा झाला सुमारे १०० वर्षेपर्यत हा घाट याच स्थितींत होता, पण १९३५ सालीं शिंदे सरकारने हा घाट दुरुस्त करण्याचे प्रचड काम सुरू केले व ते १९३९ सालीं सपले.

शिंदे घाटापासून थोड्या अंतरावर नागपुरकर भोसल्यानीं इ. स १७९५ सालीं बाधलेला भोसला उर्फ घोसला घाट आहे. हा घाट फार मजबूत व सुंदर आहे, व त्यावर एक

सत्र आहे. या घाटापासून थोड्या अंतरावर बाजीराव पेशव्याने बांधलेला बाजीराव घाट आहे या घाटास लागून पुढे चोर घाट, पंचगंगा घाट, वेणिमाधव घाट, दुर्गा घाट व ब्रह्म घाट हे घाट आहेत काशीमध्ये दक्षिणी ब्राह्मणाची जी तीन चार हजार वसति आहे ती याच भागात आहे. वेणिमाधवाचे देऊळ पाडून तेथे अवरंगजेबाने मशीद बांधली आहे त्या मशिदीस माधवदासाचा देव्हारा म्हणतात. या मशिदीनजीक त्याने दोन उंच मनोरे बांधले आहेत या मनोऱ्याची उंची १४२ फूट असून त्याचा पाया फारच खोल घातलेला आहे, तथापि ते हल्लीं सुमारे १५ इंच कललेले आहेत प्रथम हे मनोरे आणखी ५० फूट अधिक उंच होते, पण १८३० च्या सुमारास ते पडतील अशी भीति वाटूं लागल्यामुळे प्रिन्सेप् नावाच्या ऐंजिनियरने त्याची उंची सुमारे ५० फुटानीं कमी केली

यापुढे गाय घाट लागतो व मग त्रिलोचन घाट दिसूं लागतो. या घाटावर पुण्याच्या नथु बाळा नावाच्या सावकाराने इ स १८०० च्या सुमारास बांधलेले त्रिलोचनेश्वराचे मोठे देवालय आहे. या पुढे प्रल्हाद घाट व राज घाट लागतात. राज घाटापाशीं गंगेचा डफरिन् पूल आहे. त्याच्या उत्तरेस हल्लीं


वसति नाहीं पुलाच्या पुढे सुमारे पाऊण मैलावर वरुणासंगम लागतो, व तेथे काशीतीर्थाची हद्द संपते.

काशीच्या उलट बाजूस रामनगर येथील राजवाड्यापाशीं व्यास काशी आहे. काशीच्या उलट बाजूस मरण आले असताना दुर्गति मिळते, तेव्हा रामनगरच्या बाजूच्या लोकाची ही आपत्ति टळावी म्हणून वेदव्यासानीं व्यासकाशीतीर्थ तेथे स्थापन केले. त्याचे दर्शनानें ही आपत्ति टळते असा समज आहे व्यास काशींस जाण्यास काशींतून नावेनें रामनगरास जावे लागते. तेथे घाटावर उतरून राजवाड्याच्या खालील बाजूस गेले म्हणजे व्यासाचे देवालय लागते हें देवालय अगदींच लहान असून त्यात एक शिवलिंग आहे. भिंतीवर एक दाढीवाल्या वृद्ध ऋषीचें चित्र टांगलेले आहे, तें व्यासाचे म्हणून दाखविले जाते ते चित्र फार मळलेले असल्यामुळे दिवसादेखील फारसे स्पष्ट दिसत नाहीं

व्यासाच्या देवालयास जाण्यास घाटावरून जेथून वाट आहे, त्याच्या पुढेच रामनगरच्या राजवाड्यात व किल्यात जाण्यास वाट आहे. राजवाडा एकदा पाहण्याजोगा आहे. काशीचे महाराज तेथे नसले म्हणजे आत सर्वांना जाऊं देतात. महाराज असले म्हणजे परवानगी काढावी लागते.

राजवाड्याच्या एका दालनात भिंतीवर चोहोबाजूने शाकुंतल नाटकातील कथानक वर्णन करणारीं ६३ चित्रे आहेत. तीं सुदर आहेत. दुसऱ्या एका भव्य दालनात बनारस राजघराण्यातील मानसारामपासून सर्व राजपुरुषाचीं भव्य तैलचित्रे आहेत. राजवाड्यातील शस्त्रागारात जुन्या काळचीं अनेक तऱ्हेचीं शस्त्रे आहेत. राजवाड्याच्या नदीकिनाऱ्यावरील व्हराड्यातून गगानदीचा सुंदर व मनोहर देखावा दिसतो.

राजवाड्याच्या बाहेरील बाजूस निरनिराळ्या सरकारी कचेऱ्या आहत. राजवाड्यासमोर एक भव्य व रुंद रस्ता रामनगर गावात जातो रामनगर गाव लहानच आहे; पण तेथे एक फार चागल्या तऱ्हेनें सुसज्जित असा सरकारी दवाखाना आहे.



सारनाथ मधील नवीन बुद्धमंदिर

# प्रकरण ४ थें

## सारनाथ

काशी शहराचा इतिहास व वर्णन हीं मागील प्रकरणात संपलीं पण काशीस लागून उत्तरेस सारनाथ व दक्षिणेस काशी विश्वविद्यालय हीं दोन महत्वाचीं स्थानें आहेत, त्याचें वर्णन या व पुढील प्रकरणात करण्यात येईल.

काशीच्या उत्तरेस सुमारें सहा मैलावर सारनाथ हे स्थान आहे. तेथें जाण्यास घोड्याच्या गाड्या व मोटार लॉरी सुमारें दहा-बारा आण्यास जातायेताची स्वारी या हिशेबानें मिळतात. सारनाथ हे बौद्ध लोकाचे एक महाक्षेत्र आहे. भगवान् बुद्धाने या ठिकाणीं धर्मोपदेश करण्यास सुरुवात केली, म्हणून हे स्थान बौद्ध लोकांना फार पवित्र वाटते, व तेथे सिलोन, ब्रह्मदेश, सयाम, चीन, जपान वगैरे लांबलांबच्या देशाहूनहि बौद्ध यात्रेकरू येत असतात त्यास तेथे राहण्याकरिता नुकतीच शेट जुगुलकिशोर बिरला यानीं ५०,००० रुपये खर्च करून एक धर्मशाळा बांधली आहे.

महाबोधि सोसायटीनें एक भव्य बुद्धमंदिर १९३१ सालीं या ठिकाणीं बांधले आहे. ते फार प्रेक्षणीय आहे. या मंदिराच्या मडपाच्या भिंतींवर बुद्धचरित्रांतील महत्वाचे प्रसग दाखविणारीं चित्रे रगविलीं आहेत. प्रवेश केल्यावर उजव्या हाताच्या कोपऱ्यावरून बुद्धचरित्रास सुरुवात होते. बुद्धाची आई मायादेवी हिला गरोदर होण्याचे वेळी एक दिव्य हत्ती आपल्या कुक्षीमध्ये स्वर्गातून येऊन प्रवेश करीत आहे असे स्वप्न पडले होते. ते स्वप्न भिंतीच्या मध्यभागीं रंगविले आहे. चित्रामध्ये निद्रिस्त मायादेवी, तिच्या सेवेकरी दासी, वरून उतरत येणारा हत्ती हे सर्व दाखविले आहेत. प्रवेशद्वारावर बुद्धजन्मचित्र आहे. माहेरीं जात असताना मायादेवी वाटेतच सालवृक्षाखाली उभ्यानेच प्रसूत होऊन भगवान् बुद्ध हे तिच्या कुक्षीतून बाहेर पडले, बाहेर आल्याबरोबर सात पावले ते सपाट्याने चालले, व प्रत्येक पावलागणित एकेक कमल उत्पन्न झाले, अशी बौद्ध दंतकथा आहे. तिची या चित्रावरून योग्य कल्पना येईल. मायादेवीच्या स्वप्नाच्याखालीं असित ऋषींच्या हाती आपल्या मुलाचे भविष्य वर्तविण्यास आईबाप त्यास देत आहेत असे दाखविले आहे. असित ऋषींनीं मुलगा चक्रवर्ती सम्राट् किंवा आत्मज्ञानी भिक्षु होणार असे भविष्य वर्तविल्यावर आईबापास काळजी पडून मुलाने संन्यास घेऊं

नये म्हणून त्यानी शक्य तितकी खबरदारी घेतली. तथापि आपन्मग्न शेतकरी, जराजीर्ण म्हातारा, कलाहीन प्रेत हे पाहून बुद्धास ससाराच्या दुःखाची, व आनंदी यती पाहून त्यामधून सुटणाऱ्या मार्गाची कल्पना येते, हे दाखवणारे चित्र दाराच्या दुसऱ्या बाजूस आहे पुढील चित्रामध्ये आपल्या प्रियपत्नीस व नवप्रसूत पुत्रास टाकून देऊन सन्यास घेण्यास निघालेला बुद्ध दाखवलेला आहे सर्व नगर निद्रावश झालेले आहे, व राजपुत्र घोड्यावर बसून पळून जात आहे असे पुढलें चित्र आहे. त्यानतर दुसऱ्या भिंतीवर बुद्धाच्या तपश्चर्येची अनेक चित्रे आहेत अगदीं वर बुद्ध हा आळार कळाम याचा उपदेश घेण्यास जात असलेला दिसतो; खालच्या बाजूस देहदडन करून बुद्ध कसा अस्थिपंजर झाला होता तें दाखविले आहे देहदंडनानेच मुक्ति मिळणार नाहीं, शरीराचा अंत मात्र कदाचित् होईल, म्हणून बुद्ध अखेर थोडे दुध घ्यावयाचे ठरवितो, व त्याचे हे कृत्य त्याच्या इतर सहकारी यतींस पसंत पडत नाहीं, हेहि चित्रात दाखविले आहे. पुढील मोठे चित्र बुद्धाच्या ज्ञानप्राप्तीचें आहे. त्यास ज्ञानप्राप्ति होऊ नये म्हणून वाईट वासनांचा राजा मार हा कसा आपल्या राक्षसी सैन्याचा त्यावर मारा करितो, रति व प्रीति या आपल्या दोन मुली त्यास मोह पाडण्यास कशा त्याच्याकडे पाठवतो, पण

बुद्ध कसा स्वनिश्चयच्युत होत नाहीं हें या चित्रात दिसून येतें. पुढील चित्र धर्मोपदेशाचें आहे. बुद्धानें प्रथम उपदेश आपल्या सहाध्यायी पाच मित्राना सारनाथ येथे केला हें वरील चित्रात दाखविलें आहे. चित्रामधील हरिणें, उपदेश सारनाथला केला, हें सुचवितात. खालच्या चित्रात अजातशत्रु राजा मंत्रोपदेश घेण्यास बुद्धाकडे आलेला दाखवला आहे. पुढील चित्रामध्ये अनाथपिंडक नांवाच्या श्रावस्तीच्या धनिकाने तेथील जेतवन हे त्या वनातील जागेवर पसरता येतील इतके रुपये देऊन कसे बुद्धविहार बाधण्याकरितां विकत घेतलें तें दाखवले आहे. बुद्धाच्या वेळेचीं चांदीचीं नाणीं प्राय चौकोनी होतीं हें या चित्रावरून दिसून येईल. उजव्या बाजूच्या भिंतीवर बुद्धानें केलेली आजाऱ्याची शुश्रूषा, कोलि व शाक्य याचे मिटवलेलें भाडण, कपिलवस्तूस दिलेली भेट, मृत मातेस उपदेश देऊन स्वर्गांतून केलेलें पृथ्वीवरील अवतरण याचीं चित्रें दाखविलीं असून मध्यभागीं बुद्धाचें देहावसान दाखविलें आहे त्यानंतर अगुलिमाल नामक दरोडेखोराची बुद्धाच्या उपदेशानें घडलेली उपरति, देवदत्त व अजातशत्रु याचा बुद्धास मारण्याचा कट, बुद्धशिष्य आनंद यानें अस्पृश्य स्त्रीच्या पाण्याचा केलेला स्वीकार यांची चित्रें आहेत. प्राचीन काळीं बुद्धमंदिरात प्रदक्षिणेच्या मार्गावर अशा प्रकारचीं चित्रे खोदलेले

दगड ठेवीत असत. हेतु हा, कीं प्रदक्षिणा घालतांना बुद्धचरित्राची भक्ताना सहज कल्पना यावी. अशा प्रकारचे दगड सारनाथ पुराणवस्तुमदिरामध्यें मुख्य दालनाच्या उजव्या भागाच्या सोप्याच्या डाव्या कोपऱ्यांत अनेक आहेत. याच कल्पनेनें प्रेरित होऊन नवीन देवालयामध्यें जपानी चित्रकाराकडून हीं चित्रें रंगविण्यात आलेलीं आहेत.

या मंदिराच्या मध्यभागीं धर्मोपदेशकाच्या मुद्रेची बुद्धमूर्ति बसवली असून तिच्याखालीं दगडी पेटीमध्यें भगवान् बुद्धाच्या अस्थी ठेवल्या आहेत. सरहद्द प्रांतांतील तक्षशिला गावीं व मद्रास इलाख्यात नागार्जुनकोंडा येथे उत्खनन करीत असतांना स्तूपामध्ये या अस्थी हिंदुस्थान सरकारास मिळाल्या; अस्थीबरोबर सापडलेल्या कोरीव लेखावरून त्या बुद्धाच्या आहेत असे दिसून आलें. सारनाथाला जेव्हां नवीन बुद्धमदिर बाधण्यात आलें, त्यावेळीं हिंदुस्थान सरकारने या अस्थी तेथें टेवण्याकरिता महाबोधि सोसायटीस दिल्या. बुद्धाला ज्या पिंपळाच्या झाडाखालीं आत्मज्ञान झाले, ते झाड शशाक राजानें पुढे जाळून टाकलें; पण त्याची एक खादी सिलोनमध्ये अनिरूद्धपुर येथे अशोकाचा मुलगा महिंद यानें लावली होती. ते झाड अद्याप जिवंत आहे. त्याच्या चार-पाच खांद्या

आता या देवालयाच्या आवारांत लावल्या आहेत. सारनाथला महाबोधि सोसायटीने एक विश्वविद्यालयहि स्थापण्याचा संकल्प करून तेथे हल्लीं एक हायस्कूल सुरू केले आहे.

आतां जसें बुद्धाचें नवीन बांधलेलें देवालय सारनाथला आहे, तशीं पूर्वींहि अनेक होतीं; त्याच्या शेजारीं बुद्ध भिक्षूंस राहण्यास पुष्कळ मठ होते. बौद्ध लोकाना सारनाथ हे स्थान काशी इतके पूज्य वाटे; त्यामुळे काशीमध्ये जशीं अनेक देवळे व मठ आहेत तशीं सारनाथमध्येहि असत. १३ व्या शतकाच्या प्रारभीं मुसलमानानीं सारनाथमधील बौद्ध देवालये व मठ पाडून टाकून ते स्थान इतकें उध्वस्त करून टाकलें कीं तेथील वसति पार उठून गेली, व ते स्मशानासारखें ओसाड पडले. १७९५ सालीं बनारसच्या राजाचा दिवाण जगत्सिंग यानें तेथील पडक्या देवालयाच्या विटा, दगड वगैरे सामान बनारसमध्ये आपल्या घराच्या कामास आणण्यास सुरुवात केली, तेव्हां त्याला एका स्तूपात एका करंडकामध्ये रक्षा सापडली. तो करडक त्याने त्यावेळचा बनारसचा रेसिडेंट जोनाथन डकन यास दिला. काशीमध्यें हिंदूंची रक्षा गंगेमध्ये पडावयाची, तेव्हां स्तूपातील करडक बौद्धाचा असला पाहिजे अशा अर्थाचा एक लेख त्यानें लगेच कलकत्याच्या 'एशियाटिक्

रिसर्चेस्' मध्ये लिहला. त्यावेळेपासून सारनाथ हे बौद्धस्थान आहे असे लोकाच्या निदर्शनास आले. १९०४ सालापूर्वी हिंदुस्थानात पुराणवस्तुसंशोधनाचा कायदा नव्हता; त्यामुळे १७९५ ते १९०४ यापर्यंतच्या कालात सारनाथमधील अनेक मूर्ति व इमारतीचे दगड लांबवण्यात आले. वरुणा-नदीवरील पूल बाधण्याच्यावेळीं सारनाथहून सुमारे ५० बुद्धाच्या मूर्ति व ५०-६० गाड्या दगड पायामध्ये पब्लिक् वर्क्स् डिपार्टमेंटकडून घालण्यात आले. १९०४ पासून हा सर्व मनु बदलला हिंदुस्थान सरकारच्या पुराणवस्तुसशोधन खात्याने येथे सशास्त्र उत्खनन सुरु केले, व त्यामुळे अशोकाचा स्तभ व स्तूप, गुप्तकालीन देवालय, बाराव्या शतकातील विहार व अनेक मठ, याचे अवशेष उघडकीस आले. तेथे सापडलेल्या मूर्ती वगैरे ठेवण्याकरिता हल्लीं सारनाथला एक पुराणवस्तुमदिर बाधण्यात आले आहे

सारनाथच्या भरभराटीस अशोकाच्या वेळेपासून म्हणजे सुमारे इ स पू. २५० पासून सुरुवात झाली. अशोक हा बौद्धधर्मी होता, त्यामुळे बौद्धाचें महाक्षेत्र जे सारनाथ तेथें त्याने अनेक इमारती भिक्षूकरिता बाधल्या असल्या पाहिजेत. उत्खननामध्ये त्याचे फारसे अवशेष सापडले नाहींत. पण

अशोकाचा कोरीव लेख धारण करणारा एक शिलास्तंभ सापडला, त्याचे तीन-चार तुकडे झालेले होते स्तभाचा खालचा तुकडा अद्याप अशोकाने स्तंभ जेथें स्थापन केला होता त्याच जागीं आहे. स्तंभाच्या शिरोभागीं एक चतुर्मुखी सिंह-मूर्ति होती; ती हल्लीं पुराणवस्तुमंदिरात मध्यभागीं ठेवलेली आहे. या सिंहाचे खोदकाम इतके नामी व बेमालूम आहे, कीं इतके सुंदर मूर्तिकौशल्य त्यावेळच्या जगामध्ये इतरत्र क्वचित्‌च दिसून येईल. अशोकानें बांधलेला स्तूप* अशोक-स्तभाच्या दक्षिणेस होता; त्यातील दगड, विटा, वगैरे बाबू जगत्सिंगाने लांबविल्यामुळे हल्लीं तेथे काहींच अवशेष उरलेले नाहींत.

अशोकानंतर बौद्धधर्माचा प्रसार झपाट्याने हिंदुस्थानात

---

* एखाद्या महापुरुषाच्या अस्थी आंत ठेवून त्यावर दगड अगर विटा यांची जी अर्धवर्तुलाकृति भरीव इमारत रचतात त्यास 'स्तूप' म्हणतात. एखाद्या जागीं जर एखादी संस्मरणीय गोष्ट घडली, तर तिच्या स्मारकाकरिताहि स्तूप बाधण्याची पद्धत पुढें सुरु झाली. अगदीं प्रथम चौकोनी पायावर अर्धवर्तुलाकृती स्तूप बाधून त्यावर एक छत्री ठेवीत. पुढें पुढें अर्धवर्तुल हें प्रमाणाबाहेर उंच होऊ लागले. सारनाथमधील विद्यमान स्तूपावरून हें दिसून येईल.

झाला; त्यामुळे सारनाथचे महत्वहि वाढूं लागले. तेथे भिक्षूंची सख्या वाढली, त्यामुळे मठहि पुष्कळ बांधावे लागले इ. स. पहिल्या शतकातील कुशानवंशी राजा कनिष्क हाहि बौद्धधर्माचा चाहता होता, त्याच्या वेळेचे अवशेषहि सारनाथला सापडले आहेत. इसवी सनाच्या प्रारभापर्यंत बौद्धधर्मांत मूर्तिपूजेचा प्रसार झाला नव्हता, तोपर्यंत बुद्धाच्या पादुका, सिंहासन, बोधिवृक्ष, याचीच बौद्धलोक पूजा करीत. बुद्धमूर्ति करण्याची कल्पना प्रथम मथुरा-पेशावर या भागात लोकप्रिय झाली, सारनाथमधील सर्वांत जुनी बुद्धमूर्ति मथुरेच्या बल नावाच्या भिक्षूने काशीस पाठवलेली होय. पुढें काशीसहि बुद्धमूर्ति होऊ लागल्या गुप्त कालामध्ये (इ स. ३००-६५० पर्यंत) काशीची मूर्तिकला फार विकास पावली. त्यावेळच्या अनेक मूर्ती उत्खननात सांपडलेल्या असून त्या चांगल्या प्रतीच्या आहेत. इसवी समाच्या पाचव्या शतकाच्या सुमारास सारनाथला एक प्रचंड व उत्तुग बुद्धदेवालय बाधण्यात आले, त्याच्या भोवतालच्या मठामध्ये बौद्ध भिक्षूहि पुकष्ळ रहात गुप्त कालामध्ये त्याच्याकरिता बाधलेले अनेक मठ सारनाथ येथे उत्खननात सापडले आहेत. सातव्या शतकात जेव्हा युआन् चाग हा चिनी भिक्षू सारनाथला आला होता, त्यावेळीं तेथे सुमारे १५०० भिक्षू रहात असत आठव्या शतकापासून हिंदु-

स्थानात बौद्ध धर्मास उतरती कळा लागली; तथापि सारनाथ हे महत्वाचे तीर्थ असल्यामुळे तेथे बरेच बौद्ध भिक्षू रहात असत. बाराव्या शतकात कनोजच्या गोविंदचद्र नावाच्या हिंदुधर्मीय राजाच्या कुमारदेवी नावाच्या बुद्धधर्मीय बायकोनें सारनाथला एक भव्य मदिर बौद्ध लोकांकरिता बाधून दिले होते. पण पुढे लवकरच सारनाथचे आयुष्य संपले. ११९४ सालीं कुतुबुदीन ऐबकने ज्यावेळीं काशी जिंकली, त्यावेळीं त्याने काशीप्रमाणें सारनाथचीं सर्व मदिरे व मठ पाडून ते स्थान बेचिराख केले. त्यापुढे तेथील वसति पार उठून गेली.

सारनाथच्या पुराणवस्तुमंदिराच्या मध्यभागात गेल्याबरोबर अशोकस्तभाच्या शिरोभागी असलेली सिंहचतुष्टयीची मूर्ति दिसते सिंहाच्या पायावरील शिरा देखील खोदकामात उठून दिसतात. याइतके सुदर खोदकाम त्यावेळीं इतरत्र कोठेच होत नसे हे सर जॉन मार्शलसारख्या इग्रज तज्ज्ञानीहि कबूल केले आहे. सिंहचतुष्टयी ज्या वर्तुलाकृति पीठावर आहे, त्याच्या सभोवर हत्ती, घोडा, बैल व सिंह याच्या मूर्ती कोरल्या आहेत, त्याहि प्रेक्षणीय आहेत. सिंहचतुष्टयीच्या डाव्या बाजूस मथुरेहून कनि'क राजाच्या कारकिर्दीत आलेली बुद्धमूर्ति ठेवलेली आहे. त्या मूर्तीवर एक प्रचंड दगडी छत्री होती, ती तिच्या पाठीमागे

कोपऱ्यांत भिंतीवर टागून ठेवलेली आहे. या बुद्धमूर्तीच्या पुढे इ स. पू दुसऱ्या शतकातील काहीं अवशेष ठेवले आहेत मथुरेच्या बुद्धमूर्तीच्या पाठीमागे गुप्तकालातील बुद्धमूर्ती ठेवल्या आहेत त्यापैकीं हॉलच्या उजव्या भिंतीस लावून ठेवलेली बुद्धमूर्ती सर्वांत सुदर आहे या दगडी मूर्तीच्या चेहऱ्यावर समाधान, इंद्रियजय व आत्मानद याची चागली छटा उमटली आहे हॉलच्या उजव्या दालनात डाव्या बाजूच्या कोपऱ्यापासून बुद्धाच्या आयुष्यातील निरनिराळे प्रसग कोरलेले अनेक दगड आहेत नवीन देवालयातील मागे वर्णन केलेल्या चित्रावरून या कोरलेल्या चित्राची कल्पना येईल याच भागामध्ये पुढे बोधिसत्व व महायान पंथातील अनेक देवता याच्या मूर्ती आहेत. पुढे आडव्या दालनात उत्तरकालीन बुद्धमूर्ती व महायान बौद्धधर्मातील तारा, वाराही वगैरे देवताच्या मूर्ती आहेत. दालनाच्या डाव्या कोपऱ्यात ताडव नृत्य करणाऱ्या शकराची अजस्र मूर्ति आहे हिचे खोदकाम पूर्ण झालेले नाहीं पुराणवस्तुमदिराच्या व्हरांड्यामध्ये जुन्या इमारतींचे खाब, खिडक्यावरील व दारावरील दगड वगैरे ठेवलेले आहेत. एका दारावरील लाब तुळईवर क्षातिवाद जातकाची कथा कोरलेली आहे

आता आपण उत्खनन केलेल्या भागाकडे बाहेर जाऊ

पाहण्यास जाण्याचा रस्ता जेथून सुरू होतो त्याच्या डाव्या बाजूस अशोकाच्या स्तूपाची जागा आहे. अशोकाच्या स्तभाच्या दक्षिणेस त्याचा स्तूप होता असे चिनी प्रवाशानीं लिहले असल्यामुळें आपणास त्या स्तूपाची जागा नक्की कळू शकली आहे. हा स्तूप १७९५ सालीं बाबू जगत्‌सिंगानें उध्वस्त करून टाकला त्यामध्ये सापडलेली दगडी पेटी हल्लीं कलकत्ता म्यूझियम मध्ये आहे. स्तूपास प्रदक्षिणा घालण्याचा जो मार्ग असे, त्यावर चढून जाण्यास चार बाजूस बांधलेल्या पायऱ्या अद्याप तशाच आहेत. मूळ स्तूप आत तसाच ठेवून उत्तर-कालीन राजे त्याभोवतीं नवीन स्तूप बांधीत असत. खोदून काढलेल्या स्तूपाच्या अवशेषावरून स्तूपाची मूळ भिंत व नव्या स्तूपाची भिंत या दोनीहि दिसतात.

स्तूपावर एक छत्र व त्या भोवती एक कठडा होता. कालेकरून हा कठडा—बहुतकरून भूकंपामुळे—खालीं पडला तो कठडा थोडेसे पुढे गेले म्हणजे पत्र्याचे छपराखालीं दिसून येईल. कठड्याच्या दगडाचें पॉलिश अशोकाच्या स्तभासारखेच गुळगुळीत आहे, त्यावरून तो अशोकाच्या स्तूपावरीलच असावा हे उघड होतें

थोडेसे पुढे गेलें म्हणजे अशोकाचा स्तंभ लागतो तो

मूळ जागेवरच आहे. स्तभाचे चार तुकडे झालेले असून खालचा तुकडा जमिनींत स्वस्थानीं आहे, बाकीचे तुकडे त्याच्या भोंवती उभे करून ठेवले आहेत. स्तंभावरील गुळगुळीत पॉलिश प्रेक्षणीय आहे. अशोकाच्या स्तभावर त्याचा एक शिलालेख आहे. त्यामध्ये बुद्धाच्या प्रथमोपदेशाची माहिती असावी अशी साहजिक अपेक्षा असणार. पण त्या लेखामध्यें भिक्षूना निष्कारण वितंडवाद करून संघभेद न करण्याबद्दल अशोकाने दिलेला आदेश आहे. लेखाच्या चवथ्या ओळींतील अक्षरें —

[ भिखू वा भिखू ] नि वा संघ भाखति से ओदातानि दुसानि संनंधापयिया आनावासरि

हीं आहेत. अशोकाच्या लेखाच्या पाठीमागें पहिल्या शतकातील अश्वघोष राजाचा एक छोटा लेख आहे. त्याच्या लिपीचे वळण अशोकलिपीहून निराळें आहे.

अशोक स्तंभाच्या पूर्वेस गुप्त कालातील प्रचंड देवालयाचा गाभारा आहे. या देवालयामध्यें धर्मोपदेश करणारी बुद्धमूर्ति होती त्या मूर्तीची जागाच प्रथमोपदेशाची जागा असावी. देवालयाच्या भरभक्कम भिंती पाहिल्या म्हणजे त्याचे शिखर खूप उच असलें पाहिजे असें वाटूं लागतें. देवालयाच्या पुढें मोठे


आवार असून त्यामध्ये यात्रेकरूंनीं पुण्य लागावे म्हणून परत जाताना बांधलेले बारीक स्तूप, भिक्षूच्या ओवऱ्या, छोटीं देवळें वगैरे होतीं. देवालयाच्या आवारांत प्रवेश करण्याचे द्वार सुमारे ४०० फूट पूर्वेस होते दाराच्या उजव्या हातास हात-पाय धुण्याकरिता एक पादोदक कुड होते, ते आता खणून बाहेर काढले आहे या कुडाच्या उत्तरेस पाणी वाहून नेण्याकरिता बाधलेले पक्के गटारही आता दिसते.

या मोठ्या देवळाच्या उत्तरेस एक मोठी भिंत होती, व तिच्या पलीकडे एक दुसरे प्रचड देवालय होते ते बाराव्या शतकामध्ये गोविंदचद्र नावाच्या कनोजच्या हिंदु राजाच्या कुमारदेवी नांवाच्या हिंदु स्त्रीनें बाधले होते या देवालयाच्या पूर्वेस व पश्चिमेस अनेक गुप्तकालीन मठाचे अवशेष खणून बाहेर काढलेले आहेत. गुप्तकालीन मठ व मंदिरे पुढे अकराव्या शतकामध्ये मोडकळीस आलीं जुन्या इमारतींचे खाब वगैरे बाहेर न काढता त्याचा पडलेला ढिगारा सपाट करून, जरूर तेथे त्यामध्ये भरीला विटाचे तुकडे वगैरे भरून, त्याच्या वर मोठे दगड घालून नवीन काळच्या देवळाची व मठाची जमीन करण्यात आली हे कुमारदेवीच्या देवळाच्या पूर्वेस थोड्या अतरावर जिन्यावरून उतरून खालीं गेल्यावर जे खाब, ढिगारा

व त्यावर टाकलेल्या दगडाच्या लडी दिसतात त्यावरून स्पष्ट दिसून येईल. कुमारदेवीच्या जिनचक्रविहाराच्या खालींहि मठाचे अवशेष उकरले तर सापडतील देवळाच्या पाठीमागे एक भुयारी रस्ता आहे, त्याच्या शेवटीं एक बारके देऊळ लागते ते बहुतकरून एकातात ध्यान करण्याकरितां बाधलें असावे. कुमारदेवीच्या जिनचक्रविहार देवळाच्या पूर्वेस गुप्तकालीन मठाचे अवशेष आहेत या मठाच्या खाबाचें खोदकाम सुबक आहे हे मठ ओलाडून पादोदक कुडाच्या पुढे गेले म्हणजे एक प्रचड स्तूप लागतो तो आठव्या शतकात बाधण्यात आला होता त्याच्या वरील खोदकाम पुरे होऊ शकले नाहीं. स्तूपामध्ये अगदीं पाढरे दिसणारे दगड तो दुरुस्त करताना सरकारने घातलेले आहेत जुन्या दगडापैकीं काहींवर भूमितींतील समातर रेखा, चौकोन वगैरे आकृति कोरलेल्या आहेत या आकृती खोदकामामध्ये मुसलमानी कालात आल्या असा सामान्य समज आहे, पण या स्तूपावरून त्या हिंदूकालातहि कधीं कधीं कोरीत असत हे दिसून येईल. स्तूपावर निरनिराळ्या बाजूस जे आठ कोनाडे आहेत, त्यामध्यें बुद्धमूर्ती पूर्वी ठेवण्यात आल्या होत्या. स्तूपाच्या अनेक दगडावर बुद्ध यात्रेकरूनीं सोनें घासलेले आहे, म्हणून ते पिवळे दिसतात.

या स्तूपाच्या पूर्वेस महाबोधि सोसायटीने बांधलेले बुद्ध-मंदिर आहे. त्याचे वर्णन वर आलेंच आहे. या मंदिराच्या पूर्वेस चिनी लोकांनीं आपल्या पद्धतीनें बांधलेले बुद्ध देवालय आहे. त्यांमधील मूर्तीहि चिनी पद्धतीचीच आहे

स्तूपाच्या पश्चिमेस १८२४ सालीं बांधलेले जैनाचा अकरावा तीर्थंकर जो श्रेयासनाथ त्याचे मंदिर आहे. त्याच्या-नंतर एका पत्र्याच्या छपराखालीं काशीमध्ये सारनाथमधील उत्खनन होण्यापूर्वी सांपडलेल्या प्राचीन कालच्या हिंदु मूर्ती आहेत. या मूर्ती गांवातील नागरी प्रचारिणी सभेच्या म्यूझियम-मध्ये पाठविण्याचा सरकारचा हल्लीं इरादा आहे.



हिंदु युनिव्हर्सिटी, कॉलेजांच्या इमारती

# प्रकरण ५ वें

## काशी विश्वविद्यालय उर्फ बनारस हिंदु युनिव्हर्सिटी

काशी हे प्राचीन काळापासून भारतीय संस्कृतीचे व शिक्षणाचे केन्द्र आहे हें आपण मागे पाहिलेच आहे तक्षशिलेसारखीं काहीं शिक्षणकेन्द्रे काशीपेक्षाहि पुरातन होतीं, पण आज तीं नामशेष झालेलीं आहेत विद्यमान विद्याकेन्द्रामध्यें हिंदुस्थानात काशी हेच सर्वात जुने होय यात शका नाहीं मुसलमानी अमलामध्येदेखील येथे संस्कृत विद्येचा दीप कसा सथपणें जळत होता हे आपण मागे पाहिलेंच आहे. एकुणिसाव्या शतकामध्येहि काशीमध्ये अनेक पंडित लोक फी वगैरे न घेता वेद-वेदातादि अनेक शास्त्रे हजारो विद्यार्थ्यांना शिकवीत असत.

या पंडिताकडून जे शिक्षण देण्यांत येई, ते जुन्या पद्धतीचे असे त्या योगे जुनी संस्कृति व वाङ्मय याचे संरक्षण होई, पण हिंदु संस्कृतीचा व राष्ट्राचा अभ्युदय

होण्यास प्राचीन संस्कृतीच्या संरक्षणाबरोबर आर्वाचीन शास्त्राचे यथासांग अध्यापन करणाऱ्या आधुनिक विद्यापीठाची जरूरी होती.

अशा तऱ्हेचें विद्यापीठ काशीमध्ये स्थापन करावे अशी कल्पना प्रथम पडित मदनमोहन मालवीय याच्या मनात आली. या बाबतींत त्यानीं एक छोटेसे पत्रक लिहून आपली कल्पना १९०४ सालीं काशीमध्ये एका सभेपुढे माडली. राष्ट्रातील प्रातिनिधिक पुढाऱ्यापुढे ती माडण्याची संधि मालवीयजींना १९०५ सालीं काशीच्या कॉंग्रेसच्या वेळीं मिळाली कॉंग्रेस संपल्यावर ३१ डिसेंबर १९०५ रोजीं त्यानीं बनारसच्या टौनहॉलमध्ये एक सभा भरवली. या सभेमध्ये नामदार गोखले, लोकमान्य टिळक, बाबू अरविंद घोष, बाबू सुरेन्द्रनाथ वानर्जी, लाला लजपतराय वगैरे प्रसिद्ध पुढारी हजर होते. योजना फार चागली पण सिद्धीस नेणे अत्यंत कठीण असे बहुतेकाना वाटलें. १९०५ सालापर्यंत हिंदुस्थानात असल्याच कार्याकरिता कोणाहि खासगी व्यक्तीने अगर सार्वजनिक सस्थेने एक कोटि रुपये जमवले नव्हते; तेव्हा हिंदु युनिव्हर्सिटीकरिता एक काटि रुपये जमवणे शक्य होईल हे कोणासच प्रथम खरे वाटेना. पैसे मिळाले तरी

सरकार खासगी बिनसरकारी युनिव्हर्सिटी काढण्यास परवानगी देईल असे वंगभागाच्या चळवळीच्या ऐन भरांत काशीस जमलेल्या कोणाहि पुढाऱ्यास शक्य वाटले नाहीं.

१९०६ ते १९०८ पर्यंत देशामध्ये राजकीय चळवळ व कॉंग्रेसमधील दुही यामुळे मालवीयजींना हिंदु युनिव्हर्सिटीची कल्पना मूर्तावस्थेत आणण्यास फारसा वेळ मिळाला नाहीं. तथापि लोकाच्या मनात ती कल्पना रुजवण्याबद्दल ते शक्य तितका प्रयत्न करीत होते. १९०८ सालच्या मद्रासच्या कॉंग्रेसच्या वेळींहि त्यानीं या विषयावर व्याख्यान दिले. पुढील सालीं त्याना स्वतःलाच लाहोरला कॉंग्रेसचे अध्यक्ष व्हावें लागले; त्यामुळे त्याचे लक्ष राजकारणाकडेच बरेच गुंतले होतें. १९१० च्या डिसेंबरअखेर त्यानीं आपला भरभराटीचा वकीलाचा धंदा सोडून देऊन हिंदु विश्वविद्यालयाच्या कार्यास आपणास वाहून घेतले. त्यानीं हिंदु युनिव्हर्सिटी सोसायटी स्थापन करून वर्गणी जमा करण्यास सुरुवात केली. स्वदेशाभिमानाची व प्राचीन संस्कृतीच्या अभिमानाची या वेळीं देशात बरीच तीव्र भावना होती. त्यामुळे मालवीयजीसारखा वंद्यचरित्र महापुरुष जेव्हां भिक्षापात्र हातीं घेऊन देशामध्ये हिंडूं लागला, त्या वेळीं त्याच्या वक्तृत्वाच्या मोहिनीनें मोहित होऊन श्रीमत लोक भराभर

मोठमोठ्या देणग्या देऊं लागले. मालवीयजींनीं १९११ मध्ये कलकत्ता, बंगाल, बिहार, संयुक्तप्रांत, ग्वाल्हेर, बिकानेर, पंजाब, येथें दौरा काढून ३० लक्ष रुपये जमा केले. या दौऱ्यामध्ये त्यावेळच्ये दरभंग्याचे महाराज सर कामेश्वरसिंग याची मालवीयजींना फार मदत झाली. उत्तर हिंदुस्थानातील राजे लोकांकडून युनिव्हर्सिटीस चागलेच सहाय्य मिळालें. राजे लोकांमध्यें बिकानेरचे महाराज याचा दीड लक्ष रुपयाचा पहिला आंकडा पडला. खालील यादीवरून हिंदु युनिव्हर्सिटीस मिळालेल्या टळक ठळक देणग्याची कल्पना येईल :—

| | |
|---|---|
| बिकानेरचे महाराज | तीन लक्ष व बारा हजार सालिना. |
| उदेपुरचे महाराज | दीड लक्ष. |
| जोधपुरचे महाराज | चार लक्ष व चोवीस हजार रु. ची सालिना देणगी. |
| जयपुरचे महाराज | पाच लक्ष |
| कोटाचे महाराज | तीन लक्ष. |
| अलवारचे महाराज | दोन लक्ष. |
| सर सयाजीराव गायकवाड | तीन लक्ष ( लायब्ररीकारितां. ) |
| सर प्रतापसिंग गायकवाड | सालिना अठरा हजार. ( हिंदी संस्कृतीच्या 'सर सयाजी गायकवाड' अध्यापकाच्या जागेकरिता. ) |

| | |
|---|---|
| म्हैसूरचे महाराज | तीन लक्ष वीस हजार. |
| काश्मीरचे महाराज | सालिना बारा हजार. |
| ग्वाल्हेरचे शिंदे | सवा पाच लक्ष. |
| इंदूरचे महाराज | पाच लक्ष. |
| पतियाळाचे महाराज | पांच लक्ष व सालिना चोवीस हजार. |
| नेपाळचे महाराज | दोन लक्ष. |
| दरभंग्याचे महाराज | चार लक्ष. |
| कासिमबझारचे महाराज | एक लक्ष बहात्तर हजार. (प्राचीन हिंदुसंस्कृतीच्या अध्यापकाच्या जागेकरिता.) |
| नाभा व बनारसचे महाराज | प्रत्येकीं एक लक्ष. |
| राजा बलदेवदास बिरला | साडेसात लक्ष. (वसतिगृह व छात्रवृत्त्याकरिता.) |
| सर सुंदरलाल, अलाहाबाद | दोन लक्ष. (रुग्णालयाकरितां.) |

१. बाबू ब्रजेंद्र किशोर रॉय (मैमन सिंग), २. सर राश बिहारी घोष, ३. शेठ दुधवाले (कलकत्ता), ४. तारकेश्वरचे महंत, ५. राजा सरजू बक्ष सिंग (औंध), ६. राजा मोतीचंद (बनारस), ७. राजा सूर्यपाल सिंग (अवागड),

८ नरोत्तमदास मुरारजी (मुंबई), ९ रामनारायण हरनदन राय (मुबई), १० शेठ खेतसी खैरसी (मुंबई), ११ शेठ चतुर्भुजदास गोवर्धनदास (मुबई), १२ राजा रामनद सिंग बनेली, १३ कोल्हापुरचे महाराज ——प्रत्येकीं एक लक्ष.

| | |
|---|---|
| मथुरादास वसनजी | दीड लक्ष. |
| बलरामपुरचे महाराज | सवा लक्ष. |
| मथुरादास वसनजी खेमजी, मुंबई | दीड लक्ष. |
| सगीदास जयसीराम, मुबई | अडीच लक्ष |
| शेठ खटाव बधु, मुबई | दोन लक्ष चौऱ्याशीं हजार सहाशे (स्त्रीविद्यालयाकरिता.) |
| एक लाखापेक्षा कमी देणग्या | सुमारे छत्तीस लक्ष |


( या पैकीं काहीं देणग्या १९१६ नतरच्या आहेत )

अशा प्रकारें सुमारे एक कोटी रुपयाची अभिवचने मिळाल्यावर पडित मालवीयानीं त्यावेळचे व्हाइसरॉय लॉर्ड हॉर्डिंज व शिक्षणमंत्री सर हार्कोर्ट बट्लर याच्या मुलाखती घेऊन त्याना सर्व योजना समजावून दिली. त्याची या योजनेस सहानुभूति मिळाली, तथापि हिंदु युनिव्हर्सिटी ही पहिलीच खासगी युनिव्हर्सिटी असल्यामुळें तिच्या कायद्याच्या मसुद्याची चर्चा करण्यास व विवादास्पद मुद्यांचा निकाल करून घेण्यास

दोन-तीन वर्षे निघून गेलीं. १९१५ सालीं लेजिस्लेटिव्ह कौन्सिलने सरकारने पुढे आणलेले हिंदु युनिव्हर्सिटी बिल पास केले. कौन्सिलमध्ये बिलावर चर्चा सुरू असताना त्यास चोहोकडून सहानुभूतिपूर्ण पाठिंबा मिळाला होता.

कायदा पास झाल्यावर ४ फेब्रुआरी १९१६ रोजीं वसतपचमीच्या सुमुहूर्तावर लॉर्ड हार्डिंज् याच्या हस्ते हिंदु युनिव्हर्सिटीचा पाया घालण्यात आला. या समारभास बगालचे गव्हर्नर, बिहार व ओरिसा, सयुक्त प्रात व पजाब या प्राताचे लेफ्टेनंट गव्हर्नर, काश्मिर, जोधपुर, बिकानेर, अलवार, नाभा, दातिया, झालावर, बनारस, किशनगड इत्यादि संस्थानाचे राजे व देशातील अनेक विद्वान् व प्रतिष्ठित लोक हजर होते हिंदु युनिव्हर्सिटीकरिता काशीच्या दक्षिणेस नगवा गांवापाशीं दोन चौरस मैल विस्ताराची १३०० एकर जागा सहा लक्ष रुपयास विकत घेण्यात आली या जागेवर शेते व अरण्ये होतीं, पण चार वर्षाच्या अल्पावधींत तेथे अनेक उच्च व भव्य इमारती उठवण्यात आल्या. या अवधींत हजारो मजूर रात्रंदिवस काम करीत होते युनिव्हर्सिटीहद्दींत २० मैल लाबीचे रस्ते आखण्यात येऊन त्याच्या बाजूने २५००० झाडे लावण्यात आलीं. प्रिन्स ऑफ वेल्सच्या हस्ते ज्यावेळीं १९२१ सालीं विश्व-

विद्यालयाचा उद्घाटन समारभ झाला, त्यावेळीं कॉलेजच्या तीन भव्य इमारती, तीन विस्तीर्ण वसतिगृहे व सुमारे ८० अध्यापकाची रहाण्याचीं घरे बाधून तयार झालीं होतीं. युनिव्हर्सिटीच्या विस्ताराचे काम मात्र १९२१ सालीं सपलें नाहीं. तें अद्याप चालूच असून अनेक पिढ्यापर्यंतहि पुढें चालेल. प्राचीन ऋषीकुलाप्रमाणे येथे १०,००० विद्यार्थ्यांच्या अध्ययनाची सोय करावी असा पंडित मालवीयांचा सत्य संकल्प आहे. १९२१ सालीं तीन वसतिगृहे होतीं, आता आणखीं पाच नवीं बांधण्यात आलीं असून एकंदर १८०० विद्यार्थ्यांच्या राहण्याची सोय करण्यांत आली आहे. १९२१ सालानंतर स्त्रियांचे खटाव मुकुदजी कॉलेज व वसतिगृह, सर सुंदरलाल हॉस्पिटल, सर सयाजीराव पुस्तकालय, लिमडी, राजपुताना व धनराजगिरी वसतिगृहें, शिवाजी व्यायाम मदिर, कृषिसंशोधन सस्था, (ॲग्रिकल्चरल रिचर्स इन्स्टिटयूट), शवच्छेदन शाळा, छापखाना, 'जोधपूर' व 'हैद्राबाद' अध्यापक वसतिगृहे वगैरे अनेक इमारती बाधण्यात आल्या आहेत. १९३२ सालीं हिमालयातील एका महर्षिकडून विश्वेश्वराच्या देवालयाचा पाया घालण्यात आला असून त्याचा चबुथरा आता सपत आला आहे. विश्वविद्यालयातील रहिवाशांना उत्तम व मुबलक पाणी मिळावे म्हणून तीन टयूब विहिरी खणण्यात आल्या आहेत विश्वविद्या-



सर सयाजीराव पुस्तकालय

बनारस हिंदु युनिव्हर्सिटी

लयाच्या इंजिनियरिंग कॉलेजमधून वसतिगृहाना विजेचा पुरवठा होतो. विश्वविद्यालयाचें स्वतःचे बाधकामखाते असून त्या मार्फत रस्ते व इमारती याचें बाधकाम व दुरुस्तीकाम हीं करण्यात येतात. रस्ते व दुरुस्ती याचे करिताच सालिना ५०,००० रुपये खर्च करावे लागतात; यावरून विश्व-विद्यालयाच्या अफाट विस्ताराची कल्पना करिता येईल. विश्वविद्यालयामध्ये एक म्युनिसिपालिटी असून तिच्या मार्फत रस्ते, दिवे, पाणीपुरवठा व आरोग्यसंरक्षण याची व्यवस्था होते. विद्यार्थ्यांच्या करिता दोन दवाखाने आहेत, व सर सुंदरलाल हॉस्पिटलमध्यें २०० रोग्याची राहण्याची व्यवस्था केली आहे. या दवाखान्यात सालिना सुमारे ८०,००० रोग्याना आयु-र्वेदीय औषधें फुकट देण्यात येतात. रहिवाशांच्या सोयीकरितां विश्वविद्यालयामध्यें निरनिराळ्या मालाची दुकानेहि उघडण्याची व्यवस्था केली आहे. विश्वविद्यालयाकरिता एक स्वतंत्र पोस्ट व तार ऑफिस आहे. शहरातील सुखसोयी, खेडेगावातील मोकळी हवा व प्राचीन आश्रमातील पवित्र व विद्यामय वातावरण यांचा त्रिवेणी संगम विश्वविद्यालयनगरांत झालेला दिसून येईल. देशातील विश्वविद्यालयामध्ये आणखी एका विश्वविद्यालयाची भर टाकणे एवढाच कांहीं हिंदु विश्वविद्यालय काढण्यामध्यें हेतु नव्हता. हिंदु संस्कृति व शास्त्रे यांचें यथा-

साग अध्ययन करून प्राचीन संस्कृतीतील प्राह्याशाचा प्रसार करणे, ज्ञानविज्ञानाच्या विविध शाखांत संशोधन करणे, पाश्चात्य शास्त्रीय ज्ञानाचा हिंदु समाजात फैलाव करणें व हिंदु विद्यार्थ्यांस हिंदु धर्माचे शिक्षण देणे हे चार विश्वविद्यालयाचे मुख्य हेतु आहेत. १९१६ सालीं हिंदुस्थानातील सर्व विश्वविद्यालये केवळ परीक्षा घेऊन पदव्या देण्याचे काम करीत असत, हिंदु विश्वविद्यालय हेच त्यावेळी हिंदुस्थानातील पहिले अध्यापनाचे काम हातीं घेणारें विश्वविद्यालय होतें. गुरुशिष्य एके ठिकाणी राहून प्राचीन गुरुकुलाप्रमाणे त्यांच्यामध्ये घनिष्ठ संबंध प्रस्थापित व्हावेत, हाहि एक विश्वविद्यालयाचा हेतु आहे. आज विश्वविद्यालयामध्ये सुमारे ३५०० विद्यार्थी आहेत, त्यापैकीं सुमारे २००० विद्यार्थी विश्वविद्यालयाच्या वसतिगृहामध्यें व १५०० विश्वविद्यालयानें पसंत केलेल्या वसतिगृहामध्यें राहतात. यापैकीं दर ५० विद्यार्थ्यांवर देखरेख करण्यास एक अध्यापक असतो. यावरून गुरुकुलनिवासाचे ध्येय किती मोठ्या प्रमाणावर साध्य झालें आहे ते दिसून येईल. प्राचीन विद्येचें व धर्माचें संगोपन करण्याकरिता संस्कृतविद्या महाविद्यालय व धर्म महाविद्यालय हीं स्थापन केलीं असून त्यांमध्यें प्राचीन परंपरेप्रमाणे विद्यार्थ्यांकडून फी घेण्यात येत नाहीं, इतकेंच नव्हें, तर बहुतेक

होतकरू विद्यार्थ्यांना भोजनखर्चेहि देण्यांत येतो. आयुर्वेदाचे यथासाग अध्ययन व संशोधन व्हावें म्हणून आयुर्वेद महाविद्यालय काढण्यात आलें असून त्यामध्ये विद्यार्थ्यांना आयुर्वेदाबरोबर ॲलिओपाथींतील शस्त्रवैद्यक, शरीरविज्ञानशास्त्र वगैरे आधुनिक विषयहि शवच्छेदनादिकाच्या सहाय्यानें शिकवण्यात येतात. हिंदु धर्माचे व संस्कृतीचे चागले प्रचारक तयार व्हावेत म्हणून पुरोहित विद्यालयहि उघडण्यात आलें आहे. विद्यार्थ्यांना धर्माचे यथायोग्य ज्ञान व्हावे म्हणून दर वर्गामध्ये धर्मशिक्षणाची सोय करण्यात आली आहे. दर एकादशीला कथा करण्यात येऊन त्यामध्यें पौराणिक गोष्टींच्या द्वारा विद्यार्थ्यांच्या मनावर धार्मिक तत्वें ठसवण्यात येतात. दर रविवारीं सकाळीं गीतेवर प्रवचन होतें.

हिंदु विश्वविद्यालयामध्ये इतर धर्मीय विद्यार्थ्यास बिलकुल मज्जाव नसून त्यांना हिंदु धर्मावरचीं प्रवचने ऐकण्यास सक्ति करण्यात येत नाहीं. शीख, जैन, आर्यसमाज वगैरे पंथाचे अध्यापक व विद्यार्थीहि येथे असून त्या त्या पंथाचे उत्सव येथें करण्यात येऊन त्यावेळीं इतर पथीय विद्यार्थ्यांना त्या पंथांचीं मतें समजण्याकरितां प्रवचनें करण्यांत येतात. त्यामुळें हिंदु युनिव्हर्सिटींत हिंदु विद्यार्थी धार्मिक दृष्टया बहुश्रुत

व विशाल मनाचे होतात. हिंदु विश्वविद्यालयामध्यें सर्व प्रांतांतील विद्यार्थी व अध्यापक असल्यामुळें हे विद्यालय सर हार्कोर्ट बट्लर यांनीं म्हटल्याप्रमाणें अखिल भारतीय विश्वविद्यालय या पदवीस सर्वथैव पात्र झाले आहे.

वाङ्मय शाखेमध्ये (Arts college) इतरत्र शिकवण्यात येणारे विषय शिकवण्यात येऊन प्राचीन हिंदु संस्कृति धर्म, व इतिहास याच्या विशेष अध्ययनाची व संशोधनाची सोय करण्यात आली आहे. या विषयावर ७–८ चागले सशोधनात्मक ग्रंथ विश्वविद्यालयातील अध्यापकाकडून प्रसिद्ध झाले आहेत संस्कृत, अर्थशास्त्र, राजकारणशास्त्र या विषयांचेंहि विशेष अध्ययन होत असतें.

पाश्चात्य देशांची प्रगति शास्त्रीय ज्ञानाने झालेली आहे. तेव्हा हिंदु राष्ट्र जर पुढें यावयाचे असेल, तर त्यानें शास्त्रीय ज्ञानामध्यें व सशोधनामध्ये आघाडी मारली पाहिजे. यास्तव शास्त्रीय ज्ञानांच्या विविध शास्त्राचें विशेष अध्ययन व्हावे याबद्दल विश्वविद्यालयाचा विशेष कटाक्ष आहे. धातुशास्त्र व खनिशास्त्र (Mining and Metallurgy) औद्योगिक रसायनशास्त्र, (Industrial Chemistry) औषधिक रसायनशास्त्र (Pharmaceutical Chemistry) हे विषय हिंदु विश्व-

विद्यालयामध्येंच प्रथम हिंदुस्थानात सुरू करण्यांत आले. पदार्थविज्ञानशास्त्र, रसायनशास्त्र, प्राणिशास्त्र, वनस्पतिशास्त्र वगैरे शास्त्राच्या उपकरणाकरिता आतापर्यंत सुमारें २७,००,००० रु. खर्च करण्यात आले आहेत; यावरून शास्त्रीय ज्ञानाच्या प्रगतीकडे हिंदु विश्वविद्यालय किती लक्ष देतें याची कल्पना करिता येईल. या विद्यालयाचें एन्जिनियरिंग कॉलेज हिंदुस्थानातील अव्वल दर्जाचें असून त्याचे विद्यार्थी सबंध देशभर विखुरलेले आहेत. कृषिशास्त्रात शोध करण्याकरिता ॲग्रिकल्चरल रिसर्च इन्स्टिटयूट स्थापण्यांत आली आहे. १९३७ सालापासून काच तयार करण्याचे शिक्षण देण्याचीहि व्यवस्था करण्यात आली आहे. कायदा विद्यालय, अध्यापक विद्यालय, स्त्रियाचें विद्यालय, व्यापारी विद्यालय हींहि विद्यालयें विश्वविद्यालयात आहेत. असे फार थोडे विषय असतील कीं ज्याच्या शिक्षणाची व्यवस्था विश्वविद्यालयात केली गेलेली नाहीं. त्यामुळें हिंदु विश्वविद्यालय खरोखरच सर्व विद्यांचे आलय झालेलें आहे. तेथील विद्यार्थ्यांना व अध्यापकाना केवळ सानिध्यानें बऱ्याच इतर शाखाचें सामान्य ज्ञान होऊं शकतें. बहुश्रुतपणा वाढावा म्हणून सायंटिफिक सोसायटी व लिटररी सोसायटी याच्या विद्यमाने सामान्य विद्यार्थ्यांना सहज समजण्याजोगीं व्याख्यानेहि दर आठवड्यास करण्यांत येतात.

विश्वविद्यालयाचा वार्षिक खर्च सुमारे १४ लक्ष रुपयाचा आहे. उत्पन्नाच्या बाबीमध्ये सरकारी ग्रँट ४ लक्ष रुपये, कर्जरोख्यावरील व्याज १। लक्ष रुपये, निरनिराळ्या दरबारांच्या वार्षिक देणग्या सुमारे साठ हजार रुपये, स्थावर मिळकतीचें उत्पन्न सुमारे ४५,००० रुपये, फीचें उत्पन्न ६ लक्ष रुपये या मुख्य आहेत हल्लीं दरसाल सुमारे दीड लक्ष रुपयाची तूट पडत असते, ती इतर देणग्यानीं प्राय: भरून निघते विश्वविद्यालयामधील रहाणी व खर्च शक्य तितक्या कमी खर्चाचीं करण्यात आलेलीं असून विद्यार्थ्यांच्याकडून फीहि इतर विद्यालयाच्या मानाने बरीच कमी घेण्यात येते. स्त्रीविद्यार्थ्यांना पुरुषविद्यार्थ्यांच्या निम्मीच फी द्यावी लागते. अध्यापकाचे पगार सरकारी विश्वविद्यालयातील अध्यापकाच्या निम्याहूनहि कमीच आहेत गावातून विश्वविद्यालयात जाण्यास दर माणसीं दोन आण्यास एक्का मिळतो. प्रवेशस्थानापाशीं मोठें द्वार उभारलेले आहे. प्रवेश केल्यावर डाव्या हातास स्त्रियाचें महाविद्यालय व वसतिगृह लागतें. तसेच दक्षिणेकडे पुढे गेलें म्हणजे पहिल्या वळणावर शवच्छेदनशाला आहे पुन: दक्षिणेकडे पुढें गेलें म्हणजे रस्ता पश्चिमेकडे वळून अर्धवर्तुलाकार होतो. या रस्त्यावर प्रथम आर्टस् कॉलेज, सायन्स कॉलेजच्या दोन इमारती मग गायकवाड लायब्ररी, कृषिसंशोधन संस्था, एन्जिनि-

यरिंग कॉलेज, चिनिमाती व काच याच्या अध्यापनशाला, छापखाना व गोशाला हीं आहेत. आर्टस् कॉलेजच्या गच्चीवरून युनिव्हर्सिटीची रूपरेखा चागली कळून येते फिझिक्स् लॅबोरेटरीमध्ये स्थलाभावामुळे प्राणिशास्त्र शाखा व वनास्पतिशास्त्र शाखा ( Zootogy and Botany ) याचा अंतर्भाव केला आहे केमिस्ट्री लॅबोरेटरीमध्ये त्याच कारणामुळे भूगर्भशास्त्र, खनिजशास्त्र व औद्योगिक रसायनशास्त्र याची सोय करण्यात आली आहे ग्रथालयामध्यें सुमारे १,१०,००० ग्रथ असून तेथे बरींच जुनीं नाणी व चित्रेहि आहेत. एन्जिनियरिंग कॉलेजचे वर्कशॉप पाहण्याजोगे आहे.

अर्धवर्तुलाकार रस्त्यावर वसलेल्या या कॉलेज इमारतींच्या पाठीमागे विस्तीर्ण क्रीडागणे ( Play-grounds ) आहेत. त्याच्या पलीकडे विद्यार्थ्यांची वसतिगृहे आहेत. वसतिगृहाच्या मागे दोन फर्लांगावर अध्यापकाचीं घरे अर्धवर्तुलाकार रस्त्यावर बाधलेली आहेत. स्त्रियाच्या वसतिगृहासमोरील रस्त्याने गेलें म्हणजे उजव्या बाजूस सर सुंदरलाल रुग्णालय, कुलपतीचे निवासस्थान व अतिथिभवन हीं लागतात. याच्या समोर आयुर्वेदीय औषधीची बाग आहे. या रस्त्याने पुढे गेले म्हणजे डाव्या बाजूस क्रीडागणे व उजव्या बाजूस प्रथम संस्कृत व

आयुर्वेदीय विद्यार्थ्यांचे वसतिगृह व मग बिरला वसतिगृह व भरोचा वसतिगृह हीं लागतात. भरोचा हॉस्टेलसमोर शिवाजी व्यायामशाळा आहे. याच रस्त्याने थोडे पुढें गेलें म्हणजे डाव्या हातास वर्तुलाकार कालवा दृष्टीस पडतो. थोडे पुढें गेलें म्हणजे उजव्या हातास एंजिनीयरिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांकरिता बाधलेली तीन वसतिगृहें लागतात. स्त्रियाच्या कॉलेजच्या पिछाडीस लॉर्ड हार्डिंजनीं बसविलेलां पायाचा दगड आहे. १९१६ सालीं पायाचा दगड बसवल्यावर जो गंगेस महापूर आला, त्यामध्यें पायाच्या दगडावर एक पुरुष पाणी आले. म्हणून गंगेच्या किनाऱ्यालगत विश्वविद्यालयाच्या इमारती बाधण्याचा बेत रद्द करून इमारती एक मैल आंत बांधण्यात आल्या. पायाच्या दगडापाशीं हल्लीं ४०० यार्डाचें गोळीबार शिकण्याचें मैदान करण्यात आलें आहे विश्वविद्यालयाच्या मालकीच्या जमिनींपैकीं पश्चिमेकडील सुमारे निम्मा भाग अद्याप उपयोगात आलेला नाहीं. तेथें शेते असून तीं खंडानें देण्यात येतात.

एवढे प्रचंड विश्वविद्यालय जगामध्ये इतरत्र फारच थोड्या ठिकाणीं पहावयास सांपडेल. हल्लींचा त्याचा प्रचंड विस्तार अवघ्या वीस वर्षांत झालेला आहे. पण त्याचा पूर्ण

विकास होण्यास अद्याप आणखी दीडकोटी रुपयांची जरूरी असून आपल्या हयातींत ती रक्कम जमविण्याचा मालवीयजींचा संकल्प आहे. त्या सत्पुरुषाचा संकल्प सिद्धीस नेणें हिंदु समाजानें मनात आणल्यास मुळींच कठीण नाहीं.

वृद्धापकाळामुळें पंडित मालवीयांनीं १९३९ च्या सप्टेंबर महिन्यात विश्वविद्यालयाच्या व्हाइस् चॅन्सलरचें काम सोडले. त्यानंतर सर एस्. राधाकृष्णन् हे व्हाइस् चॅन्सलर झाले आहेत. त्याच्यासारख्या त्रिखंडकीर्ति विद्वानाच्या मार्गदर्शकत्वाखालीं हिंदु विश्वविद्यालयाची प्रगति अव्याहतपणे होत जाईल यात शंका नाहीं.

–समाप्त–

# श्रीसयाजी बालज्ञानमाला

## भौगोलिक वर्णनें

१ ( १ ) **गिरनारनुं गौरव** जयसुखराय पुरुषोत्तमराय
जोशीपुरा, एम ए. ( १९१९–१९२२ ) ०–३–०

२ ( ६ ) **पाटण सिद्धपुरनो प्रवास.** रामलाल
चुनीलाल मोदी, ( १९१९–१९२२ ) ०–६–०

३ ( ७ ) **पावागढ** रमणलाल वसंतलाल देसाई,
एम्. ए. ( १९२०–१९२२ ) ०–६–०

४ ( २१ ) **सुरत.** भानुसुखराम निर्गुणराम महेता,
( १९२२ ) ०–६–०

५ ( २७ ) **वडोदरानो वैभव.** जगजीवनदास दयाळजी
मोदी, ( १९२३ ) ०–६–०

६ ( ३६ ) **बौद्ध गुफाओ** प्रो. छोटालाल बालकृष्ण
पुराणी, एम्. ए. ( १९२३ ) ०–६–०

७ ( ३७ ) **महाबळेश्वर.** श्रीकांत मुकुंदराम महेता,
बी ए., एल्एल्. बी ( १९२३ ) ०–६–०

८ ( ११४ ) **इलीचपुर.** यशवंत खुशाल देशपांडे, एम्. ए,
एल्एल् बी ( सचित्र ) [मराठी] ( १९३४ ) ०–६–०

९ (१२६) **सिद्धपुर.** चिमनलाल मगनलाल डॉक्टर, एम् ए, एल्एल् बी (सचित्र) (१९३५) ०—६—०

१० (१२८) **मोढेरा.** मणिलाल मूळचंद मिस्त्री, (सचित्र) (१९३६) ०—६—०

११ (१४१) **पावागड** रामराव मार्तंड भाबुरकर, [मराठी] (१९३६) ०—६—०

१२ (१४२) **देवगिरी** प्रो चिं. वि. जोशी, एम् ए. [मराठी] (१९३६) ०—६—०

१३ (१४३) **पुणें** गोपीनाथ गणेश तलवलकर, (सचित्र) [मराठी] (१९३७) ०—६—०

१४ (१४६) **भरुच.** काझी सयद नुरुदीनहुसेन एहमदहुसेन (सचित्र) (१९३७) ०—१०—०

१५ (१४९) **वडनगर** कनैयालाल भाईशंकर दवे, (सचित्र) (१९३७) ०—८—०

१६ (१५०) **बडोदें.** वि स. वाकसकर, (सचित्र) [मराठी] (१९३७) ०—६—०

१७ (१५४) **श्रीक्षेत्रनाशिक.** रा ग हर्षे, भाषाविषारद (सचित्र) [मराठी] (१९३८) ०—६—०

१८ (१५९) **आबु अने आरासुर.** मणिलाल जगजीवन द्विवेदी (१९३९) ०—६—०

१९ (१६८) **काशी** डॉ अ स. अळतेकर, एम्. ए., एल्एल् बी, डी. लिट् [मराठी] (१९४१) ०—१०—०